श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित

# शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी

ता. बार्शी - ४१३४११ जि. सोलापूर (महाराष्ट्र)

# परिवर्तन

२०१९-२०

योद्धे जन्म घेत नाहीत...
ते तयार होतात या भारतभूमीच्या मातीत
कोणी सीमेवर लढतो; तर कोणी सीमेच्या आत
योध्द्यांनो या लढाईत आम्ही आहोत आपल्यासोबत...
जय हिन्द !








पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१९ चा 'उत्कृष्ठ शिक्षण संस्था पुरस्कार' मा. ना. नितीनजी गडकरी यांचे हस्ते स्वीकारताना संस्था अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, सचिव श्री व्ही. एस. पाटील व सहसचिव श्री पी. टी. पाटील




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१९ चा 'उत्कृष्ठ प्राचार्य पुरस्कार' मा. ना. नितीनजी गडकरी यांचे हस्ते स्वीकारताना प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे



**आमचे दैवत**

**युगप्रवर्तक, जाणता राजा**

## छत्रपती शिवाजी महाराज



आमची श्रद्धा

जगद्‌गुरु संत तुकाराम महाराज



आमची प्रेरणा

संस्थापक

कर्मवीर डॉ. निवृत्ती गोविंदराव तथा मामासाहेब जगदाळे




संस्थेच्या वतीने गुणवंत प्राचार्य म्हणून प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे सोबत अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, श्री नंदनजी जगदाळे, श्री व्ही. एस. पाटील व श्री पी. टी. पाटील

मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे एफडीपी मध्ये सहभागी असताना डॉ. सुनिता मगरे यांच्या समवेत प्राचार्य डॉ. गोरे एस. एस.






संगमनेर महाविद्यालयाच्या प्राचार्य मुलाखतीसाठी तज्ज्ञ म्हणून उपस्थित असताना मा. आमदार सुधीरजी तांबे यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे पदवीदान समारंभात अधिष्ठाता म्हणून मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. गोरे एस. एस.





पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर १५ व्या पदवीदान प्रसंगी मा. महामहीम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मा. कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस यांचे समवेत प्राचार्य डॉ. गोरे एस. एस.

एका कार्यक्रमात थोर समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांच्या समवेत चर्चा करताना प्राचार्य डॉ. गोरे एस. एस.





## प्राचार्य

# डॉ. एस. एस. गोरे

एम.ए., एम.एड., पीएच.डी.

- सदस्य - व्यवस्थापन परिषद
- सदस्य - सिनेट तथा अधिसभा
- प्रभारी अधिष्ठाता - आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
- समन्वयक - शैक्षणिक मूल्यनिर्धारण शिक्षण अभ्यासमंडळ
- सदस्य - विभागीय संशोधन समिती
- सदस्य - स्थायी समिती
  पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
- कार्यकारिणी सदस्य - महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक प्रशिक्षक परिषद
- अभ्यास मंडळ सदस्य - के. बी. पी. स्वायत्त महाविद्यालय, पंढरपूर



महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा तथा क्रीडा महोत्सव २०१९ च्या क्रीडा ज्योतीचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. उपकुलसचिव डॉ. एस. एन. शिंदे, प्राध्यापक व विद्यार्थी



यु.जी.सी. विभागीय कार्यालय, पुणे येथील नूतन जॉईंट सेक्रेटरी डॉ. मनोजकुमार यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. गोरे एस. एस.



एका नवोपक्रमशील संस्थेस भेट या प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत 'स्नेहग्राम' कोरफळे येथील भेटीप्रसंगी प्राध्यापक व विद्यार्थी



'लोकशाही बळकटीकरणासाठी मतदान - तरुणाईशी खुली चर्चा, मुक्त संवाद' कार्यक्रम प्रसंगी सहभागी विद्यार्थी



१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपस्थित प्राध्यापक व मान्यवर



'गुणवत्तापूर्ण शिक्षक' या विषयी व्याख्यनाचे व्याख्याते प्राचार्य डॉ. मिलिंद परिचारक यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे सोबत इतर प्राध्यापक

# आमचे गुणवंत प्राध्यापक...



**प्राचार्य डॉ. गोरे एस. एस.**
उत्कृष्ठ प्राचार्य पुरस्कार
पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर



**प्रा. डॉ. भिलेगांवकर एस. डी.**
बेस्ट सिटिझन ऑफ इंडिया
गोल्ड मेडल ॲवॉर्ड, नवी दिल्ली



**प्रा. डॉ. शिखरे व्ही. पी.**
उत्कृष्ठ शिक्षक पुरस्कार
लोकमंगल प्रतिष्ठान, सोलापूर



**प्रा. डॉ. डिसले एम. एस.**
राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार
जय मल्हार सामाजिक प्रतिष्ठान, बीड



**प्रा. गुंड बी. टी.**
राज्यस्तरीय उत्कृष्ठ शिक्षक पुरस्कार
महाराष्ट्र राज्य क्रीडा शिक्षक महासंघ



**प्रा. सुरवसे एस. एस.**
उत्कृष्ठ कार्य पुरस्कार
समर्थ जीवनसेवा फाऊंडेशन, बार्शी



**प्रा. डॉ. मते एम. व्ही.**
राज्यस्तरीय सह्याद्री शिक्षणरत्न पुरस्कार
सह्याद्री उद्योग समुह, अहमदनगर



**प्रा. डॉ. राठोड एल. आय.**
करेजिअस वूमन ॲवॉर्ड
सोशल ह्युमन राईट कौन्सिल, मुंबई



**प्रा. सावळे एस. ए.**
राज्यस्तरीय सह्याद्री शिक्षणरत्न पुरस्कार
सह्याद्री उद्योग समुह, अहमदनगर

अभिनंदन

# आमचे गुणवंत विद्यार्थी...



**ज्योती बनसोडे**
आंतर विद्यापीठ ॲथलॅटीक्स
सुवर्णपदक विजेती



**क्रांती बनकर**
आंतर विद्यापीठ बास्केटबॉल
रौप्यपदक विजेती



**शुभांगी हिरेमठ**
आंतर विद्यापीठ बास्केटबॉल
रौप्यपदक विजेती



**विश्वजीत गायकवाड**
आंतर विद्यापीठ क्रीडामहोत्सव
सहभाग



**अलोक शिंदे**
आंतर विद्यापीठ क्रीडामहोत्सव
सहभाग



**जितेश भालेराव**
आंतर विद्यापीठ क्रीडामहोत्सव
सहभाग



**अश्विनी भोसले**
सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण

हार्दिक अभिनंदन

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित

# शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी

**ता. बार्शी - ४१३४११ जि. सोलापूर (महाराष्ट्र)**

(पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित, एनसीटीई व महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त, नॅक 'ब' श्रेणी)

# परिवर्तन

## २०१९-२०

**संपादक मंडळ :**

मुख्य संपादक

**प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे**

संपादक

**डॉ. पी. ए. पाटील**

उपसंपादक

**प्रा. बी. टी. गुंड**

सदस्य

**डॉ. जी. आर. गायकवाड**

**प्रा. एस. ए. सावळे**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

।। विद्यया संपन्नता ।।

# सोलापूर विद्यापीठ गीत

ज्ञानरुप देव धर्म जीवनी असो
करुणेचा अमृतघन या मनी वसो ।धृ।

अध्ययनसमृद्ध होऊ, ध्यास धरोनी
श्रमसंस्कृति वाढवूया यत्न करोनी
ज्ञानकला विज्ञान ध्वजा ही अंबरी विलसो ।१।

धर्म जाति पंथभेद जाऊ विसरुनी
पतितांना कवळूया धीर देऊनी
अश्रूंना हसवू ही आस नित ठसो ।२।

सान थोर उच्च नीच ही सरो निशा
ज्ञानसूर्य उगवुनिया उजळु दे दिशा
प्रगतीचा पथ सात्विक लोचनी दिसो ।३।

– दत्ता हलसगीकर

# निवेदन

## वार्षिक परिवर्तन २०१९ - २० च्या प्रकाशन आणि मालकी संबंधी

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी |
| प्रकाशन काळ | : | वार्षिक |
| मुद्रक | : | श्री गिरीश अर्जुन सोनार |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | साई प्रिंटिंग प्रेस, बार्शी |
| प्रकाशक | : | प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी |
| संपादक | : | डॉ. पी. ए. पाटील |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी |

वर दिलेला तपशील आमच्या माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरा आहे.

**डॉ. पी. ए. पाटील**
संपादक

**प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे**
मुख्य संपादक

या अंकात व्यक्त झालेली सर्व मते साहित्यिकांची असून साहित्यिकांच्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. या अंकातील विविध साहित्यकृतींच्या स्वतंत्रतेची तसेच अन्य जबाबदारी त्या-त्या साहित्यिकांची आहे. हा अंक विक्रीसाठी नाही.

**डॉ. पी. ए. पाटील**
संपादक, परिवर्तन

**प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे**
मुख्य संपादक, परिवर्तन

।। एकमेका साह्य करुं । अवघे धरु सुपंथ ।।

# श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी.

जि. सोलापूर

## पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य


| | | | |
|---|---|---|---|
| १) | **डॉ. बी. वाय. यादव** | - | अध्यक्ष |
| २) | **श्री. एन. एन. जगदाळे** | - | उपाध्यक्ष |
| ३) | **श्री. व्ही. एस. पाटील** | - | जनरल सेक्रेटरी |
| ४) | **श्री. पी. टी. पाटील** | - | जॉईंट सेक्रेटरी |
| ५) | **श्री. डी. एस. रेवडकर** | - | खजिनदार |
| ६) | **डॉ. जी. एम. पाटील** | - | सदस्य |
| ७) | **श्री. आर. एस. बारसकर** | - | सदस्य |
| ८) | **श्री. पी. एल. पाटील** | - | सदस्य |
| ९) | **श्री. एस. बी. पाटील** | - | सदस्य |
| १०) | **डॉ. व्ही. बी. देशमुख** | - | सदस्य |
| ११) | **प्राचार्य एस. के. मोरे** | - | सदस्य |
| १२) | **श्री. जे. सी. शितोळे** | - | सदस्य |
| १३) | **श्री. एस. एस. पवार** | - | सदस्य |
| १४) | **श्री. डी. एम. मोहिते** | - | सदस्य |


## संस्थेचे विश्वस्त


| | | | |
|---|---|---|---|
| १) | **डॉ. बी. वाय. यादव** | - | पदसिद्ध अध्यक्ष |
| २) | **प्राचार्य व. न. अिंगळे** | - | विश्वस्त |
| ३) | **प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे** | - | विश्वस्त |

# प्राचार्यांचे मनोगत

**श्री** छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन ! महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रातील एक महान व्यक्तीमत्त्व म्हणजे कर्मवीर डॉ. निवृत्ती गोविंदराव तथा मामासाहेब जगदाळे. मामासाहेबांनी ग्रामीण भागातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात असामान्य असे कार्य केले आहे. म्हणूनच शेतकरी व गरीब कुटुंबातील मुला-मुलींच्या शिक्षणाचे स्वप्न साकार होत आहे. कर्मवीर मामांचे शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील सेवाभावी कार्य उल्लेखनीय आहे. मामांनी स्वतःच्या संसाराचा त्याग करुन गोरगरीबांच्या कल्याणाचे कार्य जीवनभर चालू ठेवले. सन १९३४ मध्ये बार्शी येथे गरीब मुलांच्या शिक्षणासाठी श्री शिवाजी मराठा बोर्डिंग सुरु केले. यातूनच याचे पुढे सन १९४७ मध्ये श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी असे रुपांतर झाले. सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागातल्या शेतकरी व गरीब विद्यार्थ्यांसाठी अनेक शैक्षणिक संस्था स्थापन करुन शिक्षणाचा प्रसार सर्वदूर पोहोचविला. जगदाळे मामा हॉस्पिटलच्या माध्यमातून आरोग्य सेवेचे महान कार्य सुरु केले.

समाजाला सकारात्मक व नवनिर्मितीचे विचार संक्रमित करण्यासाठी सक्षम शिक्षक तयार करण्याच्या हेतूने मामासाहेबांनी २० जून १९६६ रोजी बार्शी येथे शिक्षणशास्त्र महाविद्यालय सुरु केले. याद्वारे शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करण्यात आले. आज या महाविद्यालयात बी.एड., बी.पी.एड., एम.एड., एम.पी.एड., एम.फिल., पीएच.डी., एम.ए. शिक्षणशास्त्र व डी.एस.एम. असे विविध प्रकारचे अभ्यासक्रम शिकविले जातात. शैक्षणिक व सामाजिक जडणघडणीत महाविद्यालयाचे योगदान उल्लेखनीय आहे. माजी विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील कार्य कर्तृत्वामुळे महाविद्यालयाच्या लोकप्रियतेत दिवसेंदिवस भर पडत आहे. प्रशिक्षणार्थीकेंद्रित विकासप्रणाली महाविद्यालयात राबविली जाते. प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण व समतोल विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो. प्रशिक्षणार्थींना शिक्षक व्यवसायासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये, मूल्ये, क्षमता, सकारात्मक विचार विकसनाबाबत व्यासपीठ उपलब्ध करुन दिले जाते. यात सराव पाठशाळांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. शैक्षणिक संपादणूकीत विद्यापीठ गुणवत्तेत महाविद्यालयाचे प्रशिक्षणार्थी अव्वल स्थान प्राप्त करण्यात यशस्वी होत आहेत. क्रीडा क्षेत्रात देखील महाविद्यालयाचे प्रशिक्षणार्थी चमकदार कामगिरी बजावत आहेत. याबरोबरच स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, मतदार जनजागृती, सांस्कृतिक कार्यक्रम, समाजप्रबोधन, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमांतून आपत्ती व्यवस्थापन व ग्राम शिबीर, तंत्रस्नेही शिक्षक आदि सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. शालेय आंतरवासिता उपक्रमातून शालेय विद्यार्थी व शिक्षक यांच्याशी आंतरक्रिया साधली जाते. म्हणूनच महाविद्यालयाचे प्रशिक्षणार्थी विविध क्षेत्रांत यशस्वी झाले आहेत. महाविद्यालयात तज्ज्ञ प्राध्यापक व क्रीडा मार्गदर्शक उपलब्ध आहेत. विविध क्षेत्रांत प्राध्यापकांचे योगदान उल्लेखनीय आहे. विविध संस्थांद्वारे प्राचार्य व प्राध्यापक यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. उच्च शिक्षणातील विषयावर आधारित राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. समृद्ध भौतिक सुविधांमुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तेत भर पडत आहे. आकर्षक जलतरण तलाव, भव्य क्रीडा संकुल, क्रीडांगणे, ग्रंथालय, मुलींचे वसतीगृह, प्रयोगशाळा, इमारत आदिंमुळे महाविद्यालयाचा परिसर आकर्षक व अध्ययन अनुकूल असा आहे. विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालयात संशोधन केंद्र चालविले जाते. याचा उदयोन्मुख संशोधकांना मोठा फायदा होत आहे. विविध समित्यांच्याद्वारे महाविद्यालयाची कार्यप्रणाली राबविली जाते. महाविद्यालयाच्या गुणवत्तेत एन.सी.टी.ई., यु.जी.सी., नॅक, महाराष्ट्र शासन, विद्यापीठ, सराव पाठशाळा, शासकीय व अशासकीय

संस्था यांचे मार्गदर्शन व सहकार्य नेहमीच असते. महाविद्यालयाच्या विकासात श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष श्री नंदकुमार जगदाळे, जनरल सेक्रेटरी श्री विष्णू पाटील, सहसचिव श्री प्रकाश पाटील, खजिनदार प्रा. दिलीप रेवडकर, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य, विश्वस्त व सदस्य आदिंचे योगदान उल्लेखनीय आहे. सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात कोव्हीड १९ या महाभयंकर आजाराने संपूर्ण जगाला भेडसावले आहे. प्रचलित शिक्षण प्रक्रियेला धक्का देणारी ही घटना आहे. 'ऑनलाईन शिक्षण प्रक्रिया' विस्तारत आहे. महाविद्यालयाने देखील 'वर्क फ्रॉम होम'च्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन, प्रशिक्षण व संशोधन यातील बदलांना अनुसरून महाविद्यालय आगामी शैक्षणिक नियोजन राबविण्यास सक्षम आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ विद्यार्थी विकास यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या सृजनरंग २०१९-२० व्यावसायिक महाविद्यालय नियतकालिक स्पर्धेत महाविद्यालयाच्या परिवर्तन नियतकालिकाचा समावेश आहे. प्रशिक्षणार्थींच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा या हेतूने या नियतकालिकात विविध विषयांवरील लेख, कविता, रेखाटने, अहवाल, उपक्रम आदि विभागात प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला आहे. सदर नियतकालिक आकर्षक व गुणवत्तापूर्ण केल्याबद्दल संपादक मंडळाचे मी अभिनंदन करतो. महाविद्यालयाचा प्राचार्य या नात्याने महाविद्यालयाची उज्वल व यशस्वी परंपरा अविरत राखण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. यात संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, शासकीय अधिकारी, अशासकीय संस्था, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, शिक्षक, प्रशिक्षणार्थी, पालक, हितचिंतक यांचे सहकार्य आहे. म्हणूनच सन २०१९-२० मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने उत्कृष्ठ प्राचार्य या पुरस्काराने मला गौरविले. यामुळे मला अधिकतम नाविन्यपूर्ण कार्य करण्याची संधी व प्रेरणा मिळाली आहे. याकामी आपणा सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य अपेक्षित आहे. पुनःश्च सर्वांचे आभार !

धन्यवाद !

**- प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे**

# संपादकीय...

मनुष्याला लाभलेली देणगी म्हणजे भाषा. कारण इतर प्राण्यांच्या तुलनेत आपण प्रगती करण्याच्या ज्या मुख्य बाबींचा उल्लेख करता येईल, त्यातील भाषेचा अग्रक्रम लागतो. कारण भाषेमुळेच आपण आपल्या भाव-भावना, विचार, राग, द्वेष, प्रेम व्यक्त करतो आणि त्यातूनच मानवी जीवनाचे ऋणानुबंध जुळतात व जीवन समृद्ध होत जाते. आपले विचार अधिक प्रगल्भ, सदृढ होण्यासाठी श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन या भाषिक क्षमतांना महत्त्व आहे.

या भाषिक क्षमतांच्या विकसनातून साहित्यकृती जन्माला येतात व आपले विचार अगणित व्यक्तींपर्यंत पोहचतात. नव्हे आपले विचार, भावना, मत पोहचविण्याचे साधन म्हणजे साहित्य. लेखन क्षमता ही साहित्यिकांच्या विचारांची प्रगल्भता, समृद्धी कल्पकता इ. नुसार विकसित होते व त्यांच्यातील कवी, लेखक, कथाकार आकाराला येतो. त्यांच्या साहित्यकृतीच्या वाचनासाठी वाचक आतूरलेले असतात. अर्थात लेखकाचे अतीव परिश्रम, सर्जनशीलता, रंजकता, कल्पकता या सर्वांचा परिपाक घेऊनच त्यांची साहित्यकृती जन्माला येते.

असे असले तरीही कोणतीही साहित्यकृती अथवा लेखक निर्माण होण्यासाठी त्याची सुरवात होणे गरजेचे आहे. ती सुरवात, तो अरंभ म्हणजे विद्यार्थीदशेपासून निरीक्षण, वाचन करणे गरजेचे आहे व यातून तयार झालेल्या विचारांच्या बैठकीला लेखनाने वाट मोकळी करुन दिल्यास विद्यर्थ्यांमधून निश्चितच नवीन लेखक, कवी, कथाकार, कादंबरीकार उदयाला येण्याची सुरुवात होते.

याच उद्देशाने विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन जीवनात त्याच्या लेखनाला उभारी देण्यासाठीचे व्यासपीठ म्हणून 'परिवर्तन' हा अंक प्रकाशित करण्याचा छोटासा प्रयत्न.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील हा परिवर्तन अंक आपणा वाचकांच्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. सदर अंकात विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात आलेले अनुभव, भावलेले प्रसंग, घटना-घडामोडी, त्यांना मिळालेली प्रेरणा इ. अनेक विषयांना स्पर्श करणारे कथा, कविता, प्रसंगलेखन, पत्रलेखन आदींचा समावेश आहे.

सदर अंकात प्रमुख मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांतील लेखन असून त्यातून विद्यार्थ्यांच्या विचारांना सहजतेने व्यक्त होता यावे, त्यांच्या लेखनाला प्रेरणा मिळावी या उद्देशाने त्यांच्या लेखन कृतींचा समावेश केला आहे व महाविद्यालयामधील वर्षभराच्या घटना अहवारुपात सादर केल्या आहेत. तसेच महाविद्यलयाच्या वतीने वर्षभर राबविले जाणारे विविध विशेष दिन, व्याख्याने, क्रीडा स्पर्धा, समाजप्रबोधन उपक्रम, रॅली, रक्तदान इ. च्या संदर्भातील काही मोजकी क्षणचित्रे समाविष्ट केली आहेत.

हा अंक अतिशय आकर्षक व सुरेखपणे प्रकाशित करुन दिला ते साई प्रिंटिंग प्रेस, बार्शीचे श्री गिरीश अर्जुन सोनार यांचे मनःपूर्वक आभार.

सदर अंकाचे रसिक वाचक, विद्यार्थी, पालक निश्चित स्वागत करतीलच...

**- डॉ. पी. ए. पाटील**

संपादक

# भावपूर्ण श्रध्दांजली

शैक्षणिक वर्ष २०१९ - २० मध्ये देशातील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, साहित्यिक, कला, विज्ञान, क्रीडा, सहकार इ. क्षेत्रांतील दिवंगत झालेल्या थोर व्यक्ती, तसेच नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीत मृत्यू पावलेल्या सर्व भारतवासीयांना प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

संस्थेवर व महाविद्यालयावर प्रेम करणाऱ्या व्यक्ती, संस्थेचे सदस्य, महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या परिवारातील ज्या व्यक्तींचे दुःखद निधन झाले त्यांना प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली.



# शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी २०१९-२०

| ● बी.एड. व बी.पी.एड. अनुदानित विभाग ● | | |
|---|---|---|
| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम |
| १ | डॉ. एस. एस. गोरे | प्राचार्य |
| २ | डॉ. एस. डी. भिलेगांवकर | सहयोगी प्राध्यापक (बी.एड. विभाग प्रमुख) |
| ३ | डॉ. एस. एम. लांडगे | सहयोगी प्राध्यापक (बी.पी.एड. विभाग प्रमुख) |
| ४ | डॉ. ए. जी. कांबळे | सहयोगी प्राध्यापक |
| ५ | डॉ. व्ही. पी. शिखरे | सहयोगी प्राध्यापक |
| ६ | डॉ. एम. एस. डिसले | सहाय्यक प्राध्यापक |
| ७ | प्रा. बी. टी. गुंड | सहयोगी प्राध्यापक |
| ८ | डॉ. आर. ए. फुरडे | सहाय्यक प्राध्यापक |
| ९ | प्रा. सौ. एस. एस. सुरवसे | सहाय्यक प्राध्यापक |
| १० | डॉ. एम. व्ही. मते | सहाय्यक प्राध्यापक |
| ११ | डॉ. पी. ए. पाटील | सहाय्यक प्राध्यापक |
| १२ | प्रा. पी. पी. नरळे | सहाय्यक प्राध्यापक |
| १३ | श्री एस. एल. जाधव | ग्रंथपाल |
| १४ | श्री एस. व्ही. वाघमारे | मुख्य लिपीक |
| १५ | श्री बी. डी. मोटे | वरिष्ठ लिपीक |
| १६ | सौ. एस. डी. राऊत | कनिष्ठ लिपीक |
| १७ | श्री आर. जी. बुटे | ग्रंथालय परिचर |
| १८ | श्री आर. ए. पाचपुते | सेवक |
| १९ | श्री ए. पी. वासकर | सेवक |
| २० | श्री ए. एस. जाधव | सेवक |
| ● एम.एड. विनाअनुदानित विभाग ● | | |
| १ | डॉ. जी. आर. गायकवाड | सहाय्यक प्राध्यापक (विभाग प्रमुख) |
| २ | डॉ. श्रीमती एल. आय. राठोड | सहाय्यक प्राध्यापक |
| ३ | श्री टी. एस. गायकवाड | सेवक |
| ● एम.पी.एड. विनाअनुदानित विभाग ● | | |
| १ | प्रा. जी. एस. फरताडे | सहयोगी प्राध्यापक (विभाग प्रमुख) |
| २ | डॉ. एस. एस. मारकड | सहाय्यक प्राध्यापक |
| ३ | प्रा. एस. ए. सावळे | सहाय्यक प्राध्यापक |
| ४ | श्री एस. व्ही. पाटील | कनिष्ठ लिपीक |
| ५ | श्री एस. एस. पाटील | कनिष्ठ लिपीक |
| ६ | श्री ए. व्ही. पालके | सेवक |

# परिवर्तन

२०१९-२०

## अंतरंग

- मराठी विभाग
- हिंदी विभाग
- इंग्रजी विभाग
- अहवाल विभाग



आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा २०१९ उद्घाटनावेळी उपस्थित मान्यवर

समाज परिवर्तन गौरव पुरस्कार २०१९ चे मानकरी मा. पन्नालाल (भाऊ) सुराणा यांचे समवेत





अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. श्री लक्ष्मणराव ढोबळे यांच्या समवेत संस्था पदाधिकारी व प्राचार्य एस. एस. गोरे

सोलापूर विभाग उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. राजश्री देशपांडे, डॉ. तारासिंग नाईक यांची महाविद्यालयास शासकीय भेट





सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यक्रमामध्ये मार्गदर्शक श्री संदीप नलवडे यांच्यासोबत डॉ. एस. डी. भिलेगांवकर व विद्यार्थी

मायक्रोसॉफ्ट प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत व्हर्च्युअल फील्डट्रीप कार्यशाळेत सहभागी बी.एड. प्रशिक्षणार्थी व तज्ज्ञ मार्गदर्शक मा. श्री रणजीतसिंह डिसले व प्राध्यापक






राष्ट्रीय परिषद उद्‌घाटन प्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विकास घुटे, तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. सुनिता मगरे व उपस्थित मान्यवर




माजी विद्यार्थी (बॅच १९९३-९४) मेळाव्यात मार्गदर्शन करताना डॉ. एस. एम. लांडगे व उपस्थित मान्यवर



शिक्षणशास्त्र महाविद्यालय व कवी कालिदास मंडळाच्या वतीने आयोजित 'मेघदूत' पुरस्कार प्रदान करताना मान्यवर



'पारंपारिक दिवस' प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांच्या समवेत प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनी



बी.एड. शालेय आंतरवासिता अहवाल प्रकाशन करताना प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, प्राध्यापक व विद्यार्थी



महाविद्यालयात 'दीपोत्सवा'चे उद्‌घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांच्या समवेत प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनी



*मी जीवनाचा एक नम्र उपासक आहे.
सभोवतालचा सारा संसार सुखी नि समृद्ध व्हावा,
ज्ञान-विज्ञान संपन्न नि कलामय व्हावा हिच एकमात्र
तळमळ आहे. माझे लिहणे वा बोलणे, माझे विचार
वा माझी प्रार्थना या एकाच ध्येयासाठी असतात.*

- साने गुरुजी

# परिवर्तन

## मराठी विभाग

# अनुक्रमणिका


| क्र. | शीर्षक | लेखक/कवी | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | वाचन संस्कृती आणि आपण | अश्विनी भोसले - बी.एड. द्वितीय | १ |
| २ | पानगांव ते बार्शी | कांबळे लक्ष्मी सुरेश - बी.एड. द्वितीय | २ |
| ३ | आधार | जितेंद्र निंबाळकर - एम.पी.एड. द्वितीय | ३ |
| ४ | मनमोहक गुलमोहोर | मोनिका देशपांडे - बी.एड. द्वितीय | ४ |
| ५ | मला भावलेले राधाकृष्णन | योगिता कातुरे - बी.एड. द्वितीय | ५ |
| ६ | गुरु | कांबळे लक्ष्मी सुरेश - बी.एड. द्वितीय | ६ |
| ७ | शाळेतील आठवणी | योगिता कातुरे - बी.एड. द्वितीय | ७ |
| ८ | साबणाचे पत्र | अपेक्षा पवार - बी.एड. प्रथम | ८ |
| ९ | आशावाद | जितेंद्र निंबाळकर - एम.पी.एड. द्वितीय | ११ |
| १० | गरज सार्वजनिक शिक्षण मजबुतीची | मयुर माने - बी.एड. द्वितीय | १२ |
| ११ | आयुष्य | योगिता कातुरे - बी.एड. द्वितीय | १३ |
| १२ | आणि १५ ऑगस्टसाठी हजेरी लावली | मयुर माने - बी.एड. द्वितीय | १४ |
| १३ | लव्ह फॉर्मेशन | शितोळे विजयसिंह - बी.एड. द्वितीय | १५ |
| १४ | कोरोना व्हायरस | मयुर माने - बी.एड. द्वितीय | १६ |
| १५ | चिंगीला बघायला येतात | अपेक्षा पवार - बी.एड. द्वितीय | १७ |
| १६ | खूप जगलो इतरांसाठी | अश्विनी भोसले - बी.एड. द्वितीय | १९ |
| १७ | गेले ते दिवस, राहिल्या त्या आठवणी | सैफ अली आलम नदाफ - बी.पी.एड. | २१ |
| १८ | मैत्री - एक नातं | अश्विनी इटकर - बी.एड. द्वितीय | २३ |
| १९ | संस्कार | शहेजीनाफातेमा खान - बी.एड. प्रथम | २३ |
| २० | सर | सैफ अली आलम नदाफ - बी.पी.एड. | २४ |
| २१ | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील जीवन जाणीवा | प्रा. डॉ. महादेव सदाशिव डिसले | २५ |
| २२ | कॉलेज लाईफ | कांबळे लक्ष्मी सुरेश - बी.एड. द्वितीय | ३० |
| २३ | कारगिल विजय दिवस | माने विशाल हणमंत - बी.एड. द्वितीय | ३१ |
| २४ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ - वर्धापन दिन | क्षीरसागर पल्लवी - बी.एड. द्वितीय | ३२ |
| २५ | पाठ्यपुस्तकातील पाठ विद्यार्थ्यांनी खुद्द लेखकाकडून अनुभवला | प्रा. डॉ. परमेश्वर पाटील | ३३ |
| २६ | आठवण | लोंढे शितल - बी.एड. द्वितीय | ३४ |

# वाचन संस्कृती आणि आपण

**भोसले अश्विनी**
बी.एड. द्वितीय


आजच्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग अधिकच जवळ आले आहे. याच तंत्रज्ञान विषयक प्रगतीने आज आपण अनेक बाबतीत स्वतंत्र व स्वावलंबी झालो आहोत. परंतु असे म्हणतात की, ज्याप्रमाणे काळ आपल्यासाठी बरेच काही घेऊन येतो त्याचप्रमाणे जाणारा काळ आपल्याकडून बऱ्याच गोष्टी हिरावूनही नेत असतो. या प्रक्रियेचे अगदी ताजे उदाहरण म्हणजेच इंटरनेटच्या आगमनानंतर कमी होत चाललेली आपली वाचन संस्कृती होय.

आपल्या शिकण्या-शिकवण्याच्या प्रक्रियेत माध्यमांनी खूप मोठा बदल घडवून आणला आहे. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात बसून आपण जगाच्या दुसऱ्या टोकाला असलेली कोणत्याही प्रकारची माहिती मिळवू शकतो. आजकाल तर जगात प्रकाशित झालेले कोणतेही ई-वर्तमानपत्र आपण एका क्षणात मिळवून वाचू शकतो. तंत्रज्ञान क्षेत्रातील ही प्रगती आता प्रत्येक व्यक्तीपर्यंत येवून पोचली आहे. वाचण्याचे व माहिती मिळविण्याचे असंख्य पर्याय देणाऱ्या या इंटरनेटने मात्र आपली वाचनाची सवय हिरावून घेतली. आजकाल कोणत्याही विषयाची माहिती मिळवायची असेल तर बहुतांशी लोक एखादी व्हिडीओ क्लिप पहाणे किंवा ऑडिओ ऐकणे पसंत करतात. एखाद्या गोष्टीचा संदर्भ शोधायचा झाल्यास विकीपीडिया किंवा गुगलवर सर्च केले की माहिती मिळवण्याची आपली प्रक्रिया तेथेच थांबते.

आज संपूर्ण जगात आपले ज्ञान वाढविण्याची, जग समजून घेण्याची सर्वाधिक साधने आपल्या हातात आहेत. परंतु समजून घेण्यासाठी वाचनाची जी चिकाटी लागते, चिंतन आणि मनन करण्याची जी सवय आवश्यक असते ती नाहिशी होत चाललेली दिसून येते. आत्ता आपणाला कदाचित वाचनाचे महत्त्व लक्षात येणार नाही परंतु काही दिवसानंतर जाणवेल की आपली वाचनाची सवय मुळासहित गायब झाली आहे.

वाचनाची सवय ही केवळ एक सवय नसून काहीतरी करुन दाखविण्याचा, काहीतरी बनण्याच्या प्रयत्नांचा एक भाग आहे. आपली बालपणापासूनची जडणघडण, बौद्धिक विकास यासाठी महत्त्वपूर्ण आहे. वाचनाची सवय आपल्याला खूप काही देते म्हणजेच आपल्याला प्रगल्भ बनवते. वाचनातून आपल्याला जगभर फिरुन आल्याचा आनंद मिळतो. आपण पुस्तकांना आपले जवळचे मित्र मानतो. पुस्तकातील ज्ञानाचा खजिना आपल्याला प्रत्येकक्षणी उपयोगी पडतो. पुस्तके इतिहासासंबंधी अत्यंत उपयुक्त माहिती देतात.तसेच भविष्यासंबंधी मार्गदर्शन करतात. इतरत्र प्रवास करुनही जे अनुभव आपणास मिळणार नाहीत ते वाचनातून मिळतात. नव्याकोऱ्या पुस्तकाचा तो सुगंध वाचन करण्यास आजही किती प्रेरित करतो. त्याचप्रमाणे अगदी जुन्या पुस्तकांबरोबर आपल्या कित्येक आठवणी जुळलेल्या असतात. असे अनुभव आपणाला कोणतीच व्हिडीओ क्लिप देवू शकत नाही.

आजवर असा कोणताच विषय नाही ज्याची माहिती वाचनातून मिळू शकत नाही. त्यासाठी केवळ वाचनाची आवड व सवय असायला हवी. वाचताना डोळ्यांसमोर उभे राहणारे प्रसंग आपणाला खूप काही देवून जातात. इंटरनेटवरुनही आपमाला खूप काही माहिती मिळते. परंतु त्यामुळे आपली विचार करण्याची क्षमता खुंटते. वाचनाची सवय आपल्याला केवळ वाचनासाठी प्रोत्साहित करते असे नव्हे तर वाचत असलेल्या विषयातील जास्ती जास्त माहिती ग्रहण करण्याची सवय व क्षमता वाढवते. त्यामुळे तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली तरी या इंटरनेटच्या युगात आपण वाचनाची सवय ठेवली पाहिजे.



# पानगांव ते बार्शी

**कु. कांबळे लक्ष्मी सुरेश**
बी.एड. द्वितीय

नेहमी प्रमाणे सकाळी उठणे, आवरणे चालू होते. सकाळी मी कॉलेजला जाण्यासाठी बार्शीला निघाले. प्रत्येकाला आयुष्यात प्रवास करताना काही अनुभव येत असतात. मला कधी वाटले नव्हते माझ्याही वाट्याला असा अनुभव येईल आणि तो मी तुमच्यापुढे मांडेन. मी सोलापूर ते बार्शीच्या बसमध्ये बसले. त्या बसमध्ये खूप गर्दी होती. एकही सीट रिकामे नव्हते. तसेच मधली जी रिकामी जागा असते तिथे सुद्धा गर्दी खूप झाली होती. त्या बसमध्ये अनेक तरूण मुले-मुली होत्या. तसेच म्हातारी माणसंही होती. एका सीटवर एक वृद्ध जोडपे बसले होते. त्यांनी मला बसण्यासाठी थोडी जागा करून दिली. माझ्या जवळच दोन-तीन तेवीस-चोवीस वर्षांच्या मुली उभ्या होत्या. त्यांच्या मागे एक समवयस्क मुलगा उभा होता. त्या मुलींच्या बोलण्याच्या आणि भाषेच्या शैलीवरुन जाणवले की त्या खूप दूरवरुन आलेल्या असाव्यात.

आता तुम्हा सर्वांना तर माहितच आहे की सोलापूर ते बार्शीचा रोड म्हणजे खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा तेच कळत नाही. बस ड्रायव्हरने अचानक खड्डा आलेला पाहून ब्रेक दाबला. तसा तो मुलगा त्या मुलीला धडकला. मुलीने कोणताही विचार न करता त्या मुलाच्या कानाखाली वाजवली. तो चुकून धडकला होता हे तिने समजूनच घेतले नाही. मुलगा तिला सॉरी देखील बोलला. परंतु तिला त्याच्या भावना समजल्याच नाहीत. तोही आता काही न बोलता गप्प बसला.


थोड्या वेळानंतर तो मुलगा त्या मुलीच्या नकळत पुढे जावून उभा राहिला. पुन्हा एकदा बस ड्रायव्हरने अचानक ब्रेक दाबला आणि यावेळेस ती मुलगी त्या मुलाला धडकली. त्या मुलानेही क्षणाचाही विलंब न लावता त्या मुलीच्या कानाखाली वाजवली. यावेळेस मात्र तिला स्वतःच्या चुकीची जाणीव झाली. पण वेळ निघून गेली होती. तिला आता स्वतःचीच लाज वाटत होती. यावेळेस तिला स्वतःच्या चुकीची जाणीव झाली. पण आता सॉरी म्हणायला देखील तिच्याकडे शब्द नव्हते. तिच्या चेहऱ्यावरुन दिसत होते ती खूपच ऑकवर्ड फील करत होती.

मित्रांनो, यावरुन मला हेच सांगायचे आहे, कोणतीही गोष्ट करण्या आगोदर आपण थोडासा विचार करायला हवा. यात त्या दोघांचीही चूक नव्हती. चूक होती ती समाजात घडत असलेल्या वाईट प्रवृत्तीची. मी हे म्हणत नाही सगळेच बरोबर असतात किंवा चुकीचे असतात. हुशारी यातच आहे की, आपण वेळ जाणून घ्यायला हवी. कोणीतरी महान तत्वज्ञ सांगून गेले -

''बोलून विचार करण्यापेक्षा विचार करुन बोला.''

या प्रसंगाला अनुसरुन मीही असेच म्हणेन, माझ्या मित्र मैत्रिणींनो -

''कृती करुन विचार करण्यापेक्षा विचार करुन कृती करा.''



# आधार

**जितेंद्र रामराव निंबाळकर**
एम.पी.एड. द्वितीय

**जी**वन खूप सुंदर आहे. पण जीवनाचा आनंद मात्र घेता आला पाहिजे. कारण सुख प्राप्ती पर्यंत निम्मं आयुष्य संपलेलं असतं. आज प्रत्येक जण सुखाच्या पाठीमागे धावताना दिसतो आणि प्रत्येकाची सुखाची व्याख्या देखील भिन्न आहे. हे झालं सुखाचं. पण याचा पाया मात्र नेमका काय असतो याचा विचार मात्र आपण कधी करत नाही. कारण आपल्या सुखात समाधानात अनेकांची साथ, मदत पाठबळ व सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आधार असतो हेच मुळी आपण विसरलेलो असतो.

खरच प्रत्येकाच्या जीवनात खंबीरपणे उभे राहण्यासाठी कोणाच्या ना कोणाच्या आधाराची गरज असते. प्रत्येकजण हा आधार शोधण्याचा प्रयत्न करत असतो. पण हा आधार प्रत्येकाला भेटतोच असं नाही. अगदी सुरुवातीपासून विचार केला तर आपले आई-वडील हेच आपले आधाराचे काम करताना दिसतात. पण...

आधार म्हणजे काय ? तर यास आपण 'खांब' असं देखील म्हणू शकतो. कारण पूर्वी माणूस राहण्यासाठी छप्पर/झोपडीत राहत असे किंवा जनावरांचे बांधलेले शेड यामध्ये 'मेडके' असायचे. हे काय करायचे तर संपूर्ण भार आपल्यावरती पेलायचे. पण कुठं मेडके मोडकळीस आलं तर टेकु देऊन आपण पुन्हा त्याला उभं करायचं. पण मेडके तेच त्या झोपडीला, त्या जनावरांच्या शेडला आधार द्यायचं. पण तेच नसेल तर झोपडीचं काय ? त्या शेडचं काय ?

आता मात्र ह्या काँक्रेटच्या जंगलात आधार म्हणून पिल्लर आहेत. ते देखील खांबाचीच भूमीका पार पाडताना दिसतात. पण इथला आधार हा पिल्लर सारखा नकलुपी आहे. माणसाला देखील आधाराची गरज असते. निसर्गानेच तशी रचना केली आहे. आपल्या शरीराचा विचार करा. बघा ताठ मानेने जगण्यासाठीच कमरेपासून मानेपर्यंत हाडांचा सापळा. तो काय करतो तर संपूर्ण शरीराला आधारच देतो ना तो. तो नसता तर ? बरं हे झालं शरीराचं. पण मनाच काय ? मन देखील असचं आधार शोधीत फिरत असतं, भटकत असतं. पण ते जाणवत नसतं. याच मनाला कधी मित्राच्या रुपात, कधी प्रेमाच्या रुपात, कधी गुरु, आई, वडील कोणत्याही रुपात ते सापडतं व या आधाररुपी विश्वात ते अडकते. शेवटी ही नाती म्हणजेच आधारच हो.

आधार म्हणाजे काय ? आधार म्हणजेच मैत्री, प्रेम, माया, सोबत होय. मैत्रीत काय असतं ? आधारच ना ! एखाद्या मित्राला आपण मदत करतो म्हणजेच त्याला आधारच देतो ना. आर्थिक मदत असच काही नाही. काही वेळा मानसिक आधार पण देतोय ना. पण याच मैत्रीत वेळ प्रसंगी आपण कोणतीच मदत केली नाही तर काही मैत्रीची नाती दुरावतात. प्रेमामध्ये काय असतं ? एकमेकांना साथ देणं, मन जपणं व त्यास आधार देणं हेच ना ! प्रत्येक नात्यात हा आधारच महत्त्वाचा असतो. तोच आधार हरपला की नाती संपतात. या नात्यात मीपणा येतो. तेव्हा हा आधार दुरावतो व यामध्ये एक मोठी दरी निर्माण होत असते. जेव्हा तुम्ही आधार काढाल तेव्हा मात्र ही नाती फक्त सांगण्यासाठीच असतील हे मात्र निश्चित.

काही लोकं खूप मोठ्या मनाची असतात. कारण त्यांना त्या आधाराची किंमत माहिती असते. ज्यांना आधार नसतो तीच ध्येयवेड्या सारखी आधार शोधित मोठी बनतात व शेवटी स्वतः आधार म्हणून समाजापुढे उभी राहतात. दातृत्वाची भावना ही याच लोकांची जास्त असते. जी लोकं रागवतात, ओरडतात पण त्यामागे त्यांना तुम्ही स्वतः आधार बनून आदर्श बनावा हाच हेतू असतो.

आपल्या जवळ काही नसताना दुसऱ्याला देणारी श्रीमंत माणसं फार क्वचित आढळतात. त्यांना माहित आहे की आपण दुसऱ्याला देण्याइतपत मोठे नाही. पण त्यांची भावना खूप मोठी असते.

कारण त्यांना पण या 'आधार' परिस्थितीतून जावं लागलेलं असतं.

प्रत्येकाचं मन हे अशाच आधाराला शोधत असतं आणि ज्या ठिकाणी स्थिरावतं त्या ठिकाणी त्याला मनमोकळं, आनंदी व प्रसन्न वाटतं. येणाऱ्या प्रत्येक संकटांना सामोरे जाण्यासाठी त्याला आधाराचीच गरज असते. एखाद्या वेळी संकटं जेव्हा 'आ' वासून समोर उभे राहतात तेव्हा आपल्या समोर तो आधारच दिसतो. मग तो कोणत्याही नात्याच्या स्वरूपात असो. मनाची इच्छा पूर्ण करण्याची क्षमता म्हणजेच तो आधार होय. या आधाराला प्रत्येक वेळी संकटांची गरज असते असं नाही, तर कधी त्याला मायेने ओथंबलेले हात तर कधी सावरणारे शब्द सुद्धा गरजेचे असते. या ठिकाणी मला कुसुमाग्रजांची कविता आठवते –

''खिशाकडे हात जाताच हसत-हसत उठला
पैसे नको सर जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा ''


यासारखा पाठीवर हात ठेवून आधार देणारे हात गरजेचे आहेत. पण लढ म्हणणारे हात कमी पडताना दिसताहेत.

आजच्या या धावपळीत मनाला समजणारे, दिलासा देणारे, योग्य काय अयोग्य काय हे सांगणारे आधार आज गरजेचे आहेत. समाजात हाच आधार स्वार्थी व कामापुरता झालेला दिसतो. हाच आधार वेळ प्रसंगी निघून जातो. हाच आधार माझं काय म्हणून विषय सोडून देतो.

समाजात आता अशा आधाराची संख्या खूप कमी आहे. तुमच्या समस्येला 'होय' म्हणून सोडून देणारे लोक खूप आहेत. माझा काय संबंध ही विचारसरणी आज घरा-घरात दिसून येते. यातूनच आधार हारपलेली कित्येक मुले आज दुसऱ्याच विचारत फिरतात. काही सुधारतात, तर काही भरकटत जाताना समोर दिसतात. यातूनच काही जण आधार शोधतात. पण हा आधार त्यांना किती साथ देतात किती विचारतात हे पण अनिश्चितच. आपले आई-वडील हे जरी आपल्या आधाराची भूमिका मांडत असले तरी भिरभिरणाऱ्या मनाला स्थिरावणारा आधार थोड्या जणांना भेटतो. तसे गुरु लाभणे हे पण भाग्याच असतं.

म्हणूनच या इंटरनेटच्या युगात सगळं काय मिळेल तुम्हाला. एकपरी आधाराचे शब्द भेटतील पण आधार देणारे हात मात्र सापडणार नाहीत. आधारच नात्यातील प्रेम टिकवून ठेवतो. प्रत्येकाला न समजणारी प्रेरणा म्हणजेच हा आधार होय. शेवटी आधार सापडत नाही आणि मागून मिळत नाही तर तो निर्माण होत असतो. नाहीच सापडला आधार तर आपल्या पाठीवरती हात मारुन स्वतः आधार व्हायच असतं आणि दुसऱ्याला द्यायचा असतो. शेवटी, देहाचाच 'खांब' करुन आपणच आभाळभर फुलायचं...

मी देखील तुमच्या सारखा आधारवेडा...!



# मनमोहक गुलमोहोर

**मोनिका देशपांडे**
बी.एड. द्वितीय

**मा**नवी आयुष्यात एका पाठोपाठ एक ऋतु येतच असतात. त्यातला दाहक ऋतु म्हणजेच उन्हाळा. त्याला दाहक किंवा येणाऱ्या बहाराचे वेध लावणारा, मनाला गोड चटका लावून जाणारा ऋतु म्हणता येईल. उन्हाळा आला की अगदी पायाला चटके बसू लागतात. त्याच्यासोबत तो मनाला हूरहूर लावणारा बहर घेवून येत असतो. रंगीबेरंगी फुलझाडांना पिवळा धम्मक बहावा, पांढरा शुभ्र चाफा आणि लालकेशरी रंगाच्या अनेक छटा ऐटीत मिरवणारा गुलमोहोर. कधी कधी निसर्गात घडणाऱ्या काही मोहक गोष्टी खूप काही सुखाचे क्षण आपल्या ओंजळीत नकळत, सहजपणे टाकतात. नेहमीप्रमाणे वसंत ऋतू गुलमोहराने फुलायला सुरवात केली.

ग्रीष्माचा दाह शीतल होवून जातो. आयुष्य अगदी मनमोहक फुलपाखरासारखं भिरभिर उडू लागतं. मन चैतन्यमय होवून जातं. जसं अलगद सुखावलेलं शांतावलेलं मन पुन्हा वेडपिसं होवून सैरभैर होतं. वसंत ऋतु गुलमोहराच्या अलगद स्पर्शाने तो सांगतो कसा ''एवढे घाव, राग, द्वेष, कटुता सारं सारं सोसूनही मी कसं ठामपणे उभा आहे.'' तो सांगतोय की, ''जीवनात शिशीरानंतर वसंत येणारच गं, या वसंताचं स्वागतही करायला हवं. मी बघ अंगोपांगी बहरलोय.'' त्याचा आणि माझ्यातल्या या मुक संवादानं मन अगदी हलकं झालंय.

गुलमोहर म्हणजे ओल्या तरल स्वच्छंदी भावनांची हळव्या मनाला आपल्या लाल-केशरी कवेत बेधुंद करणारा, अबोल असूनही खूप खूप काही सांगणारा धगधगत्या उन्हाच्या झळांना न जुमानता मोठ्या दिमाखात उभा राहून येणाऱ्या जाणाऱ्यांचे हसत मुखाने स्वागत करणारा, मनाच्या हिंदोळ्यावर झुलवणारा, आपल्या मोहक सौंदर्याचा साज घेवून घायाळ करून मनाला भुरळ घालणारा हा गुलमोहर आपल्या लाल-केशरी, पिवळ्या-गुलाबी फुलांच्या पायघड्या सर्वांसाठी घालत असतो. एप्रिल आणि मे महिन्यात तर याचं फुलणं अंगोपांगी बहरलेलं असतं.

वाऱ्याला अलिंगने देवून त्याच्याशी गुजगोष्टी करणारा, त्याच्या स्पर्शाने मोहरणारा हा गुलमोहर किती मनमोहक असतो. फुलांनी बहरलेल्या डहाळ्या सतत वाऱ्यावर हेलकावे घेत मला सतत सांगत असतात, ''नेहमी हसत राहा.'' हा सहनशीलतेचा कानमंत्र देणारा गुलमोहर पुन्हा एकदा नव्यानं बहरला.

असा हा गुलमोहर याच्या लालेलाल रंगावर सुवर्णरेखी बुंदके, ताठ मानेचे केसर, त्यांची ऐट, रुबाब आणि तेजवर्ण, मोहक केवळ अवर्णनीय. गुलमोहराकडे पाहिलं की असं वाटतं आपण सगळे का नाही होत असं गुलमोहरासारखं... ?





# मला भावलेले राधाकृष्णन

**योगिता मोहन कातुरे**
बी.एड. द्वितीय

गुरुब्रह्मा गुरुर्विष्णू, गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरु साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः ।।

याचा अर्थ असा की, गुरु हे ब्रह्मा, विष्णू, महेश या तिनही रुपात आहेत. सगळे विश्व गुरुमध्ये सामावले आहे. अशा गुरुला माझा प्रणाम आहे. गुरु-शिष्य परंपरा भारतीय संस्कृतीमधील एक महत्त्वपूर्ण आणि पवित्र भाग आहे. जीवनात आई-वडिलांची जागा कुणीच घेऊ शकत नाही. कारण आम्हाला या सुंदर जगात आणण्याचे श्रेय त्यांचेच असल्याने जीवनातील सर्वांत पहिले गुरु आपले आई-वडिल असतात. भारतात प्राचीन काळापासून गुरु-शिष्य परंपरा असून शिक्षक हे आम्हाला जगण्याचा योग्य मार्ग दाखवतात. योग्य दिशेकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित करतात.

दरवर्षी ५ सप्टेंबर या दिवशी 'शिक्षक दिन' साजरा केला जातो. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीच्या निमित्ताने शिक्षकांप्रती आदर प्रकट करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. 'गुरुं'चे प्रत्येकाच्या जीवनात महत्त्व असतं. समाजात त्यांचे एक विशिष्ट स्थान असतं. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षणात विश्वास ठेवत असून ते एक महान दार्शनिक आणि शिक्षक होते. त्यांना शिक्षणाप्रती अत्यंत प्रेम होते. एक आदर्श शिक्षक म्हणून त्यांच्यात सर्व गुण विद्यमान होते. याचे स्मरण म्हणून या दिवशी संपूर्ण देशात भारत सरकारद्वारे श्रेष्ठ शिक्षकांना पुरस्कार देऊन सन्मानित केलं जातं.

गुरु गोविंद दोनो खडे काके लागू पाय ।
बलिहारी गुरु आपने, जिन गोविंद दियो बताय ।

जर गुरु आणि ईश्वर दोन्ही साक्षात माझ्यासमोर उभे राहिले तर मी कोणाचे चरण आधी स्पर्श करु ? गुरुचे की माझ्या परमेश्वराचे असा प्रश्न जर मला कोणी केला, तर माझे उत्तर केवळ एकच असेल की, मी आधी माझ्या गुरुचे चरण स्पर्श करेन. त्यांनीच मला परमेश्वराचे दर्शन घडवले असे संत कबीर सांगतात.



शिक्षक एकाच बागेत भिन्न रुपरंगाची फुलं जोपासणाऱ्या माळ्याप्रमाणे असतो. विद्यार्थ्यांना काट्यांवर हसत चालण्यासाठी प्रेरित करतात. आज प्रत्येक घरात शिक्षण पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे आणि 'अध्ययन केंद्रित समाज' हे प्रत्येक शिक्षकांचे स्वप्न असतं. म्हणून शिक्षक हे सन्मानाचे हक्कदार आहेत. कारण शिक्षकच चांगले चरित्र निर्मिती करु शकतात.

In the word 'Teacher' every letter shows the qualities of teacher. T) Trained, E) Efficiency, A) Ability, C) Character, H) Honesty, E) Eager, R) Responsibility.

डॉ. राधाकृष्ण यांचे शिक्षकांप्रती असलेले प्रेम व आदर पाहून भारत सरकारने त्यांचा जन्मदिन हा 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करण्याचा संकल्प केला. ती परंपरा आजतागायत सुरु आहे. १९६२ मध्ये डॉ. राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिन म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याचे त्यांनी सांगितले होते.

डॉ. राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी मद्रासजवळील तिरुराणी येथे झाला. ते ब्राह्मण कुळातील असल्याने त्यांच्या घरात नेहमी धार्मिक विधी केले जात असत. त्या धार्मिक वातावरणातच ते लहानाचे मोठे झाले. वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी त्यांनी मॉट्रिक परीक्षा उत्तीर्ण केली. तत्त्वज्ञान हा त्यांचा आवडता विषय असल्याने त्यांनी या विषयात पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी

मद्रासच्या एका एका महाविद्यालयात नोकरी केली. नोकरी करत असतानाही त्यांनी शिक्षण सोडले नाही. त्यांनी 'वेदांतातील नीतिशास्त्र' या विषयावर प्रबंध सादर केला. त्यांच्या प्रबंधास विद्यापीठाने सर्वोत्तम प्रबंध म्हणून जाहीर करुन त्यांचा गौरव केला. एक उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून त्यांनी आपल्या कार्यातून स्वतःची साऱ्या जगाला ओळख करुन दिली. कुशल व्यक्तिमत्त्व व इंगजी भाषेवरील त्यांच्या प्रभुत्वामुळे परदेशातसुद्धा त्यांची प्रशंसा झाली. ऑक्सफर्ड विद्यापीठातही ते 'नीतिशास्त्र' या विषयाचे प्राध्यापक होते.

शिक्षकांना वैदिक काळापासूनच गुरुचे स्थान आहे. त्यांच्या ऋणातून आपण कधीच मुक्त होऊ शकत नाही. आज शिक्षणाचे अवमूल्यन केले जात असल्याचे चित्र समाजात दिसत आहे. तसेच गुरु शिष्य संबंधांमधील पवित्र भावना लोप पावत आहे. या संबंधामधील पावित्र्य कायम ठेवण्यासाठी शिक्षक दिन साजरा केला जातो.

शिक्षक हा समाज परिवर्तन करणारा घटक आहे. भविष्यातले विचारवंत, कलाकार, लेखक, तत्त्वज्ञ, पुढारी, डॉक्टर, प्राध्यापक, इंजिनीयर, शास्त्रज्ञ तयार करण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये आहे. ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्याला कुंभार आकार देऊन त्यापासून एखादी प्रतिकृती तयार करत असतो, अगदी त्याच प्रमाणे शिक्षक बालकांच्या कोऱ्या मनावर योग्य संस्कार करून त्यातून भविष्यातील जबाबदार नागरिक घडवित असतात. आपल्या आई-वडिलांनंतर शिक्षक हे आपले अप्रत्यक्षरित्या पालकच असतात.

शिक्षक हे आपल्याला केवळ पुस्तकी ज्ञान शिकवित नाहीत तर आपण त्यांच्याकडून जगण्याची कला आत्मसात करत असतो.

''जो जयाचा घेतला मी गुण ।
तो तो मी केला गुरु जण ।।''

आपल्या व्यक्तीमत्त्वावर गुरुंकडून संस्कार संस्कृती, परंपरा, चालीरिती, आदर असे पैलू पाडले जात असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुंचा नेहमी आदरपूर्वक सन्मान करावा. त्यांच्याविषयी शिक्षक दिनी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी प्रयत्न करुन त्यांचे ऋण फेडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

---

# गुरु


**कांबळे लक्ष्मी सुरेश**
बी.एड. द्वितीय

साध्याशा वेषात
उच्चकोटीचे संस्कार जपणारे गुरुवर्य
नाही बरं विसरलो आम्ही शाळेला
जग राहाटीत आज ही जपलंय तुम्हाला...

आज ही वाटतं
त्या पोक्त अन् श्रेष्ठ खोडांना
घरी बोलवावं
साऱ्या आठवणी जागवाव्यात...

कधी रागीट नजर तर कधी
संस्काराची केलेली खैरात
सारं सारं अश्रूंनी मोकळं करावं
अन् ऋण व्यक्त करावं...

घ्यावा सरांना शर्ट पॅन्ट
अन छान साडी बाईला
सांगावी आपली प्रगती
अन द्यावं सारं श्रेय त्यांना...



घ्यावित टवटवीत फुलं
वाहवीत त्यांच्या पायावर
अन् छानसं पुस्तक द्यावं
त्यांच्या हातावर...

गुरुवर्य
असं समजु नका
आम्ही तुम्हाला नाही आठवत
सारं शिकवूनही तुम्ही आहात रिक्त
तुमच्या ऋणातून होऊत का
कधी आम्ही मुक्त ?...
म्हणूनच हे गुरुऋण झालंय व्यक्त...

# शाळेतील आठवणी

**कातुरे योगिता मोहन**
बी.एड. द्वितीय

आम्ही तरी काय मोठे आहोत, काय हो ? लहानच तर आहोत; पण आमचं वय मोठं घोटाळ्यात टाकणारं आहे हे नक्की. त्याचं काय आहे, आता आम्ही शिक्षक होणार... तेव्हा प्रसंग हा सदर शाळेतील विद्यार्थ्यांसोबतच येतो. मग आम्ही 'ना घरके, ना घाटके' अशी स्थिती अधिक वाटते. कारण लहाणपण हातातून आमचं निसटतं आहे, दूर दूर जात आहे. ते आता पुन्हा मिळणं असाध्यच आणि मनुष्य स्वभाव कसा ?...

''सहज मिळे त्यात जीव तृप्तता न पावे ।
जे सुदूर जे असाध्य तेथे मन धावे ।।''

हातून निसटलेले बालपण म्हणूनच मोठे रमणीय वाटत असावे. ते लहाणपणाचे दिवस आठवून आता हसूही येतं अन् चुटपुटही लागते.

मी गावी अंजनसोंडा, ता. भूम, जि. उस्मानाबाद येथे मामाकडेच अंगणवाडीत शिकण्यासाठी होते. रोज आजी, मामा, मावशी यांच्यासोबत राहून गावातल्या अंगणवाडीत जावे लागे. मामा, आजी, मावशी माझा डबा शेजारच्या माईकडे ठेवून जात शेतात. संध्याकाळी परत येत असत. तेव्हा मी लहान असल्याने आमच्या माई जसं सांगतील त्यापद्धतीने रहावे लागे. माई सतत खेळायला लावत.

पुढे पप्पांची बदली चेंबुर येथे झाली. त्यामुळे मलाही त्यांनी शाळेत शिकण्यासाठी सोबत नेले. मग मी पण तेतील म.न.पा. शाळेत चेंबुरला जात होते. उशीरा जून महिना निघून गेल्याने मोठ्या मुश्किलीने मला ॲडमिशन मिळाले होते. करमत नव्हते. सगळे वेगवेगळे वातावरण वाटत होते. मग काही दिवसांनी थोडे रूळल्यावर शेजारपाजाऱ्यांशी गट्टी झाली. गप्पा व्हायच्या. शेजारच्या ताई रोज मला शाळेत जाताना डोक्यावर गुलाबाचे फूल लावायला द्यायच्या. खूप मज्जा वाटायची. तेव्हाचा तो पप्पांसोबत जावून केलेला बॉयकट त्यावर सुंदर गुलाबी गुलाबाचे फुल, मस्त पिन लावलेली, ड्रेस पण करुन ! आज ते दिवस खूप गमतीशीर वाटतात.

संध्याकाळी शाळा सुटली की घरी येणे. वाटेत असणारी बिल्डिंगमधील कुत्री भुंकायची. वाटायचे काय माघारी शाळेकडे जावे काय ? मग त्या अंकलने दिलेली सहानुभूती, 'कुत्रा चेनने बांधलाय!' तसेच घरी यायचे रडत पडत पण घरच्यांना सांगायचे नाही. आमच्या रुम शेजारी बंगालचे कुटुंब होते. नुसते अंटी अंकल सतत ड्युटीवर दिसायचे. अंटीकडे जायचे टीव्ही बघायचा, गप्पा मारायच्या, लुडो खेळायचा, मिठाई खायची.

संध्याकाळी अंटी शॉपिंगला जाण्यासाठी मेकअप करायची. अल्ता लावायची. मला पण तिने पायावर अल्ता लावून दिला. लाल लाल रेखा चमकणाऱ्या बघून खूप मजा वाटायची.

हळूहळू मी इ. ४ थी मध्ये गेले तेव्हा आम्हाला श्री किरण विसपुते हे वर्गशिक्षक होते. वर्गामध्ये हळदी-कुंकवाचा कार्यक्रम करायचे ठरले. मी पण सहभागी झाले. सर्वांनी नवीन कपडे परिधान करायचे होते. सर्वांनी ५-५ रुपये वर्गणी गोळा केली. सर्वांना गिफ्ट म्हणून चमचे देण्याचे ठरले आणि फुलं, तिळगुळ आणले. पुढे असे झाले की, ज्यादिवशी बाहेर पडायचे त्यावेळेसच नेमके अजून काहीतरी वेगळे करावे असे वाटे. ह्यापेक्षा काहीतरी तरी वेगळे. अजूनही ती सरांनी केलेल्या भेळेची चव जिभेवर रेंगाळते आहे. सरांनी मस्त लाह्या, चुरमुरे, कोंथिंबीर, फरसाण घालून केलेली भेळ, अगदी बारीक चिरुन टाकलेल्या मिरच्या. खूप मज्जा आली सर्वांना. एकमेकांना 'तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला'चा सुर आळवला.

काही दिवसातच विजयमाला मोरखडे, सपना आघाव, पंचशिला इ. आम्ही सगळ्या जिवलग मैत्रिणी झालो होतो. सोबतच जेवायचो, सोबतच अभ्यास. त्या सगळ्या आर. सी. एफ. कॉलनीतल्या नसल्या तरी पण खूप जवळच्या वाटायच्या. आर. सी. एफ. कॉलनीतला केवळ प्रशांत गवळी होता.

त्यांचे बाबा सी.आय.एस.एफ. मध्ये कॉन्स्टेबलचा जॉब करत होते. आमच्या घराशेजारीच त्यांचे घर होते. त्यामुळे त्याचे बाबा आमच्या पप्पांना सांगत, ''तिला आमच्या घरी लावा, मी घेऊन जातो शाळेत.'' कारण पप्पांना ब्लड कॅन्सरचा आजार असल्याने सतत दवाखान्याकडे चकरा माराव्या लागत.

आणि शाळेकडे जाणारे रस्ते पण खूपच गर्दीचे आणि आवाढव्य वाहने वाहणारे होते. मी लहान असल्याने त्यांच्या घरीच जावे लागे. पप्पा घरी नसले तर आईला घड्याळ न समजल्याने मी लवकरच म्हणजे १२.३० ची शाळा तर ११ ते ११.३० पर्यंत प्रशांतच्या घरी जाई. तेव्हा प्रशांतने आंघोळ केलेली नसे. नेटकाच उठलेला असे. आमचे घरात जंगी स्वागत झाले की मग त्याची आई माझी विचारपूस करी, ''योगिता काय शिकवले सरांनी ? काय अभ्यास दिलाय सरांनी ?'' तेव्हा मी सगळे काही सत्यवानाप्रमाणे खरे सांगे. त्याची आई आम्हाला मग चहा चपाती खायला देई. त्याला रागे भरत. अभ्यास का करत नाही म्हणत. त्याच्या वह्या बघत. वडील असले तर पाईपने मार खाई. मला पण खूप वाईट वाटे. मला वाटे मलाच का विचारतात ? शाळेत विचारवे. मी काय केलंय ? प्रशांत पण कधी कधी खूप चिडे. चिडून मला म्हणे, ''योगिता कशाला येती गं आमच्या घरी ? आमचे पप्पा मला मारतेत.'' मला मग आणखी कसेसेच होई. वाटे मी जे आहे ते खरे बोलले यात माझा काय दोष ? पुढे सुविचार ही आहे तसा...

''नेहमी खरे बोलावे. नेहमी सत्याची कास धरावी.''

पण आम्ही सर्व जे. एन. पि. टी. विद्यालय शेवा येथे ट्रान्स्फर झालो. इ. १ ली ते ४ थी पर्यंत वर्गात प्रथम क्रमांक. पुढे इ. ५ वीला ॲडमिशन घेतले. 'क' तुकडीत ॲडमिशन झाले. कृष्णा तांडेल सर लाभले आम्हाला गुरुवर्य म्हणून. खूप आनंद झाला. सर खूप छान शिकवत. अतिशय शिस्तप्रिय होते. त्यावेळी सानेगुरुजी पुस्तक वाचन व प्रश्नोत्तरे स्पर्धा होती. सर्वांना सानेगुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक वाचण्यासाठी दिले गेले. सर्वांनी ते पुस्तक वाचून काढले. मी पण वाचले. मग असे लक्षात आले की मागे काही झालेल्या घटनांचा तुलनात्मक अभ्यास सुरु झाला.

सर ऑफ तासाला भाषण स्पर्धा घेत. मी कधी न बोलणारी त्या दिवशी चक्क ४ मि. बोलत होते. सरंनी माझे खूप मोठे कौतुक केले. त्यानंतर काही कालावधी लोटल्यावर म्हणजेच इ. ६ वीत आमची ओळख ज्योती ठाकरे मॅडमशी झाली. त्या आम्हाला गणित हा विषय शिकवत. गणित विषयाची भरघोस तयारी करून घेत. संध्याकाळी ५ वाजता आम्ही त्यांच्या घरी शिकवणीला जात असू. मॅडम आम्हांला सगळे विषय व्यवस्थित शिकवत. गणिताचा, इंग्रजीचा विशेष ध्यान देऊन आभ्यास घेत. संध्याकाळी ८ वाजता प्रार्थना, स्तोत्र पठण यांना विशेष महत्त्व त्या देत. दरारोज आमच्याकडून प्रर्थना, मारुतीस्तोत्र म्हणून घेत व एक गोष्ट सांगत.

खूप आनंद वाटे. मॅडमचा मुलगा प्रथमेश तो आम्हा सर्वांना ताई-दादा म्हणून हाक मारी. मला तर योगिता ताई, योगिता ताई म्हणे. एप्रिल महिन्यात १ तारखेला आमच्या वार्षिक परीक्षेसंदर्भात शिकवणी चालू होती. आम्ही सर्वजण संध्याकाळी मॅडमनी सांगितल्या प्रमाणे क्लासमध्ये अभ्यास करत होतो. तेव्हा मॅडम आम्हाला काही उदाहरणे समजवत होत्या. त्यावेळी रेखाने नियोजित केल्याप्रमाणे प्लॅस्टिकची पाल मॅडमच्या मांडीच्या बाजूला ठेवली आणि मोठ्याने ओरडली ''पाल पाल''...

त्यावेळी मॅडम खूप घाबरल्या आणि दचकून उठल्या. आम्ही पण सगळे मॅडमदेखत घाबरलो खोटं-खोटं. पण आता वाटते आम्ही किती चुकलो. पुन्हा मॅडम झाडू घेऊन आल्या तेव्हा रेखा जोरात ओरडली ''एप्रिल फूल !!!'' तेव्हा मग सगळ्याजणांनी सुटकेचा श्वास सोडला आणि एकदम म्हणालो, ''मॅडम एप्रिल फूल झाल्या !!!'' मॅडम आम्हाला तेव्हा काही ओरडल्या नाहीत, पण हसल्या मात्र नक्की. तो त्यांचा मोठेपणा होता.

अशा काही गंमतीजमती करुन खूप मज्जा वाटायची. आता नेमका धूलिवंदनाचा सण ! खूप रंग उडवायचे, टाकायचे म्हणून आम्ही घरी खूप रंग आणले. त्यावेळी सकाळी ८ वा. उठून पेटवलेल्या होळीची राख कपाळाला फासून आम्ही रंग उडवण्यासाठी निघालो. संगिता, ज्योती आणि मी अजून दोघी. सर्वजणी मिळून बिल्डिंगमध्ये फिरत



होतो. घरोघर जाऊन सर्वांना आम्हांला तुम्हांला रंग लावू द्या म्हणून विनंती करत होतो. एक टिक्का तरी लावू द्या असे म्हणत होतो आणि रंग लावून पळत होतो. दार वाजवत फिरत होतो. हे पाण्याने भिजलेले कपडे, हातातले रंगीबेरंगी पाण्याने भरलेले फुगे, विविध रंग, पाण्याच्या बकेटी जणू काय इंद्रधनुष्यच पृथ्वीवर अंथरल्याची किमया वाटत होती. पुढे भविष्यात आपण आपला मौल्यवान वेळ कसा सत्कारणी लावतो याची धास्ती पडली होती. त्यावेळी मनात खूपच लुडबूड होत होती. असे करता करता ११ वाजले, ११ चे १२ झाले. पोटात कावळे ओरडत होते.

नंतर पुढे आम्ही सगळ्या जणींनी मिळून आपापल्या घरातून थोडे थोडे गव्हाचे पीठ, मसूरदाळ, तांदूळ, मसाला डबा, स्टोव्ह, पातेले, पाणी इ. साहिल्य घेऊन गच्चीवर गेलो. तिथे पाण्याच्या टाकीखाली आंघोळ केली. वरूनच तसेच ओलेचिंब लागलोत की स्वयंपाकाला. कणिक मळली, चपात्या केल्या. मसूरडाळीचे वरण केले. भात केला. नंतर सर्वजण बसून जेवण केले आणि धूवून साहित्य परत घरी नेले. सर्व स्वच्छ केले. अशी आम्ही आगळी वेगळी होळी साजरी केली. खूप मजा आली अजूनही त्याची आठवण येते हो... 'गेले ते दिवस... राहिल्या त्या आठवणी...''

अजून एक आठवण सांगायची म्हणले तर - आम्ही इयत्ता सातवीत होतो. त्यावेळी आम्हांला आमच्या कार्यानुभव विषयाच्या बाईंनी खरी कमाई करून आणण्यास सांगितले होते. त्यामध्ये आम्ही बिल्डिंगमध्ये कुणाच्या पण घरी जायचो, त्यांच्या घरी जाऊन एखादे काम करून लागेल ती किंवा ते देतील ती रक्कम घेऊन घरी यायचे व ती रक्कम मॅडमकडे गोळा करायची. ज्यांची रक्कम अधिक होईल त्यांना मॅडम बक्षीस देणार होत्या. आम्ही सर्वजणी एकत्रित हिंडू लागलो. काम मागू लागलो. देतील ते काम करू लागलो आणि पैसे घेऊ लागलो. तेव्हा काहीजण काम न देता तशीच रक्कम हातावर ठेवत होते. खूपच उसने उसने वाटत होते. पण काहीजण नाहीत पैसे, उद्या या म्हणत होते. तेव्हा तर वाटे कसे काय आपले भागणार आता. कसे मिळणार बक्षीस. माझे कुठे ₹ ८७/- पूर्ण झाले. मॅडमकडे जमा केले पण मॅडम आम्हाला काहीच बोलल्या नाहीत. छान म्हणल्या आणि बक्षीस पण दिले नाही. कुठेतरी मदतनिधी म्हणून पाठवले. पण त्या मॅडमचा विशेष दरारा बाबा... त्या विविध प्रकारचे केक, सॅण्डविच, सजावटीच्या वस्तू, रुमाल विणणे, सरबत बनवणे, शिलाईचे प्रकार, स्काऊट गाइड, टाकाऊपासून टिकाऊ इ. गोष्टी अम्हाला शिकवत असत त्यामुळे त्याचे काम ऐकावेसे वाटे.

इयत्ता ६ वीत असताना माझी मैत्रीण जान्हवी, प्रज्ञा, मिनाक्षी आम्ही सगळ्यांनी मिळून खूप छान छान गोष्टींची पुस्तके, थोरांच्या चरित्रांच्या गोष्टींची पुस्तके, चंपक, ठकठक इ. पुस्तके विकत घेतली. प्रत्येकीने स्वतःची एक लायब्ररी केली. आम्ही एकमेकांना ती पुस्तके वाचायला देत असू व वाचून झाल्यावर परत घेत असू. आपला अनुभव शेअर करत असू. शाळेतील लायब्ररीतूनही पुस्तके मिळवून वाचत असू. पण आज शाळा बदलली तशी वाचनाची गोडी असूनही पुस्तक वाचनातला आनंद जशाच्या तसा अनुभवता येत नाही.

अशा सर्व माझ्या बालपणीच्या शाळेतील आठवणी खूप आहेत. पण काय करावे ? एकदा अशा आठवणी आल्या तर कधी दुःख तर कधी सुखाची झालर वाटतात. त्यामधून विविध मूल्यांची उधळण झालेली पाहावयास मिळते. सध्याच्या युगाप्रमाणे त्यावेळी इंटरनेट, मोबाईल नसल्याने केवळ आनंद कसा लुटायचा ते ठाऊक होते.

''मन वढाय वढाय
उभ्या पिकातलं ढोरं

किती हाकला हाकला
फिरी येतं पिकावर ।।''

या शाळेतल्या आठवणी आठवताना माझी तर अशीच स्थिती झाली बुवा ! कारण सांगायचे तर असे की...

''गुरुब्रह्मा गुरुर्विष्णू गुरुर्देवो महेश्वरः
गुरुःसाक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः ।।

अशी गुरुची महती आपल्या धर्मग्रंथात गायलेली आहे. गुरु अज्ञान दूर करणारा आहे. शिक्षक - शि = शिस्तप्रिय, क्ष = क्षमाशील, क= कर्तव्यदक्ष.

आणि अशा सर्व शिक्षकांनी मिळून लाभलेली आमची शाळा, आमचे मित्रमैत्रिणी सर्वांना या गोड गोड आठवणी बद्दल धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. अगदी ताराच्या शाळेच्या आठवणी सारखे. म्हणून प्र. के. अत्रे यांच्या ओळी गाव्या वाटतात...

''ही आवडते मज मनापासूनी शाळा
लाविते लळा ही, जसा माऊली बाळा
हासऱ्या फुलांचा बाग जसा आनंदी
ही तशीच शाळा, मुले इथे स्वच्छंदी
हासुनी हसवुनी, खेळूनी सांगूनी गोष्टी
आम्हांस आमुचे गुरुजन शिक्षण देती ।।१।।

मला असे वाटते की, मखमलीच्या पेटीत ठेवाव्यात जपून सऱ्या आठवणी. त्यांचा सुगंध दरवळावा जीवनी. व्हावे मन माझे स्वच्छंदी, ताजेतवाने दररोजच...

---

# साबणाचे पत्र

**अपेक्षा पवार**
बी.एड. प्रथम

प्रिय,

निरमा ताईस,

सप्रेम नमस्कार वि.वि.

पत्र लिहण्यास कारण की, बरेच दिवस झाले तुझी गाठ भेट नाही. लॉकडाऊनमुळे आता तेही होणं अशक्य वाटायला लागलं. इकडे लाईफबाय लंडनहून परत आलाय. त्याने स्वतःचे नाव बदलून लाईफबॉय प्लस केल्याने सनलाईट व त्याचे भांडण झाले. भांडण सोडवण्यासाठी फेअरग्लो मध्ये पडला. त्यामुळे त्यालाही बराच मार बसला. त्याला लगेचच डॉ. डेटॉलकडे नेण्यात आले. सुरुवातीला डॉ. डेटॉलची अपॉइंटमेंट मिळणं देखील मुश्कील व त्याची फी देखील परवडेनाशी होती. परंतु जेव्हा दुसरे साबण देखील वापरण्यासाठी योग्य आहेत कळताच त्याची फी कमी झाली. आनंदाची बातमी म्हणजे लक्स व पिअर्स यांचे लग्न ठरले आहे. हमाम काका व गोदरेज काका लग्नाची तयारी करत आहेत.

मोती काकांच्या मुलाचे लग्न शिकेकाईशी झाले. लग्न समारंभासाठी सर्व साबण परिवार उपस्थित होता. पतंजलीच्या भटर्जींनी लग्न लावले. व्हील बाईनी कपड्यांची व्यवस्था केली. मेडिमिक्सने सगळ्यांना जेवण वाटले. तर विमबारने सगळी भांडी घासली. पॉन्डस आणि जॉन्सन बेबी आता शाळेत जाऊ लागले आहेत. मावशीची तब्येत कशी आहे पत्र लिहून कळव.








तुझाच

सिंन्थॉल

# आशावाद

**जितेंद्र रामराव निंबाळकर**
एम.पी.एड. द्वितीय

असं म्हटलं जातं की ज्याच्याकडे स्वप्ने नाहीत, जी आशावादी नाही ती व्यक्ती गरीब असते. परंतु ज्याच्याकडे आशावाद आहे त्या व्यक्ती देखील कुठं श्रीमंत असतात ? खरंतर आशावादी व्यक्तीच खूप दुःखी होत जाताना दिसतात.

एखाद्यानं ठरवलेलं स्वप्न पूर्ण करताना येणाऱ्या अपयशातूनच तो अधिक दुःखी बनतो. हा आशावाद ठेवायचा किती ? येणाऱ्या संकटाना तोंड देताना पुन्हा आशावाद जागा करुन पुन्हा त्याच खोट्या आशावादावरती तो किती दिवस जगू शकतो ? त्याच आशावादावरती होत्याचं नव्हतं ही होतं.

त्यापेक्षा संकटांना, समस्येला सामोरं जाणं हेच योग्य. फक्त आशावाद ठेवून भविष्याची स्वप्ने रंगवताना वर्तमानातील जीवन संपवायचं कशासाठी ? समजा जर स्वप्नपूर्ती झालीच तर येवढ्या यातना सोसून मिळालेला आनंद त्याच्या नशीबी किती ? हा एक प्रश्नच आहे.

आपल्या हातातील गोष्टीच आपणास आनंद मिळवून देतात. आपल्या हाती नसणाऱ्या गोष्टीची इच्छा किती करणार ? या खोट्या गोष्टीवरच दिवसा मागून दिवस जातात अन् हाती फक्त स्वप्नं राहतात.

दुष्काळी परिस्थिती असताना, पावसाचा थेंब देखील नसताना आशावादी शेतकरी पेरणी करतो. यासाठी पैसे मोजतो, कर्ज काढतो पण पाऊसच नाही. या खोट्या आशेवरती की पाऊस पडेल, पीक येईल पण असं काहीच होत नाही. उलट या आशावादामुळेच कर्जाचा डोंगर उभा राहतो. त्याचे डोळे आभाळाकडे असतात. इतरत्र पाऊस सुरु आहे. आज माझ्या शेतात पाऊस पडेल. पण फक्त काळे ढग येतात आणि निघून जातात. तो वाट पाहत बसलाय. दिवस संपतो, रात्र होते. रात्रीची पहाट होते तरीही पावसाचा एक थेंब देखील पडत नाही. परत दुसऱ्या दिवसाची सुरुवात.

हा शेतकरी या आशावादी दृष्टीनेच, त्याच्या प्रामाणिकपणामुळे आशावादी वृत्तीमुळे कर्ज फेडू शकत नाही. म्हणून तो स्वतः संपून जातो.

किती हा आशावाद. हा आशावाद म्हणजेच आपल्या मनाची अंधश्रद्धाच आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती मग ती शेतकरी, कामगार, नोकरदार असो कुठंतरी या आशावादाच्या मागे लागलेला दिसतोच. हा अशावाद म्हणजे मृगजळच होय.

एखादा तरुण प्रेम करताना प्रत्येक वेळी मनाला सावरताना दिसतो. खोट्या आशेवरच चार-पाच वर्षे वाया घालवतो. दरवर्षी येणाऱ्या पावसाच्या काळ्या ढगाप्रमाणे तो देखील आशावादी राहतो. पण पाऊस कधी येतच नाही. तसं त्याला प्रेम कधी मिळतच नाही आणि हिच व्यक्ती निराशेच्या खोल गर्तेत जाते. त्याची काहीच चुक नसताना जीवनाचा आनंद गमावून बसते. प्रत्येक क्षण, प्रत्येक वेळ या आशावादी वृत्तीवर घालवते व प्रत्येक वेळी त्यांच्या पदरी निराशाच येते. प्रत्येक वेळी लागणाऱ्या ठेचाच त्याला निराश व दुःखी बनवतात.

आज समाजामध्ये ध्येय, उद्दिष्ट, सामाजिक भान, आशावादी व्यक्ती बद्दल घडवणारी व्यक्तीच या आशावदी दृष्टीनेच दुःखी व मनोरुग्ण झालेल्या दिसतील. यामध्ये कितपत आशावाद आहे की अंधश्रद्धा हे देखील तपासून पाहवं लागेल.

याउलट आशावादी नसणाऱ्या व्यक्तीच आनंदी व येणाऱ्या संधीचा, प्रसंगाचा फायदा घेत अपयशाला बोट दाखवत मस्त जगतात.

हे जरी मी तुम्हाला सांगत आसलो तरी मी देखील एक तुमच्यासारखाच आशावादी...



# गरज सार्वजनिक शिक्षण मजबुतीची


**मयुर माने**
बी.एड. द्वितीय

**भा**रतीय शिक्षणाचे होणारे बाजारीकरण तसेच गरीब होतकरु विद्यार्थ्यावर होणारा अन्याय व शिक्षणाची संधी मिळताच सिद्ध केलेली गुणवत्ता असे अनेक लेखन करतो वाचन करतो तसेच आपण आपल्या सध्याचे शिक्षणाचा आढावा घेऊ.

खरं तर देशाच्या विकासासाठी आधुनिक व नैतिकमूल्ये असलेले शिक्षण ही महत्त्वाची बाब आहे. देशाच्या शिक्षण व्यवस्थेमुळेच देशाला चांगला दर्जा प्राप्त होण्याचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून देशात शिक्षणाचा चांगला दर्जा असावा म्हणून शिक्षण मोफत व सक्तीचे तसेच योग्य व चांगल्या प्रकारे मिळणे आवश्यक असते. पण शिक्षणाबद्दल सरकारची असलेली मानसिकता, व्यावहारिक आणि अद्ययावत शिक्षणाचा अभाव, व्यवसाय स्वातंत्र्याखाली शिक्षणाचे होत असलेले बाजारीकरण तसेच शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या शिक्षक भरतीमध्ये लाखोंचा भ्रष्टाचार यामुळे शिक्षण क्षेत्राचे मोठ्याप्रमाणात नुकसान होत आहे. मित्रांनो देशात खाजगीकरण व स्वायत्तता देण्यामागे शिक्षणाचा प्रसार, गुणवत्ता धारक संशोधक वृत्ती हा उद्देश होता. परंतु काही शिक्षणसंस्था हा पैसा कमाविण्याची केंद्रं बनली. उदा. २०११ साली जिल्हाधिकारी डॉ. श्रीकर परदेशी यांच्या कल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रभर शिक्षक पटपडताळणी झाली. त्यात अनेक विद्यार्थी व शिक्षक बोगस निघाले होते. त्यांच्या नावाने अनुदान घेतले पण तिथे ती संख्या नव्हतीच. यामध्ये काही प्रमाणात चांगल्या संस्था देखील आहेत. अपवाद एखादी संस्था असेल. त्यामध्ये शिक्षकांना, प्राध्यापकांना नेट, सेट पात्र असून देखील पैसे मागीतले जातात. तर सध्या ५ ते ६ वर्षे झाली डी.एड. उत्तीर्ण असलेल्या मुलांची शिक्षक भरतीच नाही. भरती ही फक्त कंत्राटी पद्धतीने आहे. भरती करण्यास बंदी आहे. मग गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळणार कसे ?

सध्या व्यवसाय स्वातंत्र्य दिल्यामुळे खाजगी शाळांच्या पूर्व प्राथमिक मधील एका वर्गाचे शुल्क हे पन्नास हजार ते एक लाख पर्यंत आहे. खरच लहान मुलांच्या शिक्षणासाठी एवढी मोठी रक्कम घेणे आवश्यक आहे का ? खाजगी अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षण याचे डोनेशन तर ऐकायला नको असे आहे. तिस हजार ते लाख रुपये भरुन देखील गुणवत्तेच्या बाबतीत सरकारी संस्था या मागेच आहेत. इंडिया रँकिंग २०१९ नुसार १०० शिक्षण संस्थांची गुणवत्तेनुसार पहिले पाच क्रमांक हे सरकारी शिक्षण संस्थाचे आहेत. मग आपण एवढे डोनेशन देऊन देखील खाजगी शिक्षण संस्था या यादीत का नाहीत ? जगाचा विचार केला तर आपली शिक्षण व्यवस्था ही मागेच आहे.

खाजगी क्लास मार्गदर्शन शुल्क पण भरपूर प्रमाणात लाटतात. दहावी, बारावी, आय.आय.टी., एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी. क्लास मोठ्या प्रमाणात चालतात. याच्यातून लाखो-करोडो रुपयांची उलाढाल होते. पण गुणवत्तेची गॅरंटी काय ? याची जाहिरात करणारा एक अधिकारी होतो व तो स्वतः क्लास काढता येत नाही म्हणून स्वतःच्या भावाच्या व बहीणीच्या नावाने चालू करायचा व तिथे मार्गदर्शन करायचे. या क्लासमध्ये अमर्याद असे विद्यार्थी. एक विद्यार्थी यशस्वी झाला की त्याची



जाहिरात करुन त्याच्या नावे प्रवेश करून घ्यावयाचे. विशेष म्हणजे तर काही महान तर यापुढे जावून एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी. उत्तीर्ण व्हायचे, मुलाखती द्यायच्या, देशसेवेसाठी चाललो म्हणायचे आणि स्वतःचीच ॲकडमी निर्माण करायची. सध्या या ॲकडमीचा नुसता कचरा चालू आहे. हे गैरव्यवहार रोखण्यासाठी सरकारने घटनेतील कलम ३३ मधील तरतुदीचा वापर करुन अधिकाऱ्यांच्या अधिकारांवर काही बंधने घालणे आवश्यक आहे. खाजगी क्लासच्या मार्फत पुस्तके प्रकाशित केली जातात.त्यावर बंधन असावे.भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ अ नुसार मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार हा सर्व विद्यार्थ्यांचा मुलभूत हक्क आहे.

खाजगी शिक्षण संस्थाच्या शिक्षक भरतीमध्ये पारदर्शकता निर्माण करण्यासाठी राज्य पातळीवर एक परीक्षा आयोजित करणे. त्या माध्यमातून शिक्षकाची भरती केली पाहिजे. महाराष्ट्र सरकारने कमी पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद केल्या. यावरुन सरकारी शाळेकडे दुर्लक्ष आणि खाजगी व्यवस्थापनाच्या शिक्षण संस्थांना अनुकूल असे वातावरण निर्माण केले. यातून विद्यार्थ्यांना मूलभूत हक्कापासून अप्रत्यक्षपणे दूर करत आहे. खाजगी शाळेत मुले जातील. पण गरीब कुटुंबातील मुले कुठे जातील शिकण्यासाठी ? म्हणून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज आहे. आपल्या ६८% तरुण लोकसंख्या असलेल्या देशासाठी धोकादायक आहे. देशाचा विकास करण्यासाठी शिक्षणक्षेत्रात लक्ष देऊन सुधारणा करण्याची गरज आहे.

समाजातील सर्व घटकांना पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक पर्यंत मोफत आणि दर्जेदार शिक्षण देऊन उच्च शिक्षण योग्य शुल्क घेऊन उपलब्ध करणे. त्यातून स्वावलंबी, कार्यक्षम, वैज्ञानिक दृष्टीकोन, नैतिकता, बुद्धिप्रमाण्य, राष्ट्रीय चारित्र्याचे भान असलेली तरुण पिढी बनवणे. त्यातून भारताची निर्मिती सक्षम होईल. शिक्षकांची योग्य वेळी भरती करणे, शिक्षकांना योग्य असे दर्जेदार प्रशिक्षण देणे, तसेच इंग्रजी, गणित, विज्ञान इ. विषयांचा संपूर्ण देशात एकच अभ्यासक्रम असावा. तर इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र यासारख्या विषयांचा देखील ७०% एकच अभ्यासक्रम संपूर्ण देशात असावा आणि ३०% अभ्यासक्रम त्या त्या राज्याचा असावा. शिक्षक भरती करताना शिक्षकास बी.एड., एम.एड. सक्तीचे करावे. तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण मसुदा याचे नियम व अटी योग्य रीतीने अंमलबजावणी केल्यास शिक्षण उत्तम आणि दर्जेदार मिळेल, त्यामुळे शिक्षणाचे बाजारीकरण होणार नाही.

---

# आयुष्य

**कातुरे योगिता**
बी.एड. द्वितीय

चुका होत जातील
तू सुधारत जा...

वाटा सापडत नसतील
तू शोधत जा...

माणसं बदलत जातील
तू स्वीकारत जा...

परिस्थिती शिकवत जाईल
तू शिकत जा...

येणारे दिवस निघून जातील
तू क्षण जपत जा...



विश्वास अनेक जण तोडतील
तू सावरत जा...

प्रसंग परीक्षा घेऊन जातील
तू क्षमता दाखवत जा...

आयुष्यातल्या घटना खडतरता दाखवत जातील
तू टिकून रहात जा...

आयुष्य आहे... असं चालायचंच !

# आणि १५ ऑगस्टसाठी हजेरी लावली...

**मयुर माने**
बी.एड. द्वितीय

पुर आलेल्या ठिकाणी भेट देऊन त्यांना मदत देण्याचे काम बार्शीतील विविध संघटना तसेच युवक मोठ्या प्रमाणात करत होते. पण त्या ठिकाणी पाण्यात जाण्याचे कोणाचे धाडस होत नव्हते.

मला समाजसेवा करण्याची आवड. पण मला त्या ठिकाणी जाता येत नव्हते. बी.एड. शिक्षण घेत असताना ही महापूर परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामध्ये कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांना मोठ्या प्रमाणात शेतीचे व मनुष्याचे नुकसान झाले होते. मी हे फक्त ऐकत होतो.

वार शनिवार त्याच दिवशी बी.एड. च्या सर्व वह्या पूर्ण करणे, तपासणी करणे व प्रपाठ परीक्षा घेतल्या होत्या. नंतर सायंकाळी ५ वाजेपर्यंत काही वह्या तपासून मी माझ्या सहकाऱ्याला ''मित्रा तू उरलेल्या वह्या तपासून घे. मी नाही उद्या.'' असे सांगून घरी आलो. माझे कपडे वगैरे पूर्ण आवरले. एका ठिकाणी आम्ही मित्र एकत्र आलो. त्या ठिकाणी दिवसभर कोणी वस्तू स्वरुपात कोणी आर्थिक स्वरुपात मदत केली होती. (दोन दिवस पुरेल ऐवढे धान्य, पाणी बाटली) यासाठी आम्ही किट तयार करावयाचे ठरवले. संध्याकाळी ७ वाजल्यापासून रात्री २:३० वाजेपर्यंत किट तयार करण्यात वेळ गेला आणि सकाळी चार वाजता निघायचे ठरले. एकूण २० जणांची टीम तयार झाली. यासाठी तीन गाड्या करण्यात आल्या. एका गाडीत पूर्ण माल व औषध साहित्य होते तर दुसऱ्या गाडीत पाणी बॉटल व तिसऱ्या गाडीत आम्ही सर्वजण होतो.

वार रविवार पहाटे चार वाजता निघालो. सर्वजण गाढ झोपले होते. पंढरपूर पासून पुढे पाऊस चालू झाला. सांगोल्यात गेल्यावर एका मोठ्या सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तीशी संवाद झाला. त्याला देखिल तिकडेच जायचे होते. तो गुंजमधील युवक होता. तो दिल्ली वरुन आला सोलापूरला व नंतर तो सांगलीला निघाला होता. सांगलीला पुढे गाडी व एस.टी. जात नव्हती. पण त्याला घेवून पुढे गेलो. शिरढोन येथे त्याला सोडले व त्याच्या बरोबर आम्ही नाष्टा केला. त्याने आमच्या कार्याचे कौतुक केले. पण कौतुक तर खरे त्याचे करायला पाहिजे. सर्व रस्ते बंद असून देखिल त्याने रस्ता काढून तेथे पोहचण्याचा प्रयत्न केला होता व त्याला पुढे रिपोर्टिंग करायचे होते की इथं महापुरात किती नुकसान झाले आहे ? कशाची आवश्यकता आहे ? व तो ते मागवून लोकांपर्यंत पोचवत होता.

पण मग आम्ही ठरविले की सांगलीत जायचं नाही. कारण तेथे भरपूर मदत येत आहे. त्यापेक्षा आपण खेड्यात जावून मदत करावी असे ठरले. आमच्यात गट तयार केले. प्रत्येकाला वेगवेगळे काम देण्यात आले. एक गट कीट घेणे, दुसरा गट औषध, तिसरा गट पाणी बॉटल, चौथा गट ज्या कुटंबाला गरज आहे अशाचा शोध घेणे असे ठरले. वरुन पाऊस सरुच होता. आमच्या गाड्या अडवल्या आणि आम्हाला सांगण्यात आले की येथेच वाटा. पण आम्ही तेथे माल खाली केला नाही. कारण आमचं ठरलं होतं की खरच ज्या गावाला महापूराचा फटका बसला. तेथील लोकांनाच देणे.

आम्ही एका गावात पोहचलो. त्या गावाला कोणतीही मदत मिळाली नाही व तेथे कोणी गेले नाही. मग खरी सुरवात झाली ती आम्ही नेलेल्या वस्तूंच्या वाटपाची. सांगली जिल्ह्यामधील ताकारी, रेढरे आणि जत. सातारा जिल्ह्यामधील खुबी, रेठरे बु., रेठरे खुर्द, शेरे, दुशेरे, मालखेड, पोठले, आटके, वाठार या गावाला भेट दिली व नंतर आम्ही कांसेगाव या ठिकाणी गेलो. तेथे तर आख्खं गाव एका हॉलमध्ये होते. हे सांगली जिल्ह्यातील तांबवे गाव होते. पूर्ण गाव पाण्याखाली होते.

सर्वजण कृष्णाकाठच्या पुरग्रस्तासाठी मदतीचे हात पुढे करत होते. पण मला एका कुटुंबातील माहिती सांगाविशी वाटते. कारण या कुटुंबात एकूण सहा व्यक्ती व काही जनावरे होती.

त्यामध्ये कुटुंबातील मुलगी १० वीला व मुलगा बी.ए. ला होता. एक आजी व आई-वडील असे कुटुंब. आमच्यातील एका सहकाऱ्याने मुलीला विचारले, ''तू अभ्यास कसा करशील ?'' तेव्हा ती मुलगी रडू लागली. तिच्या वडिलांनी सांगितले, ''ती अभ्यास करत बसली होती. अचानक जोरात पाऊस आला. बाहेर येऊन पाहतो तर चोहो बाजूने पाणीच होते. त्यात घरातील सर्व सामान भिजले व काही पाण्यात वाहून गेले. तसेच शेतात लावलेला निम्मा ऊस पाण्यात कुजला तर काही वाहून गेला.''

प्रत्येक गावात शेकडोहून अधिक लोक बेघर होते. पाणी असून पाणी पिण्याची सुविधा नव्हती. फक्त प्रत्येक व्यक्तीच्या डोळ्यात पाण्याचे थेंब दिसत होते. प्रत्येकजण मिळेल त्या ठिकाणी आसरा घेत होते. काही गावांत जाण्यास व मदत देण्यास आम्हाला अडचण येत होती. पण आम्ही



थांबलो नाही. गाडी एका ठिकाणी लावली व तेथून वस्तू घेऊन त्या गावात जात असू. गुडगाभर चिखल, वरुन पाऊस, जेवण केलेले नव्हते. कारण जेवणा पेक्षा या लोकांचे हाल पाहून आमची भूक हरवली होती. सतत पाऊस असल्याने गाव शोधून तेथे आम्ही मदत करण्याचा प्रयत्न करत होतो.

काही कुटुंबातील दावणीची जनावरे त्या पुरात मरून पडली होती. नदी जवळ पाहिले तर कितीतरी जनावरे मृत्यूमुखी पडलेली दिसत होती. हे गाव एकदम नदीला चिकटून होते. नागमोडी नदी सारखी नदी व याच्या तिराला चिकटून हे गाव होते. एक शाळा होती त्या शाळेतील बेंच, फळा, काही वस्तू पूर्ण वाहून गेले होते. तसेच शाळेचे पत्रे नव्हते. सर्व वर्गात फक्त आणि फक्त मातीच दिसून येत होती.

आम्ही पाहिले तर काही घरे पडली होती. त्यांचे पूर्ण संसार उघड्यावरच पडले होते. पावसाची संततधार चालूच होती. आम्ही माघारी येण्यास निघालो. एके ठिकाणी आम्हाला एका सामाजिक संस्थेने जेवण दिले. आम्ही तेथे तेथील सरपंच पत्रकार मिळून एकत्र जेवण केले व रात्री १० वाजता घरी निघालो. तीन वाजता पोहचलो व नंतर सकाळी ७ वाजता १५ ऑगस्टसाठी झेंडावंदन करण्यास कॉलेजमध्ये गेलो.

---

# Love Formation

**शितोळे विजयसिंह**
बी.एड. द्वितीय

कॉलेजमध्ये उभे राहून करायचो रोज मी observation
म्हणून ती करुन यायची रोज वेगवेगळी fashion
वाढत चालले माझे तिच्याबद्दल attraction
सतत चालायचे मनत विचारांचे calcultion
यावर मित्रासोबत केले लगेच discussion
मित्रांकडून मिळाले तात्काळ suggestion
एकदा तिला मिळाले बक्षीस म्हणून केले congratulation
ती म्हणताच thanks मी म्हटंल नो mention
यावेळी तिच्या चेहऱ्यावर पहाण्यासारखे होतेexpression
आज आपल्यामध्ये आहे कोरोना सुट्टी function
याचे कोणालाच नाही invitation
फक्त आणि फक्त तिलाच आहे permission
कारण तिचं माझ्या हृदयात आहे पहिल्या पासूनच reservation
घरच्या कडून मिळाली लगेच permission
आणि अशा प्रकारे झाले आमचे Love formation



# कोरोना व्हायरस


**मयुर माने**
बी.एड. द्वितीय

**को**रोना व्हायरस हा विषाणूंचा एक गट आहे. या व्हायरसमुळे सस्तन प्राण्याना आणि पक्ष्यांना विविध रोग होतात. यात गायींना व डुकरांना होणाऱ्या अतिसराचा आणि कोंबड्यांना होणाऱ्या श्वसन रोगाचा समावेश आहे. या विषाणुचा प्रसार मानवांमध्ये श्वसन संसर्गाने होतो. हे संसर्ग बऱ्याचदा सौम्य परंतु संभाव्य प्राणघातक असतात. कोरोना व्हायरसचा प्रतिबंध करणारी लस किंवा रोग झाल्यास घ्यायची अँन्टिव्हायरल औषधे अजूनही (२०२० सालापर्यंत) उपलब्ध नाहीत.

कोरोना व्हायरस प्रथम १५६० च्या दशकात सापडले. सर्वांत आधी सापडलेल्यांमध्ये कोंबड्यांमध्ये एक संसर्गजन्य ब्रॉन्कायटीस विषाणू आणि सामान्य सर्दी असलेल्या दोन रुग्णांमध्ये होते. (नंतर ह्युमन कोरोना व्हायरस २२ ई आणि ह्युमन कोरोना व्हायरस ओसी ४३ असे नाव देण्यात आले.) २००३ मध्ये सार्स-सीओव्ही, एचसीओव्ही एनएल, २००४ मध्ये एचकेयु व २००५ मध्ये मेर्स-सीओव्ही आणि २००५ मध्ये एसएआयएस कोव्ही-२ (पूर्वा २०१९ एनसीओव्ही म्हणून ओळखले जाणारे) या कुटुंबातील अन्य सदस्यांची ओळख पटली आहे. यामध्ये गंभीर श्वसनमार्गाचे संक्रमण होते.

कोरोना व्हायारस हे कंद आकाराच्या पृष्ठभागाचा अंदाजानुसार मोठा प्लीओफॉर्मिक गोलाकार कण आहे. व्हायरस कणांचा व्यास सुमारे ९२० एनएम (नॅनोमिटर) आहे. विद्युतपरमाणु सुक्ष्म आलेखमधील विषाणुचा लिफाफा, विद्युतपरमाणु दाट कवच असलेली एक वेगळी जोडी म्हणून दिसून येते.

**कोरोना व्हायरसच्या संसर्गाची लक्षणे :** कोरोनाची सर्वात सामान्य लक्षणे म्हणजे ताप, थकवा आणि कोरडा खोकला. काही रुग्णांना वेदना अनुनासिक रक्तसंचय, वाहणारे नाक, घसा खवखवणे किंवा अतिसार होऊ शकतो. ही लक्षणे



सहसा सौम्य असतात. काही लोकांना संसर्ग होतो, पण त्यांच्यात कोणतीही लक्षणे दिसत नाहीत पण त्यांना बरे वाटत नाही. बहुतेक लोक (सुमारे ८०%) विशेष उपचार न घेता या आजारातून बरे होतात. कोरोना होणाऱ्या प्रत्येक ६ पैकी १ व्यक्ती गंभीर आजारी पडते आणि तिला श्वास घेण्यास त्रास होतो. वृद्ध लोक आणि उच्च रक्तदाब, हृदयरोग किंवा मधुमेह यासारख्या मुलभूत वैद्यकीय समस्या असलेल्या लोकांना गंभीर आजार होण्याची शक्यता असते. ताप, खोकला आणि श्वास घेण्यास अडचण असलेल्या लोकांनी वैद्यकीय सल्ला घ्यावा.

**उपचार :** १) या आजारावर निश्चित असे औषध सध्या उपलब्ध नाही.

२) दृष्टोत्पत्तीस आलेल्या लक्षणांवर लाक्षणिक उपाय योजना करतात.

३) गंभीर अवस्थेत रुग्णाला जीवनरक्षक प्रणालीवर ठेवण्याची गरज पडू शकते.

४) स्वतःची काळजी घेणे. तुमच्यामध्ये सौम्य लक्षणे आढळल्यास, बरे होईपर्यंत घरातच रहा. आराम करणे आणि झोप घेणे. स्वतःला उबदार राखणे, भरपूर द्रवपदार्थ पिणे, खवखवणारा घसा आणि खोकला यांचा त्रास कमी करण्यासाठी रुम ह्युमिडिफायर वापरणे किंवा गरम पाण्यने आंघोळ करणे.

५) वैद्यकीय उपचार घेणे. तुम्हाला ताप असल्यास किंवा खोकला झाल्यास आणि श्वास घेण्यास त्रास होत असल्यास वेळेवर वैद्यकीय सल्ला घ्या. रोग होण्यापर्वी काळजी घ्या आणि तुमच्या डॉक्टरांना यापूर्वीच्या प्रवासांबद्दल किंवा प्रवाशांशी असलेल्या संपर्काबद्दल सांगा.

कोरोना व्हयरस (कोवीड - १९) पासून कशी काळजी घ्यायची ?

- स्वच्छ हात धुवा
- पाणी आणि साबणाने ४० सेकंद हात धुवा.
- हातरुमाल किंवा टिश्यु पेपरचा वापर करा.
- खोकताना किंवा शिंकताना नाकावर व तोंडावर रुमाल ठेवा.
- तोंड, नाक चेहरा, डोळे यांना स्पर्श करु नका.
- समोरच्या व्यक्ती सोबत बोलत असताना त्याच्या पासून कमीत कमीत तीन फुटांचे अंतर ठेवा.
- आंबट चवीच्या फळांचा आहारात समावेश करा.

२०१५ मध्ये कोरोना व्हायरसचा एक उपप्रकार चीनमधील वुहान शहरात आढळून आला. याला कोव्हिड-१५ असे नाव देण्यात आले. सुरुवातीस वुहान व आसापासच्या प्रदेशात पसरलेला हा विषाणू त्याच्या इतर उपप्रकारांपेक्षा आधिक तीव्रतेचा असून याने रोग्यांच्या मरण्याचे प्रमाण मोठे आहे.




१३ मार्च २०२० अखेर जगात १,३२,७५८ जणांना या आजाराची लागण झाली असून एकूण ४९५५ जणांचा मृत्यू झाला आहे. एकूण १२२ देशांमध्ये हा आजार पसरला आहे. चीनमधील हुबै प्रांतात या आजारामुळे सर्वाधिक बळी गेले आहेत. हुबै प्रांतातील वुहान शहरातून या विषाणूची लागण सुरु झाली. या आजारामुळे चीन देशात १३ मार्च रोजी ९९१ जणांना लागण झाली असल्याचे समोर आले. जागतिक आरोग्य संघटनेने याबाबत माहिती जारी केली आहे.

कोरोना-अमेरिकेत सर्वाधिक रुग्ण,

इटलीत ३१९ मृत्यु

महाराष्ट्रामध्ये कोरोना व्हायरसचे दिनांक २८ मार्च २०२० पर्यंत १८१ कोरोना रुग्ण आढळले आहेत. महाराष्ट्रामध्ये दिनांक २३ मार्च २०२० पर्यंत ५ रुग्णांचा मृत्यु झाला आहे. महाराष्ट्रातील इतिहासात आत्यावश्यक सेवा व सामग्री सोडून प्रथमच सर्व महत्त्वाची देवस्थाने बंद ठेवण्यात आली आहेत. लॉकडाऊन महाराष्ट्रामध्ये केलेलं आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पुढील २१ दिवस देशभरात लॉकडाऊन करण्यात आले. आता महाराष्ट्रातील कोरोनाबाधित रुग्णांची संख्या १३० वर पोहोचली आहे.

✻ कोरोना गो, गो  कोरोना...

✻ मैत्री करावी हॅन्डवॉशशी, भीती नसेल कोरोनाची.

✻ आपली काळजी आपण स्वतः घेऊया, कोरोनाला हरवूया...

✻ Stay Safe... Stay Home...



# चिंगीला बघायला येतात...

**अपेक्षा पवार**
बी.एड. प्रथम

''**चिं**गी आटोपलं की नाही तुझं ? लवकर तयार हो केव्हाही येतील ती मंडळी.''

''आई, कोणती साडी नेसू ?''

पण मी काय म्हणते आई, ''नको गं साडी. मला धड चालताही येत नाही.''

''हो नं... म्हणूनच कधीपासून कानीकपाळी ओरडून सांगते आहे, साडीची सवय कर. पण नाही. त्या बाहेरच्या मुलींच्या नादी लागून ती झबली नाहीतर ते डगले घालतात, कसला अवतार करतात हल्ली तुम्ही !''

''मग आई मी काय म्हणते, मी आपली शर्ट पॅन्टच घालते. सुटसुटीत वाटते.''

''छान, छान ! म्हणजे आमची अब्रु गेलीच समज अन् तसले कपडे घसरतात.तेव्हा आमच्यावर उपकार करा. जरा निटनेटके कपडे घाला आणि केसाच्या झिपऱ्या गळ्यात नको, डोक्यावर मध्यभागी उंच नारदासारखा बुचडा घाला.''

''आणि आई मी त्यात लाल लाल गुलाब पण घालीन. प्रेमाचं प्रतीक.''

''आता कशी शुद्धीत बोलते आहे. बस आणखी एक उपकार करा. तुला जर गाणं म्हणायला सांगीतलं तर कोणतं म्हणशील ?''



''ए आई, धूम मचाले... धूम मचाले... छान बसलंय ते म्हणते.''

''शर्थ झाली बाई तुझ्यापुढे. जनाची नाहीतर मनाची तरी...''

''बरं मग नका गडे माझ्याकडे पुन्हा पुन्हा पाहू हे म्हणते.''

''छे, छे...त्यापेक्षा माझा होशील का म्हण. आळवून, आळवून म्हण, कळलं आणि स्वयंपाक येतो का विचारले तर हो म्हणूनच सांग. पण म्हणावं पद्धत व वेळ वेगळी आहे. स्वतंत्र पदार्थ बनविण्यास वेळ फार जातो म्हणून भातात कधी भेंडी तर कधी गवार, कधी कारलं तर कधी आळूभात, मग डाळीत (वरणातच) चपात्या घालून करते. एकदम करते. जेवायला सकाळी सात व रात्री बाराचा टाईम बरा पडतो. मग दिवसभर चरचर अरबट - चरबट चरायला बरं.''

''आई हे सर्व ठीक आहे. पण मीही मुलाला प्रश्न विचारणार.''

''विचार पण आचरटासारखे काही विचारु नकोस. बरं चिंगे, बोलत काय बसलीस ? आली वाटतं मंडळी.''

''या या. आरामात बसा. चहा-पोह्याचा समाचार घ्या अन् विचारा एकीकडे मुलीला प्रश्न !''

''मुली नांव काय ?''

''अहो, नावात काय आहे ? बरं, तरीही सांगते, माझं नाव मस्तानी. मस्त नवऱ्याच्याच शोधात मी आहे.''

''हो, हो, आमचा मुलगा मस्तचं आहे. हो थोडे केस पिकलेत, दातांची फणी थोडी पुढे आहे. बंड्या विचार प्रश्न मुलीला...''

''तुम्ही टी.व्ही. बघत असालच.''

“हो रोज दिवसभर टी.व्ही. समोरच बसून असते. काम करायला वेळ आहे कुणाला ?”

“कोणत्या सिरीयल आवडतात ?”

“नवरा म्हणू नये आपला, अगं बाई सासूबाई...”

“बरं ! आवडता हिरो कोणता ?”

“अहो हिरोचं काय घेऊन बसलात ? सर्व मुलांशीच मैत्री आहे माझी.”

“बरं, लग्नानंतर पार्टीला वगैरे जावे लागेल. नाचता येते का ?”

“हो... थुई थुई नाच रे मोरा... मी छानच करते.”

“तुम्हालाही काही विचारायचं असेल तर बिनधास्त विचारा.”

“हो, हो, तुम्ही सिगरेट ओढताना ? मला तसलेच तरूण आवडतात आणि गडे मध्ये मध्ये चेंज पाहिजे म्हणून जुगार खेळलाच पाहिजे, रेसला पण जायलाच पाहिजे हं.”

“अहो हो मी शौकीन आहेच शाळेपासून.”

“काय म्हणताय ? मग आई, बाबा... आमचे जमले बघा. पसंत आहे मला मुलगा.”

“मग ठरलं तर...!”



# खूप जगलो इतरांसाठी...

**भोसले अश्विनी**
बी.एड. द्वितीय

खूप जगलो इतरांसाठी
जरा स्वतःसाठी पण जगूया...
अजून काही दिवस घरीच राहून
चला या संकटावर मात करूया...

आई म्हणाली, छान चित्र रेखाटतेस
तेव्हा कळलं अजून जमतयं की...
जुन्या आठवणी, जुन्या छंदांना उजाळा देऊया
चला या संकटावर मात करूया...

संपत चालला होता संवाद घरातला
पुस्तकांशीही नाते तुटले होते...
चांगले विचार अन् संस्कार यातूनच पुन्हा जपुया
चला या संकटावर मात करूया...

महासत्ता ही झुकल्या या आपत्ती पुढे
मानवता ही हतबल झाली
आपण काही कमी नाही हे जगाला दाखवूया
चला या संकटावर मात करूया...

अशक्य असे काहीच नाही
देशासाठी काही करण्यास
विचाराने व मनाने प्रेरित होऊया
चला या संकटावर मात करूया...

कोलमडली जरी अर्थव्यवस्था
आपण जाठ उभे राहूया...
धैर्याने अन् निश्चयाने हाही काळ पार करूया
चला या संकटावर,
या कोरोनावर मात करूया...



# गेले ते दिवस, राहील्या त्या आठवणी...

**सैफ अली आलम नदाफ**
बी.पी.एड. प्रथम

**बं**बात तापलेल्या पाण्याची अंघोळ न्हाणीतली असायची.
लाईफबॉयशिवाय दुसरी कंपनी माहीती नसायची.
ओके, ५०१ साबणाची वडी कपड्यावर घासायची.
मोती साबणाचं कौतुक फक्त दिवाळीला असायचं.
शाम्पू कुठला लावताय राव, रिठ्यानचं डोकं धुवायचं.
दिवाळीच्या एका ड्रेसवर वर्षभर मिरवायचं !
थोरल्याची कापडं धाकट्यानं झिजेपर्यंत वापराचं.
चहा चपातीची न्याहरी, उप्पीट, पोहे कौतुकानं असायचे.
पार्ले बिस्किटाशिवाय चहाला दुसरे जोडीदार नसायचे.
गोल पंक्तीत बसून सगळ्यांनी मिळून जेवायचं !
खर्डा, भाकरी, झुणका पंचपक्वानासारखं लागायचं.



गोट्या, विटीदांडू, लपाछपी, कधी कधी पत्त्यांचाही खेळ रंगायचा !
काचाकवड्या, जिबली नाहीतर भातुकलीचा डाव मांडायचा.



अधूनमधून चिंचा, पेरू, आंब्याची झाडं शोधायची,
नाहीतर जिभेला रंग चढवत गारेगार चोखायचं.
गणगाटाची बैलगाडी, त्याला त्याचाच बैल जुंपायचा.
शेंगा चेचून केलेला चिक्की बॉल दणकट असायचा.
पानं चेचून केलेली मेंहदी हातावर खुलायची,
बाभळीच्या शेंगाची जोडवी बोटात खुळखुळायची !
मनोरंजनासाठी असायचा ब्लॅक ॲण्ड व्हाईट टी.व्ही.
शनिवारी हिंदी आणि रविवारी मराठी मुव्ही.
रामायण, महाभारत, शक्तीमानसाठी रविवारची वाट बघायची !
चित्रहार, रंगोली, छायागीत यातून सलमान, माधूरी भेटायची !
शाळेला तर नियमित जायचं,

वायरीचं दप्तर पाठीवर असायचं !
उरलेल्या पानांची वही बायडिंग करायची आणि
निम्म्या किंमतीत घेतलेली पुस्तकं सोबतीला असायची.
घासातला घास शेअर करत डबे सगळ्यांचे संपवायचे.
बॉटल कुठली राव, टाकीच्या नळाला तोंड लावून पाणी प्यायचं !
जमेल तेवढं करत होतो, टेन्शन काय नसायचं
कारण, नुसतं पास झालो तरी आई-बाप खूष असायचं !
पावसाळा आला की पोत्याची गुंची करायची,
चिखलातनं वाट काढताना स्लिपर त्यात रुतायची !
एकमेकांचे हात पकडून, मुख्य रस्त्यानेच निघायचो,
रिक्षा, स्कूल बस नसली तरी घरी व्यवस्थित पोहचायचो.
दिवसभर हुंदडून पेंगत पेंगत जेवायचं,
अन् एकाच अंथरुणावर ओळीनं सगळ्यांनी निजायचं !
वाकळातल्या उबेत झोप मस्त लागायची,
दिवसभराची मस्ती रात्री स्वप्नात दिसायची !
दिवस पुन्हा उजडायचा, नवी मजामस्ती घेऊन,
रात्रीच्या अंधाराला तिथेच मागे ठेवून...









# मैत्री : एक नातं

**अश्विनी इटकर**
बी.एड. द्वितीय

मैत्रीचं हे सुंदर नातं
प्रेमाने घट्ट गुंफावं
आयुष्याच्या या वाटेवरती
एकमेकांना अलगद सावरावं

मैत्रीचे हे नातं खंरच
सगळ्यापेक्षा बेस्ट आहे
यात नाही लपवा छपवी
सगळं ओपन सिक्रेट आहे

या नात्याला आपलेपणा
नेहमीच मनाला सुखावतो
रक्ताची नाही नाती तरी
ऐकमेकांना किती जीव लावतो

दुसऱ्याचं मन कसं जपावं
हेच यात सांगावं लागत नाही
प्रत्येकाच्या आवडी निवडी
लक्षात ठेवाव्या लागत नाही

आपलेपणा असला की
व्यक्त होणं सोप होतं
नकळत प्रत्येकाचं मन
गप्पांच्या ओघात हलकं होतं



# संस्कार

**शहेजीनाफातेमा फारुक खान**
बी.एड. प्रथम

कष्ट करतो मुलासाठी रानात शेतकरी बाप
वाटते त्याला तो होईल अधिकारी
आई वडील करतात हाडाची काडे
त्याला शिकायला पाठवतात शहराकडे
खूप शिकून मुलगा होतो हुशार
आईवडिलांना वाटतो आनंद फार
शिक्षण संपवून मुलगा होतो नोकरदार
आई वडिलांचे स्वप्न होते साकार
मग काही दिवसात होते त्याचे लग्न
आई वडील असतात कामामध्ये मग्न
आई वडील जातात खुशीने भेटायला
मात्र त्याच्याकडे वेळ नाही बोलायला
आता त्याच्याकडे खूप पैसे साचतात
आई वडीलच आता नकोसे वाटतात
तो घेतो मोठी चार चाकी कार
कुठे गेले आई वडिलांचे संस्कार...



# सर

**सैफ अली आलम नदाफ**
बी.पी.एड. प्रथम

दिवाळी, उन्हाळी व गणपती, ह्या सुट्यात काय करायचे ह्याचे नियोजन मी केलेले असते. कोणत्या दिवशी काय करायचे हेही ठरलेले असते. आपण आपल्या विद्यार्थ्यांपासून दूर राहणार याची जाणीवही असते. पण गेला आठवडाभर मी एका हाकेला मुकलो आहे आणि ती हाक आहे, 'सर...'

शाळेची पायरी चढायला सुरुवात होते तोच ही हाक ऐकू येते आणि सगळे विद्यार्थी धावत पळतच माझ्याजवळ येतात. क्षणात माझ्यातला सामान्य नागरिक शिक्षक होतो. घर,संसार,जगरहाट,टेन्शन या सर्व गोष्टी विसरण्याची ताकद या शब्दात आहे.

कोणाशी कितीही मोठा वाद होऊ दे, केवढाही मोठा अपमान होऊ दे, कितीही मोठे दुखणे असू दे समोर विद्यार्थी बघितले की सारे विसरायला होते आणि त्यांना घडवायची उर्मी उफाळून येते. मैदानावर आल्यावर नवीन संकल्पना, विचार, आपोआप मनामध्ये येतात. त्यांना रोज नवीन काहीतरी खेळामधील स्कील शिकवता यावं म्हणून माझं आदल्या दिवशी प्लॅनिंग असतं. त्यांच्यासंगे तल्लीन झाल्यावर वेळचे घडयाळ कधी पुढे सरकते हेही कळत नाही. प्रत्येक वेळी तर आमच्या टीचरचं त्यांचा तास आहे म्हणून बोलवायला येतात, एवढा मी त्यांच्यामध्ये रममाण झालेलो असतो.

प्रश्न विचारल्यावर ''सर मी, सर मी'' असं ओरडणाऱ्या हुशार मुलांच्या हाकेत आत्मविश्वास जाणवतो. तर मस्ती करताना बेन्ड केल्यावर ''सर मी नाही, मी नाही'' असे ओरडणाऱ्या हाकेतून फसवेपणा लगेच समजतो.

'सर' शद्ब तेच, पण वर्गातील प्रत्येकाचा आवाज, नाद, लय वेगळी असल्याने कोणी हाक मारली हे बसल्याजागी नजर न टाकता नुसत्या श्रवणाने समजते व त्यांनी का हाक मारली असावी हेही न सांगता उमजते.

प्रि-प्रायमरीची छोटी मुले तर त्यांच्या बोबड्या बोलाने ''सर आमचं हॉर्स रायडिंग घ्या'' म्हणून मागेच लागतात. महत्त्वाचे म्हणजे लंच ब्रेक वेळी तर सैफ सरांना त्यांच्या क्लासमध्ये जेवायला न्यायची चढाओढ बघून मला कोणीतरी खूप मोठी व्यक्ती आहे असं वाटतं आणि त्यावेळी खरंच 'सर' या शद्बाची किंमत समजते.

'सर' म्हणजे तुम्हाला बाबा व आईची दोन्ही भूमिका पूर्ण शिक्षकी पेशात निभवायच्या आहेत. तसेच प्रत्येक विद्यार्थी हा शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या सक्षम बनला पाहिजे, खेळ किंवा सराव घेताना त्याचा प्रत्येक स्नायू मजबूत बनला पाहिजे, त्यांची शारीरिक क्षमता वाढली पाहिजे आणि ही सर्वस्वी तुमची जबाबदारी आहे हे बी.पी.एड.ला खूप वेळा सांगितलेले वाक्य आहे. त्यामुळे ही हाक ऐकताना आपल्या जबाबदारीची जाणीव लगेच होते.

पालकसभेत वा पालकभेटीला येतात तेव्हा ''सर, तुम्ही याला समजवा, हा काही आमचं ऐकत नाही, तुमचेच ऐकतो.'' अशा अर्थाची वाक्ये ऐकतो त्यावेळी मला या 'सर' शद्बाची ताकद समजते व पालकांचा आपल्यावरील विश्वास जाणवतो.

तर अशी ही हाक, 'सर' आजून किती तरी दिवस ऐकायला मिळणार नाही. तिच्यातल्या गोडव्याला, मायेला मी मुकलो आहे, माझ्या मनाची तगमग होत आहे. ती तगमग वाढली तरी चालेल. पण दाटीवाटीत राहणाऱ्या माझ्या विद्यार्थ्यांपर्यंत हा कोरोना संसर्ग न घडो. मला 'सर' साद घालणाऱ्या या उगवत्या ताऱ्यांना बंद घरात राहण्याची ताकद येऊ दे. त्याच्या स्वस्थ न बसणाऱ्या वृत्तीला वैज्ञानिक दृष्टीकोनाचे महत्त्व समजू दे.

मी लवकरच ऐकेन, त्यांची हाक ''सऽऽर''




# अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील जीवन जाणीवा

**प्रा. डॉ. महादेव सदाशिव डिसले**

**लो**कशाहीर, थोर साहित्यिक, शाहिर, लोकहिताच्या आणि राष्ट्रहिताच्या चळवळीमध्ये सहभाग, फुले-आंबेडकर-कार्ल मार्क्स यांचा प्रभाव असणारे अण्णाभाऊ साठे एकच दिवस शाळेत गेले मात्र त्यांनी साहित्यक्षेत्रात विविध साहित्यप्रकारात उत्तम अशा साहित्यकृती निर्माण केल्या. त्यांनी 'स्व' जीवनजाणिवेतून त्यांच्या सर्व कलाकृती निर्माण केल्याचे आपणास निदर्शनास येते. कॉम्रेड श्रीपाद डांगे यांच्या कम्युनिस्ट विचारसरणीचा त्यांच्यावर प्रभाव होता.लालबावटा कलापथकाच्या माध्यमातून त्यांनी समाजहितासाठी लढा दिला. अण्णाभाऊंचा संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सक्रिय सहभाग होता. १९५८ मध्ये झालेल्या दलित साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ''पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे'' असे सांगितले. यातून त्यांचा इतर साहित्याचा अभ्यास आणि दलित, कामगारांप्रती तळमळ दिसते. त्यांच्यावर फुले, डॉ. आंबेडकर व कार्ल मार्क्स यांचे विचारांचा प्रभाव जाणवतो.

अण्णाभाऊंचा जन्म १ ऑगस्ट १९२० ला वाटेगाव तालुका वाळवा जिल्हा सांगली येथे मातंग समाजात झाला. दलित समाजाच्या व्यथा स्वानुभवाच्या आधारे त्यांनी साहित्यातून मांडल्या. उपेक्षितांचे जीवन त्यांच्या साहित्यातून व्यक्त झाले आहे. ३३ कादंबरी, २१ कथासंग्रह, नाटक, पोवाडे, लावण्या, खटाव, लोकनाट्य, गीते, पदे अशा विविध प्रकारात त्यांनी लेखन करत शोषण, अन्याय, समानता, मानवी वृत्ती-प्रवृत्ती, अन्यायाचा विरोध, दिशादर्शक वृत्ती, व्यक्तींच्या अंगी असणारे वेगळेपण, नेतृत्व, समूह मानसीकता, वास्तविकता, वाङ्मयीन शैली अशा विविध पैलूंचे साहित्यामधून प्रयोगशील दर्शन घडविले. वास्तव घटनेवर साहित्याच्या माध्यमातून त्यांनी मत व्यक्त केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळी दरम्यान 'माझी मुंबई' या नाटिकेवर तत्कालीन सरकारने बंदी आणल्याचे



दिसून येते. 'माझी मैना' या गीतामधून मुंबईविषयीच्या सर्वसामान्य कामगार, कष्टकरी जनतेच्या भावना व्यक्त केल्या. यावरून अण्णाभाऊंच्या लेखनातील सामान्य सूक्ष्म वर्गाच्या भावनांचे दर्शन आपणास घडते.

तत्कालीन साहित्य क्षेत्रातून अण्णाभाऊंच्या साहित्याची उपेक्षा झाली. त्यावर समीक्षकांनी मूल्यमापन करण्याऐवजी टीकाच जास्त केली. अण्णाभाऊंच्या साहित्यातून 'स्व'चा आत्मशोध परंपरा-धर्माचा नकार, बंडखोर वृत्ती, विद्रोह, माणूसपणाची वेदना, वास्तव परिस्थितीत जगणारी अस्सल पात्रे, सामाजिक बांधिलकी, समाज परिवर्तनाचा ध्यास, उपेक्षित स्त्री-पुरुष साहित्याचे नायक-नायिका, सामान्य माणसांची आंतरिक तगमग, वाटेगावचा जिवंत परिसर याचे चित्रण येते. (व्यक्ती, वृक्ष, दऱ्याखोऱ्यांसहित यात्रा) गावकुसा बाहेरील वेगवेगळ्या समाजातील व्यक्ती त्यांच्या साहित्याच्या नायक होत्या. या नायकांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी आपले साहित्य लेखन केले. समतेचा विचार त्यांच्या साहित्यकृतीतून पदोपदी जाणवतो.

फकीरा (१९५९) या कादंबरीतून सामाजिक एकता, व्यक्तींवरील संस्कार व त्याची परीक्षा, राजकारण, नात्यातील प्रेमभावना, दलितांचे जीवन, कर्तव्य, उदात्त भावना, निसर्ग वर्णन, बोली आणि संवाद अशा गोष्टी अधोरेखित होतात. सोनू

भावासह प्रतिभेच्या जोरावर तत्कालीन परीस्थितीचे सूक्ष्म वर्णन, परिवर्तनाचा संदेश, समानतेचा आग्रह, हिंसेचा धिक्कार, जातीयतेला विरोध अशा भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता व समानता आणि एकात्मता, अखंडता यांचा स्वीकार आणि पुरस्कार करणारी मूल्ये त्यांच्या लेखनातून दिसून येतात.

''द्या फेकून जातीयतेला
करा बंद रक्तपाताला,
आवरोनी हात आपला
भारतीयांनो इभ्रत तुमची इर्शेला पडली
काढा बाहेर नौका देशाची
घरा सावरुन एकजुटीने दुभंगली दिल्ली
काढा बाहेर राष्ट्र नौका
ही वादळात गेली''

यावरुन त्यांची राष्ट्रीय विचारांशी एकात्मता आणि देशाभिमान असणारी भावना व्यक्त होते.

तळागाळातील अशिक्षित लोकांपर्यत विचारांचा प्रचार करण्यासाठी 'तमाशा' या लोककलेच्या माध्यमातून पोवाडे, लावण्या, गीते, कटाव, पदे यांची रचना केली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीदरम्यान ''माझी मैना गावाकडे राहिली, माझ्या जीवाची होतीया काहिली ।।'' अण्णाभाऊंची ही लावणी खूप लोकप्रिय झाली. छत्रपती शिवरायांचे चरित्र महाराष्ट्रापासून ते रशिया पर्यंत पोवाड्यातून सादर केले. 'वैजयंता' या कादंबरीतून तमाशात काम करणाऱ्या स्त्रियांचे होणारे शोषण, 'माकडीचा माळ' या कादंबरीतून भटक्या समाजाच्या सूक्ष्म जीवनाचे चित्र रेखाटले. अण्णाभाऊंनी 'वैजयंता' व 'माकडीचा माळ' या कादंबऱ्यां लिहिल्या. याचे कारण की, त्यांनी कामगार, हमाल, तमाशातील सोंगाड्या, मुंबईच्या झोपडपट्टीतील आयुष्य, समाजातील दलित जाणिवा अनुभवल्या होत्या. अण्णाभाऊंचे लेखन १४ भारतीय भाषांसह जर्मन, इंग्रजी, झ्याक, रशियन, फ्रेंच या भाषांत भाषांतरित झालेले आहे.

कामगारांचे जीवनानुभव प्रकट करण्यासाठी अण्णाभाऊंनी कथा लिहिल्या. 'फरारी', 'पिसाळलेला माणूस', 'गजाआड', 'चिरागनगरीची भूत' या कथासंग्रहाचा विचार केला तर ते आपणाला सहजणे लक्षात येईल. त्यांच्या लेखनात अद्भुतता, काल्पनिकता, अतिशयोक्ती यांचा कुठेही लवलेश नाही. वास्तव जीवनातील जीवघेणे दारिद्र्य, साह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्यांचा, नदी-ओढ्यांचा समृद्ध परिसर, ग्रामीण रितीरिवाज, यात्रा, उत्सव, लोकांचे दैनंदिन जीवनव्यवहार, जंगलातील रस्ते, रस्त्यावरील वाटमाऱ्या, चोऱ्या, दरोडे, दरोडेखोर, भऊबंदकी, शेजारील गावातील वैर, गावातील पाटलांची मक्तेदारी, शोषण, दलित समाजाचे शोषण आणि त्यांची मानसिकता, कुस्त्यांचे फड, शर्यती, तमाशा, वाघ्या मुरळी, लोकांच्या श्रद्धा-अंधश्रद्धा, शेतकऱ्यांचे जीवन, नात्यातील प्रेम बदलत चाललेला गावगाडा, भटक्या लोकांचे जीवन अशा स्वानुभवाने स्वतःचा परिसर त्यांनी एवढा सूक्ष्मपणे लेखनातून वर्णन केला आहे की, त्यांची कथा किंवा कादंबरी वाचताना हे संपूर्ण कथानक आपल्या डोळ्यासमोर वास्तविक व जिवंतपणे उभे राहते. त्यांच्या काही कादंबऱ्यांचे चित्रपटात रुपांतर झालेले आहे. यावरुन आपल्या लक्षात येते की, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील जीवनजाणीव किती भारदस्त, सशक्त आणि ठळक आहेत.

शिक्षित लोकांसाठी लेखनाच्या माध्यमातून आणि अशिक्षित लोकांसाठी नाटके, गीते, पोवाडे, लावण्या यांच्या माध्यमातून अण्णाभाऊंनी आपला विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवला. 'शेठजीचं इंजेक्शन', 'माझी मुंबई' यासारख्या लोकनाट्यातून राजकीय, आर्थिक, सामाजिक प्रश्न उपस्थित केले. भांडवलदार, सावकार, शेठजी आणि भटजी जे की, शेतकऱ्यांचे, कामगारांचे शोषण करतात त्यांच्यावर टीका करत, समाजात प्रबोधन करत, शोषणाविरूद्ध परिवर्तन घडविण्यासाठी सदैव प्रयत्न केले. त्यांच्या लेखनातून मार्क्सवादाचा पुरस्कार केला आहे. कष्टकरी, कामगार, दलित, शोषित यांचे शोषण थांबून समाजात समता प्रस्थापित व्हावी असा त्यांचा मानस होता व त्यासाठी ते सदैव आशावादी व प्रयत्नशील होते.

मुंबईत उंचावरी । मलबार हिल इंद्रपुरी ।।
कुबेराची वस्ती । तिथं सुख भोगती ।।
पालात राहणारे । रात्रं दिवस राबणारे ।।
मिळेल ते खाऊन । घाम गाळती ।।

मुंबईतील विषमतेचे दर्शन घडवताना अनुभवविश्वाच्या प्रखर ज्वालेतून त्यांचे लेखन माणसांच्या जीवनानुभवातून, जाणिवेतून साकारताना दिसते. 'स्मशानातील सोनं' या कथेतील भीमा, निळू मांग, मुकूल मुलाणी, नरसु अशी लेखनातील पात्रे अण्णाभाऊंनी एवढी जिवंत रेखाटली की, वाचक त्यांना कधीही विसरू शकत नाही. 'स्मशानातील सोनं' या कथेतील भिमाच्या जगण्याचा संघर्ष संवेदनशील वाचकाचे नक्कीच मन हेलावणारा वाटतो. यातूनच अण्णाभाऊंच्या कथा अजरामर होताना स्पष्टपणे दिसतात. तळागाळातील उपेक्षित, वंचित समाजातील व्यक्ती अण्णाभाऊंच्या कथा अजरामर होताना स्पष्टपणे दिसतात. तळागाळातील उपेक्षित, वंचित समाजातील व्यक्ती अण्णाभाऊंच्या लेखनाचा केंद्रबिंदू होत्या. या वंचित घटकातील व्यक्तीला लेखनाचा नायक-नायिका बनवत सबंध कलाकृती त्या पात्राभोवती वर्णन करणारी असल्याने अण्णाभाऊ हे नक्कीच एक थोर साहित्यिक वाटतात. अण्णाभाऊंच्या लेखनातील बरेचसे नायक हे गुन्हेगार आहेत. मात्र ते नीतिमत्तेने, सच्चे व स्वाभिमानी आहेत. ज्या समाजाने त्यांना गुन्हेगार बनवले त्या समाजव्यवस्थेचे चित्रण ते आपल्या लेखनातून अगदी वास्तवतेने व वस्तुनिष्ठपणे करतात. अण्णाभाऊंच्या साहित्याच्या प्रेरणेचा आपण जर विचार केला तर आपल्या लक्षात येते की, समाजातील सर्व स्तरातील (आर्थिक,सामाजिक,राजकीय,सांस्कृतिक) विषमता नष्ट होऊन समतेचा आणि एकात्मतेचा विचार त्यांच्या लेखनाच्या मुळाशी असल्याचे जाणवते. याचबरोबर नीतिमत्ता, स्वाभिमानीवृत्ती, माणसांच्या श्रमाचे मूल्य ते कायमच आपल्या लेखणीतून जोपासताना दिसतात. विद्रोही,बंडखोर,क्रांतिकारक, संघर्ष करणारे, परिस्थितीला सामोरे जात स्वतःचे आयुष्य पणाला लावणारे नायक आणि नायिका त्यांच्या लेखनाचे विषय आहेत.

अण्णाभाऊंच्या लेखनातील सर्वच घटना वास्तवाचे चित्रण करताना दिसून येतात. त्यामध्ये कल्पकतेला कोठेही थारा नाही. निसर्गवर्णन, नायक-नायिका यापासून ते कथानकापर्यंत, लोकांचे प्रश्न हे स्वानुभवासह त्यांनी वर्णन केलेले आहेत. 'माझा रशियाचा प्रवास' या प्रवासवर्णनातून त्यांचा वास्तव दृष्टीकोन, उत्तम निरीक्षण, सहजता या बाबी आपल्या लक्षात येतात.

वाटेगाव नंतर मुंबईत गेल्यावर तेथील झोपडपट्टीतील लोकांच्या जीवन, अस्ताव्यस्त प्रपंच-पसारा, मुकेपणा, जगण्यातील अवैध मार्ग यांचा प्रत्यय आला. यातूनच शिक्षणाऐवजी प्रत्यक्ष जीवनातील अनुभवच त्यांच्या लेखनाचा विषय झाला. या अनुभवांना लेखनातून मांडत असताना त्यांची भाषाही तशीच वास्तववादी होती. त्यामुळे त्यातील बरेच संवाद आपल्या मनाला चटका लावून जातात. सोबत वाचकाला विचारमग्न आणि अंतर्मूख व्हायला लावतात. 'फकीरा'मध्ये ''मी मेलो तरी चालेल, पण गाव जीता राहिला पाहिजे'', ''जगा कुत्र्याच्या मौतीने मरू नका'' अशी कथानकातील रणझुंजार वाक्ये अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी उद्युक्त करतात, वाचकांना व ऐकणाऱ्या व्यक्तीला प्रेरित करतात, सजग करतात. आत्मभान, स्वाभिमान, नीतीमत्ता जोपासण्यासाठी सजग करतात. ''जास्त दुबळे होऊ नका, दिवस जातील, दिवस घर बांधून राहत नाहीत'' यातून त्यांचा करारीपणा, लढवय्यी वृत्ती, परिस्थितीला सामोरे जाण्यची दिशा, संघर्षमय जीवनाची वाटचाल ठळक करताना दिसते.



त्यांनी लावणीतील 'छक्कड' या प्रकारातून काव्यरचना करत जीवनातील स्वानुभवाच्या जोरावर सूक्ष्मजाणीवा समर्थपणे प्रकट केल्या. कलावाद आणि जीवनवाद या दोन्ही वादात न पडता 'स्व'च्या जाणिवा अधिक ठळकपणे लेखनातून व्यक्त केल्या. जीवनातील स्वानुभवावर अनुभवलेली माणसं त्यांच्या लेखनाचा विषय झाली. निसर्गाच्या परिवर्तनवादी दृष्टिकोनातून बदलाचा, समतेचा संदेश त्यांनी लेखनातून दिला. त्यांच्या जाणीवेतील

मार्क्सवादही लेखनातून प्रकट झाला. सह्याद्रीच्या वारणा, कृष्णा नद्यांसह हा सर्व प्रदेश जिवंत करत येथील माणसेही लेखनातून अजरामर केली. त्याच बरोबर मुंबईच्या झोपडपट्टीतील अस्वस्थ करणारे जीवनही लेखणीतून समोर आणले, अधोरेखित केले सुशिक्षितांपासून अशिक्षितांपर्यंत तमाशा, गीते, पदे यांच्या माध्यमातून वाचकांच्या जाणिवा समृद्ध केल्या. समतेचा संदेश देत संघर्ष व परिवर्तनाची दिशा त्यातून दिली. प्रतिकूल परिस्थितीतही आशावादी दृष्टिकोन जपत अण्णाभाऊंनी लेखन केले. सबंध लेखनात त्यांनी मानवतावादी दृष्टिकोन जपल्याचे अपणास प्रखरतेने दिसून येते.

अण्णाभाऊ साठे एक बहुआयामी आणि झुंजार व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन एखाद्या महान महाकाव्याचा विषय व्हावा एवढा धीरगंभीर आणि तेवढाच विविध मानवी जीवन अंगाचा वेध घेणारा असल्याचे दिसून येते. अण्णाभाऊंच्या साहित्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स, मॅक्झिम गॉर्की यांच्या विचारांचा अदम्य संगम आहे. अण्णाभाऊंनी जरी मॅक्झिम गॉर्कीची प्रेरणा घेतली असली तरी भारतीय समाजातील जाती-विषमतेची तटबंदी त्यांनी नुसती डोळसपणे पाहिलीच नाही तर अनुभवली आणि भोगलीसुद्धा. यातून मानवी जीवन मुक्त होण्यासाठी अण्णांनी आपले साहित्य अत्यंत संवेदशीलतेने लिहिले. अण्णांनी लिहिलेली शायरी,शायरीचे गायन करुन मानवमुक्तीचा मार्गच जणू सांगितला. अण्णाभाऊंनी पारंपरिक धार्मिक मूल्यांना छेद देणारे साहित्य निर्माण करून ऐतिहासिक, वास्तववादी दृष्टीकोनातून जीवनाकडे बघण्याची शिकवण समाजाला दिली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून लोकजागरण, लोकप्रबोधन आणि लोकपरिवर्तन घडवून आणले. अशा सर्जनशील प्रतिभेच्या भविष्याकाराची वाट तुडवताना या वाटेवरील वाटाड्या होणाऱ्या तमाम वाचक, श्रोते, रसिक व समाज बांधवांनी अण्णाभाऊंचे वैचारिक प्रबोधनाचे नाते आणखी स्पष्टपणे समजून घेण्याची गरज आहे. जातीय, पक्षीय खुणा अनेकदा खुणावत असतात. भारताची वर्णाश्रम धर्मपद्धती, व्यवसाय अनुरुप जातीची उतरंड व त्यातील श्रेष्ठ-कनिष्ठ यामुळे धर्माच्या नावाखाली या देशात माणसांची बेसुमार फाळणी झाली. भारतात वर्षानुवर्ष दोन येश्ते नांदत आली. एक गरिबांचे शोषितांचे व दुसरे श्रीमंत भांडवलदार,धनदांडग्यांचे. गरीब-शोषित दुर्बलांना, उच्चभ्रू व्यवस्थेने सतत पायाखाली तुडविण्याचा अट्टाहास धरला. या साहित्यिकाच्या वाट्याला जी उपेक्षा आली, त्याचे एक कारण म्हणजे ते कम्युनिस्ट चळवळीशी संबंधित होते आणि दुसरे म्हणजे ते ज्या जाती-वर्गीय समाजातून आले होते व त्यांनी ज्या दलित-शोषित, कष्टकरी जाती वर्गीयांची वेदना, दाहक जीवनातील वास्तवता आपल्या साहित्यातून मांडली व प्रस्थापित समाजव्यवस्थेवर, संस्कृतीवर आपल्या लेखनातून, लावण्या-पोवाड्यातून आसूड ओढले, ते सत्तेवरील प्रस्थापित राज्यकर्त्यांना व त्यांची पालखी वाहणाऱ्या सांस्कृतिक क्षेत्रातील मक्तेदारांनाही रुचणारे नव्हते.

अण्णाभाऊंनी आपल्या अनेक कथांमधून सामाजिक, राजकीय, धार्मिक, कौटुंबिक समस्यांना तोंड फोडले. स्वतंत्र बाण्याच्या बंडखोर नायिका आणि तळागाळातील जात वर्गातील लढाऊ नायक त्यांनी निर्माण केले. अण्णाभाऊंच्या 'बंडवाला' या कथेत जमीनदाराच्या अन्यायाविरूद्ध लढणारा मांग समाजातील तरुण आहे. 'रामोशी' या कथेत यदु रामोशी हा जमीनदाराच्या अन्यायाविरुद्ध आणि भ्रष्ट सरकारी यंत्रणेविरूद्ध कसा संघर्ष करतो याचे वास्तव चित्रण केलेले आहे. 'कोंबडीचोर'मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही दारिद्र्य, उपासमार शिल्लक राहिल्याने गरीबीमुळे सामान्य माणूस कसा चोरी करण्यास मजबुर होतो याचे चित्रण आहे. 'बरबाद्या कंजारी' या मुंबईच्या झोपडपट्टीतील भटक्या समाजाची दयनीय अवस्था आणि जातपंचायतीच्या माणूस प्रथांचे दर्शन घडते. या जात पंचायतीला आव्हान देऊन व त्यांची मुलगी कशी बंडखोरी करते याचे बोलके चित्रण केले आहे. अण्णाभाऊंच्या 'गजाआड' कथासंग्रहातील अनेक कथा त्यांना जे तुरुंगात कैदी भेटले त्यांच्यातील संवेदनशील माणसांवरील जगण्याच्या मजबुरीचे दर्शन घडवितात. 'जिवंत काडतूस' या कथेतून ते १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या मित्रांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकतात. अण्णाभाऊंनी त्यांच्या आयुष्यातील काही वर्षे मुंबईच्या घाटकोपर

येथील चिरागनगर या झोपडपट्टीत घालविली. तेथील गरिबी, व्यसनी, व्यभिचारी, चोऱ्यामाऱ्या करणाऱ्या, गुंड, मवाली, उपेक्षित, भटक्या माणसांचे जगणे, त्यांचा जीवनसंघर्ष अण्णाभाऊंच्या 'चिराग नगरीचे भूत' या कथासंग्रहातील विविध कथांमध्ये आढळतो. 'मरीआईचा गाडा' या कथेत अंधश्रद्धेला आव्हान देण्याचे काम या कथेचे नायक 'नाना' हे पात्र करते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखालील चळवळीमुळे दलित, अस्पृश्य समाजाला जे नवे आत्मभान आले त्याचेही चित्र अण्णाभाऊंच्या 'वळण', 'सापळा' या कथांमध्ये आढळते. भारतीय समाजातील जातीय उतरंडीमुळे सांबार-मांग समाजातही कशी श्रेष्ठ-कनिष्ठ भावना वाढीस लागते याचे चित्रण 'उपकाराची फेड' या कथेमध्ये अगदी नेमकेपणाने पाहायला मिळते.

अण्णाभाऊंनी लिहिलेल्या 'फकीरा' या गाजलेल्या कादंबरीमध्ये भीषण दुष्काळाच्या काळात ब्रिटिशांचे खजिने, धान्य लुटून गरिबांना, दलितांना मुक्तहस्ते वाटप करणाऱ्या नायकाचे म्हणजेच फकिरा या मांग समाजातील लढाऊ तरुणाचे चित्रण करण्यात आले आहे. 'वैजयंता' या कादंबरीत प्रथमच तमाशात काम करणाऱ्या तमासगीर कलावंत स्त्रियांच्या शोषणाचे चित्रण केले आहे. 'माकडीचा माळ' ही भटक्या व विमुक्त समाजाच्या जीवनपद्धतीचे अतिशय सूक्ष्म चित्रण करणारी भारतीय साहित्यातील पहिली कादंबरी आहे. यावरुन त्या समाजाच्या दैनंदिन जीवन व्यवहारांचे बारकावे साहित्य रूपाने प्रथमच जगासमोर अण्णभाऊंनी आणले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी मराठी साहित्यामध्ये आपला स्वतंत्र ठसा उमटवला आहे. समाजव्यवस्थेच्या मर्मावर घाव घालत त्यांनी लेखन केले.

अण्णाभाऊंनी पोवाडे, लावणी, गीते, कथा, कादंबरी, प्रवासवर्णन, नाटक, लोकनाट्य असे साहित्याचे विविधांगी प्रकार हाताळले आहेत. वैचारिक आणि सामाजिक बांधिलकी हे त्यांच्या लिखाणाचे सूत्र होय. उपेक्षित, दलित, वंचितांच्या बाजूने राहून त्यांच्या उत्थानासाठी अण्णाभाऊंनी आपली लेखणी झिजवली. त्यांचे नायक-नायिका आपल्या हक्कांसाठी, सन्मानासाठी, निष्ठापूर्वक संघर्ष करताना दिसतात. अण्णाभाऊ हे बंद खोलीत केवळ लिखाण करणारे लेखक नव्हते, तर जनआंदोलनात सक्रिय झालेले कार्यकर्तेदेखील होते. अण्णाभाऊ हे एका विशिष्ट जातीचे, जमातीचे व समाजाचे नव्हते तर ते जगातील कष्टकऱ्यांचे, पीडितांचे, शोषितांचे प्रतिनिधी होते. त्यांनी त्या समुहाचे प्रतिनिधीत्व निष्ठेने आणि मानाने केले. 'प्रतिभेला रंग, रुप, वर्ण, वंश, जातपात व लिंगभेद अशी कोणतीही कुंपणे कधीच नसतात. ती स्फुरते कुणाही सहृदयाला, अनुभूतीपूत अस्वस्थ आत्म्याला. प्रतिभेचे आजच्या औपचारिक शिक्षणावाचून तरी कुठे अडते ? विश्वाच्या शाळेतील उघड्या डोळ्यांनी पाहिलेल्या व्यवहारातून शिकलेले पाठ तिला भावतात, पावतात.'

शाहीर अण्णाभाऊ साठे हे वरील निकषांचे ज्वलंत उदाहरण होय. जे भोगले, त्यात ते जगले. ते लिहायला लागले आणि ते लिहितच राहिले. आणि त्यांनी अपले आगळे वेगळे स्थान निश्चित केले. अण्णाभाऊंचे सगळेच साहित्य मोलाचे, जीवनाला उपयोगाचे, दिशादर्शक आणि मार्गदर्शक ठरणारे, नव्या पिढीला प्रेरक करणारे असे आहे. त्यांच्या या साहित्याचा व्यास हा प्रचंड मोठा आहे.

थोडक्यात, मराठी साहित्यात प्रचलित असलेले जवळजवळ सर्वच साहित्य प्रकार अण्णाभाऊंनी हाताळले. कारण प्रत्येक साहित्य प्रकाराच्या प्रयोजनाबाबत त्यांच्या मनात स्पष्टता होती असे दिसून येते. अण्णाभाऊंनी 'कादंबरी' हा साहित्य प्रकार समाजाचा व्यापक पट त्याच्या व्यामिश्रतेसह चितारण्यासाठी; 'कथा' तत्कालीन समाजातील सूक्ष्म बदल टिपण्यासाठी तर 'लोकनाट्य' हा साहित्य प्रकार तत्कालीन राजकारणातील दांभिकता आणि सत्ताधारी वर्गाच्या भूमिकेतील अंतर्विरोध उजागर करण्यासाठी तर 'गीतलेखन' हा साहित्यप्रकार प्रखर वर्गविरोध, वर्गसंघर्ष मुखर करण्यासाठी प्रामुख्याने वापरला. अर्थातच साधारणतः भिन्न वाटणाऱ्या प्रयोजनांमध्ये अंत:स्थरित्या 'समाजपरिर्वनाशी सर्जनशील लेखकाची बांधिलकी' असते हे सूत्र त्यांच्या समग्र लेखनाच्या मुळाशी कार्यरत होते असेच दिसून येते. अण्णाभाऊ हे हाडाचे कम्युनिस्ट होते. मार्क्सवादी होते. परंतु ते पोथीनिष्ठ कधीच नव्हते; यातच अण्णाभाऊंच्या जाणिवेचे द्रष्टेपण आहे. पाश्चात्त्य

जीवन संदर्भाला अधोरेखित करणारा मार्क्सवाद भारतीय समाजव्यवस्थेला कसा लावायचा याची दृष्टी त्यांच्या जीवन संघर्षातूनच त्यांना मिळाली होती. आज अनेक वाङ्मयबाह्य कारणांमुळे अण्णाभाऊंच्या साहित्याची नव्याने चर्चा करण्याची गरज निर्माण झाली आहे. हे वास्तव आपणास नाकारता येणार नाही. आण्णाभाऊ साठे ज्या बांधिलकीतून लेखन करीत होते त्या बांधिलकीच्या अभावाने मराठी साहित्य ग्रासलेले आहे. तर दुसरीकडे त्यांचे जातीय प्रतिकामध्ये बंदीकरण होत आहे. अस्मितेच्या राजकारणाची पुरेशी उपयोगिता मुक्तीच्या राजकारणात असली तरी अस्मितेचे राजकारण स्वतः मुक्तीचे राजकारण होऊ शकत नाही याचे भान आपल्याला अण्णाभाऊंचे साहित्य करुन देते, हे वादातीत आहे. अण्णाभाऊंच्या लेखनातून भारतीय जनसामान्यांच्या शोषणाच्या आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय अशी द्विमुखी, बहुअंगी रचना अधोरेखित केली आहे. शोषणाच्या आर्थिक आणि सांस्कृतिक पैलूंकडे अण्णाभाऊ आपले लक्ष वेधतात. सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय क्रांती यांचे परस्परावलंबित्व आणि परस्परपूरकता देखील त्यांच्या साहित्यातून अण्णाभाऊ ठळकपणे निर्देशित करतात. या दृष्टीने अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य, लेखनशैली, लेखनामागील भूमिका, त्यांच्या साहित्यातून स्पष्टपणे जाणवणाऱ्या जीवनजाणिवा यांचे अद्वितीयत्व हे अनन्यसाधारण आहे हे मान्य करावे लागते.

अण्णाभाऊंच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त या थोर साहित्यिकास कोटी कोटी प्रणाम !!!

---

# कॉलेज लाईफ

**लक्ष्मी सुरेश कांबळे**
बी.एड. द्वितीय

हरवलेले हे दिवस येतील का पुन्हा
जगलो आज आणि उद्या हाच दिवस जुना
नशिबानेच एकदा पुन्हा कुठेतरी भेटू
आठवणीला एकदा एकत्र मिळून वेचू

पण तेव्हा सर्व काही बदललेलं असेल
कोणीतरी बोलावतंय म्हणून भेट लवकर सुटेल
लांबपर्यंत चालणाऱ्या गप्पागोष्टी राहणार नाही
आठवणींचा हा झरा मग त्या दिशेने वाहणार नाही

आज सोबत आहोत वाटेल तसं जगून घ्या
जीवनभर पुरतील अशा आठवणी जपून घ्या.



# कारगिल विजय दिवस

**माने विशाल हणमंत**
बी.एड. द्वितीय

संस्थेचे प्रेरणास्थान छत्रपती शिवाजी महाराज, संस्थेचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे, व्यासपीठावर उपस्थित असलेले कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आदरणीय बोंगेसाहेब, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गोरे सर, डॉ. पाटील सर, डॉ. लांडगे सर, डॉ. भिलेगावकर सर, शिखरे सर, कुरडे सर, मते सर आणि येथे जमलेल्या माझ्या मित्र-मैत्रीणींनो !

आज आपण २६ जुलै २०१९ हा कारगिल विजय दिवस म्हणून साजरा करण्यासाठी एकत्र जमलेलो आहोत. देशातील युवकांमध्ये देशाच्या सैन्याबद्दल कर्तव्य भावना आणि अभिमान वृद्धिंगत व्हावा हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. मित्रांनो, कारगिल हे शहर जम्मु-काश्मीर मधील एक ऐतिहासीक शहर आहे. या शहराच्या चोहो बाजुंनी मोठ-मोठे डोंगर आहेत. कडक हिवाळ्यामध्ये मनुष्य हानी कमी व्हावी म्हणून उंचीवरील चौक्या रिकाम्या करणे हे भारत व पाकीस्तान दोघेही पाळतात. परंतु फेब्रुवारीमध्ये अचानकच पाकीस्तान लष्कराने ह्या चौक्या काबीज केल्या व याचा भारतीयांना थांग पत्ताही लागला नाही आणि एका मेंढपाळाकडून याची खबर भारतीय लष्कराला लागली.






भारतीय लष्कराने ऑपरेशन विजय या नावाखाली कारगिलच्या युद्धासाठी तयारी सुरु केली. परंतु शत्रु सैन्य अती उंचीवर असल्याने भारतीय भूदल सेनेचा निभाव लागला नाही. तेथे काही सैनिक शहीद झाले. नंतर भारतीय हवाई सेनेकडून 'ऑपरेशन सफेद सागर' सुरु झाले. भौगोलिक परिस्थिती व्यवस्थित नसल्याने युद्ध करण्यास अडचण येत होती.

भारतीय सैन्याने चपळाई दाखवत शत्रुशी दोन हात केले. भारत सरकारने लष्कर प्रमुखांसोबत विशेष हालचाली सुरु केल्या. वायुसेनेला विशेष अधिकार देण्यात आले आणि वायुसेनेने व्यवस्थित युद्धाची आखणी करून हवाई सेनेने जोराचा मारा केला व पाकिस्तान सैनिकांना तेथून माघार घेणे भाग पडले. २६ जुलै १९९९ रोजी शत्रू सैन्य भारताला शरण आले आणि मिशन काश्मीर मधील कारगील आपल्याला परत मिळाले. परंतु यात पाचशेच्या वर भारतीय सैनिक शहीद झाले. त्यांच्या स्मरणार्थ आपण कारगिल विजय दिवस साजरा करतो. त्या शहिदांना नतमस्तक होऊन मी दोन शब्द संपवतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ - वर्धापन दिन

**कु. क्षीरसागर पल्लवी लक्ष्मण**
बी.एड. द्वितीय

सन्माननीय व्यासपीठ, व्यासपीठावर उपस्थित मान्यवर व इथे जमलेल्या माझ्या बी.एड. प्रशिक्षणार्थी मित्र-मैत्रिणींनो... आज आपण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ वर्धापन दिन, अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी असा त्रिवेणी संगम कार्यक्रम साजरा करत आहोत. विद्यार्थी मित्रांनो, काल १ ऑगस्ट २०१९ सोलापूर विद्यापीठ वर्धापन दिन होता, पण आपणाला तो कार्यक्रम आज साजरा करायचा आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे सर यांना उत्कृष्ट प्राचार्य म्हणून गौरविण्यात आले आहे. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन ! तसेच श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांना उत्कृष्ट शिक्षण संस्था म्हणून गौरविण्यात आले आहे. संस्थेचेही मनःपूर्वक अभिनंदन ! प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे सरांबद्दल मला असे म्हणावेसे वाटते,

''आज इथल्या थोरवीला
चंदनाचा गंध आला
कौतुकाचा हा किनारा
पावलांनी धन्य झाला''

विद्यापीठाची स्थापना १ ऑगस्ट २००४ रोजी करण्यात आली. त्याला काल चौदा वर्ष पूर्ण झाली. म्हणजे एक तप पूर्ण झाले. मागील काही वर्षात विद्यार्थी केंद्रित स्किल इंडिया अंतर्गत कौशल्याभिमुख अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत. यासोबतच पेपरलेस कारभार, कॅशलेस व्यवहार तसेच नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून आपले वेगळेपण निर्माण केले आहे. आपल्या विद्यापीठाची ओळख 'डिजिटल युनिव्हर्सिटी' म्हणून पूर्ण महाराष्ट्रात निर्माण झाली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील विद्यार्थी व शिक्षण प्रेमींची वाढती मागणी पाहून तत्कालीन मुख्यमंत्री मा. सुशीलकुमार शिंदे यांनी २००४ मध्ये केवळ एका जिल्ह्यासाठी सोलापूर विद्यापीठाची स्थापना केली. यावेळी पहिले कुलगुरू म्हणून डॉ. इरेश स्वामी यांची निवड झाली. त्या नंतर दुसरे कुलगुरु म्हणून डॉ. एन. एन. मालदार यांनी जबाबदारी संभाळली. आता गेल्या १४ महिन्यांपासून डॉ. मृणालिनी फडणवीस या कुलगुरू पदाची सूत्रे सांभाळत आहेत.

आज केंद्र सरकारच्या राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानांतर्गत देशातील विद्यापीठांना संशोधनास तसेच पायाभूत सुविधांसाठी कोट्यावधी रुपयांचे अनुदान दिले जात आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि संलग्नित १० महाविद्यालयांनाही लाखोंचे अनुदान प्राप्त झाले आहे.

या परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी मा. प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे म्हणाले, ''उच्च शिक्षणात माहिती संप्रेषण तंत्रज्ञान हे अत्यावश्यक बनले असून विद्यार्थी प्रवेशापासून ते मूल्यमापनापर्यंत प्रत्येक टप्प्यावर शाळा, महाविद्यालयात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानासंदर्भात नियोजन महत्त्वाचे आहे. शिक्षक व विद्यार्थ्यांनी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाबाबतीत जागरुक व सक्षम राहणे काळाची गरज आहे.''

अध्यक्षीय समारोपात मा. प्रा. दिलीप रेवडकर म्हणाले, ''गुणवत्तापूर्ण शिक्षणातून उच्च शिक्षणातील नवनवीन क्षीतिजे शोधली की सापडतात. त्यासाठी शिक्षकांनी संशोधक दृष्टिकोन विकसीत करावा.''

परिषदेच्या पहिल्या सत्रात साधन व्यक्ती म्हणून मुंबई विद्यापीठातील डॉ. सुनिता मगरे यांनी 'उच्च शिक्षणातील माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे एकात्मिकरण' या संदर्भात बहुमोल मार्गदर्शन दिले. यानंतर परिषदेतील सहभागी संशोधकांनी संशोधन पेपर सादरीकरण केले.

सदर परिषदेसाठी महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. या परिषदेस शिक्षण व शारीरिक शिक्षण क्षेत्रातील संशोधक, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**- प्रा. डॉ. एम. एस. डिसले**
राष्ट्रीय परिषद समन्वयक

# आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्त्व विकास
# तीन दिवसीय क्षेत्रीय कार्यशाळा अहवाल

**पु**ण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांचे संयुक्त विद्यमाने मंगळवार, १७.१२.२०१९ ते गुरुवार, १९.१२.२०१९ या कालावधीत '**आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्त्व विकास**' या विषयावर तीन दिवसीय क्षेत्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्‌घाटन सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु मा. डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी केले. उद्‌घाटन कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक डॉ. गुणवंत सरवदे व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे अध्यक्ष मा. डॉ. बी. वाय. यादव, जनरल सेक्रेटरी मा. व्ही. एस. पाटील, खजिनदार मा. दिलीप रेवडकर तर सहसचिव मा. पी. टी. पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पर्यावरण समृद्धतेसाठी शाश्वत विकास आवश्यक आहे. विकास आणि आपत्ती एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापन करून सामाजिक उपयोगिता जोपासली पाहिजे, पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबवून पर्यावरणाच्या शाश्वत विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आणि अनिवार्य असल्याचे प्रतिपादन मा. कुलगुरू यांनी केले. आपल्या सभोवताली घडून आलेल्या आपत्तीमध्ये सर्वांनी योगदान दिले पाहिजे यासाठी राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत स्वयंसेवकांनी नेतृत्त्व केले पाहिजे असे आवाहन डॉ. गुणवंत सरवदे यांनी केले, तसेच आपत्ती व्यवस्थापनात स्वयंसेवकांची कार्ये व जबाबदाऱ्या या विषयी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे व संस्थेचे सहसचिव मा. पी. टी. पाटील यांनी आपत्ती व्यस्थापनात विद्यार्थ्यांची भूमिका या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेसाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले श्री उल्हास केळकर यांनी आपत्ती व्यवस्थापनाची संपूर्ण कार्यप्रणाली सांगितली. डॉ. बी. वाय. यादव यांनी अध्यक्षीय समारोपात आपत्ती व्यवस्थापनात तरूणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते हे सांगून त्यांनी वैद्यकिय क्षेत्रातील आपत्ती व्यवस्थापन संदर्भाने मार्गदर्शन केले.

या तीन दिवसीय क्षेत्रीय कार्यशाळेसाठी बार्शी तालुक्यातील विविध महाविद्यालयातून १५० स्वयंसेवक आणि ६ राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. कार्यशाळेच्या उद्‌घाटन कार्यक्रमानंतर मा. डॉ. संजय करंडे यांचे 'आपत्ती व्यवस्थापन व राष्ट्रीय सेवा योजना' या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर मा. श्री सागर सुतार यांनी तिसऱ्या सत्रामध्ये 'आपत्ती व्यवस्थापनातील संस्थांचे कार्ये व तरुणांची भूमिका' या विषयी सखोल मार्गदर्शन व दिग्दर्शन केले. चौथ्या सत्रामध्ये मा. श्री उल्हास केळकर - आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ, पुणे यांनी 'नैसर्गिक व मानवनिर्मित अपत्ती व्यवस्थापन, त्यातील मदत आणि सुटका पद्धती' या विषयी दिग्दर्शन व मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी प्रथम सत्रामध्ये मा. डॉ. रविराज फुरडे यांनी 'नेतृत्त्व विकास' या विषयी सखोल व विस्तृत मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये मा. श्री गणेश बागल - आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ, पुणे यांनी 'महापूर-रेस्क्यू आपरेशन - मदत आणि सुटका पद्धती' याविषयी मार्गदर्शन, दिग्दर्शन व प्रात्यक्षिके सहभागी स्वयंसेवकांकडून करवून घेतली. तिसऱ्या सत्रामध्ये मा. श्री परशुराम कोरे - आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ, पुणे यांनी 'अग्निशमन-रेस्क्यू ऑपरेशन-मदत आणि सुटका पद्धती' याविषयी मार्गदर्शन, दिग्दर्शन व प्रात्यक्षिके सहभागी स्वयंसेवकांकडून करवून घेतली. चौथ्या सत्रामध्ये मा. श्री मनोज देशमख - आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ, पुणे यांनी 'भूकंप आणि भूस्खलन-रेस्क्यू ऑपरेशन-मदत आणि सूटका पद्धती' याविषयी मार्गदर्शन, दिग्दर्शन व प्रात्यक्षिके सहभागी स्वयंसेवकांकडून करवून घेतली. पाचव्या सत्रामध्ये बार्शी नगरपरिषद, बार्शी येथील अग्निशमन पर्यवेक्षक मा. श्री विठ्ठल पाटोळे यांनी दिग्दर्शन व मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात जिल्हा अधिक्षक कार्यालय सोलापूर ग्रामीण येथील डेझी या श्वानासह मा. श्री प्रशांत जाधव आणि त्यांचे सहकारी श्री आर. ए. घोडके (२९१), श्री रोहित टोणपे (८८३), श्री युवराज गायकवाड (१९९४), श्री हनुमंतराव हिरेमठ (२२१३) श्री चिदानंद रायकोटी (११००) यांनी बॉम्ब डिटेक्शन ॲण्ड डिस्पोजल स्कॉड पथक (BDDS), सोलापूर ग्रामीण यांनी रंगीत तालीम स्वयंसेवकांना प्रात्यक्षिकासह सादर केली. कार्यशाळेच्या तिसऱ्या आणि अंतिम सत्रात समारोप समारंभ व प्रमाणपत्र वितरण हा कार्यक्रम संपन्न

झाला. या कार्यक्रमासाठी बार्शी पोलीस स्टेशन मधील मा. श्री राहुल देशपांडे, पोलीस उपनिरीक्षक बार्शी ग्रामीण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर संस्थेचे कार्यकारिणी सदस्य मा. जयकुमार (बापू) शितोळे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. समारोप समारंभाप्रसंगी सहभागी स्वयंसेवकांनी प्रातिनिधीक स्वरुपात बोलक्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या, समन्वयस्कांच्या मनोगतामध्ये डॉ. सोमनाथ यादव यांनी 'कार्यशाळेची यशस्विता व स्वयंसेवकांना त्याचा भविष्यात होणारा फायदा' या विषयी मत मांडले. प्रमुख पाहुणे मा. श्री राहूल देशपांडे यांनी कार्यक्रमापूर्वी सादर करण्यात आलेल्या विविध आपत्ती त्या मधील मदत व सुटकेच्या पद्धती, कौतुक व अभिनंदन केले. आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज आहे म्हणूनच बार्शी व परिसरातील जनतेच्या संपूर्ण सुरक्षीततेसाठी, कोणत्याही आपत्तीवर मात करण्यासाठी स्वयंसेवक कार्यशाळेतून उत्तम रितीने तयार झाले आहेत, ते कोणत्याही आपत्ती क्षणी जनतेच्या मदतीला तत्परतेने धावून येतील असा विश्वास या प्रसंगी व्यक्त केला. कार्यशाळेमध्ये तीन दिवस उत्स्फूर्तपणे सहभागी झालेल्या स्वयंसेवकांना मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. एस. एस. गोरे यांनी आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्त्व विकास तीन दिवसीय क्षेत्रीय कार्यशाळा माहाविद्यालयात प्रथमच सूरू झालेल्या या विभागाला राष्ट्रीय सेवा योजना विभाग पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी ₹ ३०,०००/- (अक्षरी तीस हजार रुपये फक्त ) सानुदान आयोजनाची संधी दिल्या बद्दल विद्यापीठाचे आभार व्यक्त केले. तसेच संपूर्ण कार्यशाळेचा आढावा घेत स्वयंसेवकांना प्रेरणा व मार्गदर्शन केले. उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य मा. डॉ. एम. एस. गोरे यांनी केले, प्रमुख पाहुण्यांचा समन्वयक डॉ. एम. एस. डिसले यांनी केले.

तसेच समारोप समारंभाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजन कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एस. डिसले यांनी केले. तीन दिवस स्वयंसेवकांना महाविद्यालयाच्या वतीने देण्यात आलेल्या चहा, अल्पोपहार व दुपारचे जेवण व पुन्हा संध्याकाळचा चहा, स्वयंसेवकांची व प्रमुख पाहुण्याची निवासाची व्यवस्था या बद्दल आवश्यक ती सुविधा देण्याचा महाविद्यालयाने प्रयत्न केला. स्वयंसेवकांनी तो आनंदाने स्वीकारला, त्याबद्दल त्यांचेही आभार व्यक्त केले, पाहुण्यांचा परिचय डॉ. पी. ए. पाटील यांनी केला, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ. स्मिता सुरवसे यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. पी. पी. नरळे यांनी केले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व विभागातील विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांनी परिश्रम घेतले. या तीन दिवसीय क्षेत्रीय कार्यशाळेची सांगता सामुहिक राष्ट्रगीताने करण्यात आली.

**- प्रा. डॉ. एम. एस. डिसले**
राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी



# जिमखाना अहवाल

**श्री** शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे बी.पी.एड्., एम.पी.एड., बी.एड., एम.एड. अंतर्गत वर्गांच्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर विविध आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

त्यामध्ये टेबल टेनिस तसेच विविध मैदानी क्रीडा स्पर्धा यांचा समावेश होता. सदर स्पर्धा उत्तमरित्या पार पाडण्यासाठी बी.पी.एड. विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. एम. लांडगे यांनी स्पर्धा सेक्रेटरी म्हणून उत्तम रित्या कार्य केले.

मैदानी स्पर्धा उद्घाटनासाठी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे जनरल सेक्रेटरी मा. विष्णू पाटील, खजिनदार मा.दिलीप रेवडकर, संस्था सदस्य मा. प्रा. डॉ. दिलीप मोहिते, सांस्कृतिक विभाग प्रमुख मा. जयकुमार (बापू) शितोळे उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रायार्च डॉ. एस. गोरे हे उपस्थित होते. सदर स्पर्धेसाठी आंतर महाविद्यालय क्रीडा स्पर्धेचे सचिव प्रा. शशिकांत गाढवे, श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शीचे प्राचार्य डॉ. पी. आर. थोरात व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सन २०१९-२० मध्ये झालेल्या आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत देखील महाविद्यालयातील प्रा. डॉ. सुरेश लांडगे यांनी व्हॉलीबॉल विद्यापीठ संघ व्यवस्था तसेच सामन्याची पूर्ण जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली. तसेच त्यांना सहाय्य म्हणून प्रा. बी. टी, गुंड व प्रा. शरद सावळे यांनी ही उत्तमरित्या सहकार्य केले.

तसेच आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेचा अहवाल लेखनासाठी प्रा. डॉ. ए. जी. कांबळे, प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे, प्रा. पंकज नरळे, डॉ. एम. व्ही. मते व डॉ. एल. आय. राठोड यांनी कार्य केले. तसेच प्रा. स्मिता सुरवसे यांनी आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेमध्ये मुलींच्या बास्केट बॉल स्पर्धेचे विद्यापीठ संघ व्यवस्थापक म्हणून उत्तमरीत्या जबाबदारी पार पाडली व त्यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर विद्यापीठ महिला बास्केट बॉल संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

**विद्यापीठाच्या विविध स्पर्धेत सहभाग -** आपल्या महाविद्यालयातील बी.पी.एड. च्या विद्यार्थीनी कु. क्रांती बनकर व कु. शुभांगी हिरेमठ यांची अंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत महिला बास्केट बॉल संघात निवड झाली. त्यांनी या क्रीडा स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तसेच त्यांची आंतर विद्यापीठ संघात देखील निवड झाली. तसेच कु. ज्योती बनसोडे हिने आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव गोळा फेक स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. आंतर महाविद्यालय क्रीडा स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या टेबल टेनिस संघाला तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

**कर्मवीर जयंती स्पर्धा -** श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंती निमित्त संस्थेमार्फत आयोजित कर्मवीर कुस्ती स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाने केले होते.

**आंतरविद्यापीठ/ क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू -**

| अ.क्र. | खेळाडूचे नांव | खेळ प्रकार | पारितोषिक/सहभाग |
|---|---|---|---|
| १ | कु. शुभांगी हिरेमठ | बास्केट बॉल | रौप्यपदक |
| २ | कु. क्रांती बनकर | बास्केट बॉल | रौप्यपदक |
| ३ | कु. ज्योती बनसोडे | गोळा फेक | सुवर्णपदक |
| ४ | श्री. विश्वजित गायकवाड | बेसबॉल | सहभाग |
| ५ | श्री. अलोक शिंदे | बेसबॉल | सहभाग |
| ६ | श्री. जितेश भालेराव | तलवारबाजी | सहबाग |

**- डॉ. ए. जी. कांबळे**
जिमखाना विभाग प्रमुख

# बी.एड. अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळा अहवाल

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी यांचे संयुक्त विद्यमाने एक दिवसीय बी.एड. अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळा दिनांक १७ मार्च २०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर कार्यक्षेत्रातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक उपस्थित होते. सदर कार्यशाळेत एन.सी.टी.ई. २०१४ नुसार तयार करण्यात आलेला बी.एड. चा जून २०१५ पासून लागू केलेल्या अभ्यासक्रमाबाबत सविस्तर चर्चा घडवून आणली. सदर अभ्यासक्रम राबवताना आलेल्या अडचणी लक्षात घेऊन नव्याने अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार जून २०१८ पासून नव्याने लागू करावयाच्या बी.एड. अभ्यासक्रमाबाबत आराखडा तयार करण्यात आला. सदर बी.एड. अभ्यासक्रम पुनर्ररचित आराखडा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अभ्यासमंडळे विभाग यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्याचे निश्चित करण्यात आले. सदर कार्यशाळेला खालील प्राचार्य, शैक्षणिक मानसशास्त्र अभ्यासमंडळ सदस्य, शैक्षणिक मूल्यनिर्धारण अभ्यासमंडळ सदस्य तसेच विविध शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

| क्र. | सहभागीचे नांव | हुद्दा | महाविद्यालयाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. ए. एम. रंगरेज | प्रभारी अधिष्ठाता | कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| २ | प्राचार्य डॉ. एस.एस.गोरे | समन्वयक, शै. मूल्यनिर्धारण अभ्यासमंडळ | शिक्षणशास्त्र महाविद्यायल, बार्शी |
| ३ | प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे | अध्यक्ष, शै. मानसशास्त्र अभ्यासमंडळ | शिक्षणशास्त्र महाविद्यायल, बार्शी |
| ४ | डॉ. व्ही. बी. किडगांवकर | सदस्य, शै. मूल्यनिर्धारण अभ्यासमंडळ | दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| ५ | डॉ. पी. आर. भोजे | सदस्य, शै. मानसशास्त्र अभ्यासमंडळ | दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| ६ | डॉ. एल. व्ही. बामणे | सदस्य, शै. मानसशास्त्र अभ्यासमंडळ | दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| ७ | डॉ. के. जे. शिंदे | सदस्य, शै. मूल्यनिर्धारण अभ्यासमंडळ | दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| ८ | डॉ. बी. एस. भावे | सदस्य, शै. मूल्यनिर्धारण अभ्यासमंडळ | कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| ९ | डॉ. ए. के. बोंदार्डे | सदस्य, शै. मूल्यनिर्धारण अभ्यासमंडळ | कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| १० | प्रा. डी. एम. पवार | सहा.प्राध्यापक | म. फुले कॉलेज ऑफ एज्युकेशन, अकलूज |
| ११ | प्रा. एस. एस. काळे | सहा.प्राध्यापक | शिक्षणशास्त्र महाविद्यायल, माढा |
| १२ | डॉ. एस. एस. झेंडे | प्राचार्य | शिक्षणशास्त्र महाविद्यायल, माढा |
| १३ | प्रा. एस. एस. दुधे | सहा.प्राध्यापक | शिक्षणशास्त्र महाविद्यायल, माढा |
| १४ | प्रा. व्ही. एच. वाघमारे | सहा.प्राध्यापक | म. फुले कॉलेज ऑफ एज्युकेशन, सांगोला |
| १५ | प्रा. ए. व्ही. सुरवसे | सहा.प्राध्यापक | सोशल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| १६ | डॉ. व्ही. बी. बंडगर | सहा.प्राध्यापक | उमा कॉलेज ऑफ एज्युकेशन, पंढरपूर |
| १७ | डॉ. पी. बी. ठाकरे | सहा.प्राध्यापक | जय जगदंबा कॉलेज ऑफ एज्युकेशन, वैराग |


| क्र. | सहभागीचे नांव | हुद्दा | महाविद्यालयाचे नांव |
|---|---|---|---|
| १८ | डॉ. एस. एल. तांबे | प्राचार्य | जय जगदंबा कॉलेज ऑफ एज्युकेशन, वैराग |
| १९ | डॉ. एस. एस. पन्हाळकर | सहा.प्राध्यापक | एस.व्ही.सी.एस. कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| २० | डॉ. डी. एस. वाघमारे | सहा.प्राध्यापक | कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| २१ | प्रा. ए. जे. टेके | सहा.प्राध्यापक | कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर |
| २२ | प्रा. एस. एस. दुधभाते | सहा.प्राध्यापक | उमा कॉलेज ऑफ एज्युकेशन, पंढरपूर |
| २३ | डॉ. जी. आर. वाघमोडे | प्राचार्य | एल. एम. कॉलेज ऑफ एज्युकेशन, अक्कलकोट |
| २४ | डॉ. एस. डी. भिलेगांवकर | सहयोगी प्राध्यापक | शिक्षणशास्त्र महाविद्यायल, बार्शी |
| २५ | डॉ. एम. व्ही. मते | सहा.प्राध्यापक | शिक्षणशास्त्र महाविद्यायल, बार्शी |
| २६ | डॉ. पी. ए. पाटील | सहा.प्राध्यापक | शिक्षणशास्त्र महाविद्यायल, बार्शी |
| २७ | डॉ. एम. एस. डिसले | सहा.प्राध्यापक | शिक्षणशास्त्र महाविद्यायल, बार्शी |
| २८ | डॉ. ए. जी. कांबळे | सहयोगी प्राध्यापक | शिक्षणशास्त्र महाविद्यायल, बार्शी |
| २९ | डॉ. डी. आर. कदम | प्राचार्य | श्री स्वामी समर्थ कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी |

**डॉ. व्ही. पी. शिखरे**
अध्यक्ष
शैक्षणिक मानसशास्त्र अभ्यास मंडळ

**डॉ. ए. एम. रंगरेज**
प्रभारी अधिष्ठाता
आंतरविद्याशाखीय विद्याशाखा

**प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे**
समन्वयक
शैक्षणिक मूल्यनिर्धारण अभ्यास मंडळ

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**



# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल

राष्ट्रीय सेवा योजना विभाग विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवा व श्रम प्रतिष्ठा ही मूल्ये रुजविण्यासाठी कार्य करतो. निस्वार्थ सेवाभाव वृद्धिंगत करण्यासाठी हा विभाग Not Me But You हे ब्रीदवाक्य घेऊन, ते सार्थ ठरविण्यासाठी, स्वतःसाठी जगता जगता दुसऱ्यासाठी काहीतरी करावे ही भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचा सतत प्रयत्न करतो.

२०१९-२०२० या शैक्षणिक वर्षामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये ३० मुली व १९ मुले होती. अशा एकूण ४९ महाविद्यालयीन स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला. या विभागाचा या वर्षाचा उद्घाटन समारंभ दिनांक २६ नोव्हेंबर २०१९ रोजी मा. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. व्ही. एन. निबांळकर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे विशद करून ती जोपासण्यासाठीचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. या विभागाअंतर्गत २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन, एक भारत स्वच्छ भारत उपक्रमाचे उद्घाटन व रा. से. यो. विभागाचा औपचारिक उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला. समारंभाचे प्रमुख अतिथी प्रा. अशोक कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक ०५ डिसेंबर २०१९ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित आंतराष्ट्रीय स्वयंसेवक दिनानिमीत्त डॉ. सोमनाथ यादव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. एक भारत स्वच्छ भारत अभियान अंतर्गत व्याख्यान, रॅली, घोषवाक्य बनविणे व निबंध स्पर्धा, फिल्म बनविणे यासारख्या उपक्रमाचे आयोजन नोव्हेंबर २०१९ ते फेब्रुवारी २०२० या कालावधीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून करण्यात आले.

दि. १७ ते १९ डिसेंबर २०१९ या कालावधीत महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत सहा महाविद्यालयातून एकूण १५० स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

दिनांक १७ जानेवारी २०२० रोजी श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा आयोजित पर्यावरण युवा जागृती या विषयावर आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयाच्या ४ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

रा. से. यो. विभागाच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन दि. ३० जानेवारी २०२० रोजी करण्यात आले. तसेच कर्मवीर जयंती प्रभात फेरीमध्ये व त्यातील विविध पथकांमध्ये आमच्या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

दिनांक ०६ फेब्रुवारी २०२० रोजी रा. से. यो. विभागाच्या वतीने हुंडाबळी चळवळी अंतर्गत वादविवाद व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आमच्या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

दिनांक १६ डिसेंबर २०१९ या दिवशी आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रीय कार्यशाळेच्या पार्श्वभुमीवर, २५ जानेवारी २०२० रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमीत्ताने आणि दिनांक ०७ फेब्रुवारी २०२० रोजी कर्मवीर जयंती सप्ताह समाप्ती निमीत्ताने महाविद्यालय परिसर स्वच्छता स्वयंसेवकांच्या मदतीने करण्यात आली.

या शैक्षणिक वर्षामधील विशेष श्रम संस्कार शिबीर मौजे उपळाई ठोंगे, ता. बार्शी या ठिकाणी दिनांक ०६ ते १२ जानेवारी २०२० या कालावधीमध्ये घेण्यात आले. या शिबीरादरम्यान आजच्या युवकांपुढील आव्हाने, व्यसनमुक्ती जनजागृती, मुलांचे हक्क आणि सुरक्षितता, कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन, कथा कथन, वृक्षारोपण व संवर्धन, चमत्कारामागील विज्ञान, आरोग्य तपासणी शिबीर, रक्तदान शिबीर व मोफत हिमोग्लोबीन टेस्ट इत्यादी व्याख्याने व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. तसेच सर्व प्राध्यापक बंधू भगिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**- प्रा. डॉ. एम. एस. डिसले**
कार्यक्रमाधिकारी

**रा. से. यो. सात दिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबीरामध्ये स्वयंसेवक/स्वयंसेविका यांच्या श्रमदानातून केलेल्या कामाचा/उपक्रमांचा अहवाल**

| | |
|---|---|
| शिबीर स्थळ/गावाचे नाव : | उपळाई (ठोंगे) |
| सहभागी महाविद्यालयांचे नाव : | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी |
| सहभागी तपशील : | मुले :१२, मुली :१३ |
| रासेयो कार्यक्रम अधिकारी : | महिला : निरंक, पुरुष : १ |
| सहभागी रासेयो कार्यक्रम अधिकारी यांचे नाव : | डॉ. डिसले एम. एस. |
| संबंधीत गावाचे सरपंच यांचे नाव व संपर्क : | मा. सौ.संतोषी हरिश्चंद्र कांबळे, संपर्क : ९६५७३०२०७१ |
| शिबीर कालावधी : | ०६/०१/२०२० ते १२/०१/२०२० |

**प्रथम दिवस :** राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीराचे उद्घाटन सोमवार दिनांक ६ जानेवारी २०२० रोजी ग्रामपंचायत उपळाई (ठों.) येथे सायंकाळी पार पडले. या उद्घाटन समारंभास मा. श्री नंदनजी जगदाळे (उपाध्यक्ष, श्री शि. शि. प्र. मं., बार्शी) कार्यक्रमाचे उद्घाटक व अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री जयकुमार (बापू) शितोळे, तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक मा. श्री व्ही. एस. पाटील (सचिव, श्री शि. शि. प्र. मं., बार्शी) लाभले. या उद्घाटन समारंभास प्रमुख उपस्थितांमध्ये प्राचार्य, उपसरपंच व ग्रामस्थ होते. रा. से. यो. चे कार्यक्रमाधिकारी यांनी सात दिवसीय विशेष श्रम संस्कार शिबीराची रूपरेषा सांगितली. या उद्घाटन समारंभमध्ये मान्यवरांनी रा. से. यो. च्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन व शिबीर यशस्वी पार पाडण्यास शुभेच्छा दिल्या.

**दुसरा दिवस :** मंगळवार दिनांक ७ जानेवारी २०२० रोजी दैनंदिन कार्यक्रमांतर्गत सकाळी ०९ ते १०.३० या वेळेत जनजागरण फेरीच्या माध्यमातून वृक्षारोपण-संवर्धन, स्वच्छता अभियान व जल व्यवस्थापन या विषयांवर जनजागरण करण्यात आले. सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत ग्रामपंचायत व त्यासमोरील रस्त्याची सफाई करण्यात आली. दुपारी ०२.३० ते ०५.३० या वेळेत बौद्धिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाच्या माध्यमातून 'आजच्या युवकांपुढील आव्हाने' या विषयावर व्याख्यान देण्याकरीता प्रा. डॉ. प्रदीप पांडुरंग इंगळे यांनी स्वयंसेवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून श्री सुंदरराव उर्फ बाळासाहेब पाटील लाभले. सायंकाळी ०६.०० वा. डॉ. संदीप तांबारे (संचालक, व्यसनमुक्ती केंद्र, येरमाळा) यांनी जनजागरण फेरी काढून व्यसनमुक्तीवर स्वंयसेवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.

**तिसरा दिवस :** बुधवार दिनांक ८ जानेवारी २०२० रोजी कार्यक्रमांतर्गत सकाळी ०८.३० ते १२.३० या कालावधीमध्ये वृक्षसंवर्धनांतर्गत गावातील वृक्षांना आळे करून वृक्षांना काठ्या लावून व पाणी देवून संरक्षित करण्यात आले. सायंकाळी ०६.०० वा कीर्तनाच्या माध्यमातून वृक्षारोपण-संवर्धन, स्वच्छता अभियान व जल व्यवस्थापन, महिला सक्षमिकरण याविषयावर समाजप्रबोधन, स्वयंसेवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी ह. भ. प. कु. भारती अडसूळ यांनी प्रबोधनात्मक कीर्तन केले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मा. श्री आबासाहेब ठोंगे व मा. श्री जयकुमार शितोळे उर्फ बापूसाहेब प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते.

**चौथा दिवस :** गुरुवार दिनांक ९ जानेवारी २०२० रोजी दैनंदिन कार्यक्रमांतर्गत सकाळी ९.०० ते १.०० या कालावधीमध्ये ग्रामस्थांच्या आरोग्य तपासणी करीता जगदाळे मामा हॉस्पिटल यांच्या मार्फत आरोग्य शिबीर घेण्यात आले. या शिबीराचा १५० ग्रामस्थांनी लाभ घेतला. सायंकाळी ४.०० ते ६.०० या कालावधीमध्ये ग्रामस्थांच्या घरोघरी जाऊन स्वयंसेवकानी ग्रमस्थांचे प्रश्न समजावून घेण्याकरीता सर्वेक्षण केले. सायंकाळी ६.००वा. व्यक्तीमत्त्व विकास व कथाकथनाच्या माध्यमातून स्वयंसेवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष किसान कामगार विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री मधुकर शेळके सर उपस्थित होते.

**पाचवा दिवस :** शुक्रवार दिनांक १० जानेवारी २०२० रोजी दैनंदिन कार्यक्रमांतर्गत सकाळी ०९.०० ते ०१.०० या कालावधीमध्ये रक्तदान शिबीर व मोफत हिमोग्लोबीन तपासणी, श्री भगवंत ब्लड बँक, बार्शी यांच्या माध्यमातून घेण्यात आली. या शिबीरात एकूण २१ स्वयंसेवकांनी रक्तदान केले. सायंकाळी ४.०० ते ६.०० या कालावधीमध्ये 'चमत्कारामागील शास्त्र' या विषयावर प्रा. डॉ. अशोक कदम (सचिव, अ.नि.स., सोलापूर जिल्हा) यांनी स्वयंसेवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मा. श्री बाळासाहेब पाटील हे उपस्थित होते.

**सहावा दिवस :** शनिवार दिनांक ११ जानेवारी २०२० रोजी दैनंदिन कार्यक्रमांतर्गत सकाळी ८.३० ते १२.३० या कालावधीमध्ये स्मशानभूमी स्वच्छता, पाणीपुरवठा तलाव व विहीर या ठिकाणी स्वयंसेवकांनी श्रमदान करुन परिसर स्वच्छ केला. सायंकाळी ६.३० ते ९.०० या कालावधीमध्ये रा. से. यो. च्या स्वयंसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास या मुख्य विषयावर आधारित वृक्षारोपन-संवर्धन, स्वच्छता अभियान व जल व्यवस्थापन, महिला सक्षमीकरण तसेच सामाजिक प्रश्नांवर ग्रामस्थांचे प्रबोधनात्मक मनोरंजन केले. या कार्यक्रमाचे उद्घाटक मा. डॉ. व्ही. पी. शिखरे व अध्यक्ष मा. श्री नवनाथ गाडेकर होते.

**सातवा दिवस :** रविवार दिनांक १२ जानेवारी २०२० रोजी रा. से. यो. विशेष श्रम संस्कार शिबीर समारोप समारंभ सकाळी ११.०० वाजता सुरु झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्रा दिलीप रेवडकर (खजिनदार, श्री शि. शि. प्र. मं., बार्शी) व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे तसेच सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमामध्ये, कार्यक्रमाधिकाऱ्यांनी सात दिवसीय विशेष श्रम संस्कार शिबीराचा अहवाल सादर केला. स्वयंसेवक व ग्रामस्थांनी आपली मनोगते व्यक्त केली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

वरील नमुद एक ते सात दिवसांमध्ये संबधीत महाविद्यालयाच्या रा. से. यो. स्वयंसेवकांनी त्यांच्या श्रमदानातून केलेले काम, उपक्रम व त्या कामांचा/उपक्रमांचा अहवाल व महाविद्यालयासंबंधीत इतर सहभाग माहिती प्रमाणीत करण्यात येत आहे.

**- प्रा. डॉ. एम. एस. डिसले**
कार्यक्रमाधिकारी



# सांस्कृतिक विभाग अहवाल

**शै**क्षणिक वर्ष २०१९-२० चा महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचा अहवाल सादर करताना मनस्वी आनंद होत आहे. या शैक्षणिक वर्षात खालील प्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमांचे यशस्विपणे आयोजन करण्यात आले होते.

| क्र. | दिनांक | कार्यक्रम | अध्यक्ष | पाहुणे |
|---|---|---|---|---|
| १ | २६/७/२०१९ | कारगिल विजय दिवस | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | लेफ्टनंट एच. एल. बोंगे |
| २ | २६/७/२०१९ | गणित सोपे कसे ? | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | गौरव भंडारी |
| ३ | २७/७/२०१९ | डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम स्मृती दिन | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | प्रा. सौ. माधुरी शिंदे |
| ४ | १/८/२०१९ | पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ वर्धापन दिन<br>लोकमान्य टिळक पुण्यतिथी<br>अण्णाभाऊ साठे जयंती | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | प्रा. डॉ. अशोक कदम |
| ५ | १५/८/२०१९ | स्वातंत्र्य दिन | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | मा. डॉ. बी. वाय. यादव |
| ६ | ५/९/२०१९ | शिक्षक दिन | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | --- |
| ७ | १४/९/२०१९ | हिंदी दिन | प्रा. डॉ. फुरडे आर. ए. | --- |
| ८ | १/१०/२०१९ | कथाकथन स्पर्धा (साने गुरुजी) | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | --- |
| ९ | २/१०/२०१९ | महात्मा गांधी जयंती (प्रतिमा पूजन) | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | --- |
| १० | १०/१०/२०१९ | बोल अनुभवाचे (शालेय अनुभव कार्यक्रम) | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | --- |
| ११ | २६/११/२०१९ | संविधान दिन | प्रा. डॉ. एस. डी. भिलेगांवकर | प्रा. व्ही. एस. निंबाळकर |
| १२ | १७/१२/२०१९ ते १९/१२/२०१९ | एन. एस. एस. तीन दिवसीय<br>आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | मा. कुलगुरु<br>डॉ. मृणालिनी फडणवीस |
| १३ | ४/१/२०१९ | राष्ट्रीय परिषद (National Conference) | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | प्रा. डॉ. सौ. सुनिता मगरे |
| १४ | १६/१/२०१९ | भूगोल दिन | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | प्रा. डॉ. अशोक कदम |
| १५ | १७/१/२०१९ | तिळगुळ कार्यक्रम | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | प्रा. डॉ. फुरडे आर. ए. |

| क्र. | दिनांक | कार्यक्रम | अध्यक्ष | पाहुणे |
|---|---|---|---|---|
| १६ | १/२/२०२० | कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे जयंतीनिमित्त विद्यार्थी मनोगते | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | प्रा. डॉ. शिखरे व्ही. पी. |
| १७ | ३/१/२०२० | सावित्रीबाई फुले जयंती | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | प्रा. डॉ. फुरडे आर. ए. |
| १८ | २५/१/२०२० | राष्ट्रीय मतदार दिन | प्रा.डॉ.भिलेगांवकर एस.डी. | |
| १९ | २६/१/२०२० | प्रजासत्ताक दिन | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | |
| २० | २/२/२०२० | समाज गौरव पुरस्कार | डॉ. बी. वाय. यादव | |
| २१ | ४/२/२०२० | कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांची ११७ वी जयंती | डॉ. बी. वाय. यादव | |
| २२ | ५/२/२०२० | प्रा. डॉ. राजश्री देशपांडे, शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण यांचे मार्गदर्शन | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | प्रा. डॉ. राजश्री देशपांडे |
| २३ | १३/२/२०२० | अंधश्रद्धा निर्मूलन समिती आयोजित कार्यक्रम (बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी) | प्राचार्य डॉ. एस.के.पाटील | अंधश्रद्धा निर्मूल समिती, बार्शी |
| २४ | १९/२/२०२० | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | डॉ. बी. वाय. यादव<br>प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | |
| २५ | ११/३/२०२० | आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त मार्गदर्शन | डॉ. श्रीमती शिंदे मॅडम | |

सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी प्रमुख पाहुणे, प्राचार्य, विभाग प्रमुख, मार्गदर्शक प्राध्यापक, प्रशिक्षणार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांचे हार्दिक अभिनंदन व आभार...!





**- प्रा. डॉ. एस. डी. भिलेगांवकर**
सांस्कृतिक विभाग प्रमुख

# Teachers Award 2019-20

| No. | Name of Teacher | Name of Award | Agency | Year |
|---|---|---|---|---|
| 1 | Prin. Dr. Gore S. S. | Best Principal Award | PAH Solapur University, Solapur | 2019 |
| 2 | Dr. Bhilegaonkar S. D. | Best Citizen of India Gold Medal Award | GEPRA, New Delhi | 2020 |
| 3 | Dr. Shikhare V. P. | Best Teacher Award | Lokmangal Pratisthan, Solapur | 2020 |
| 4 | Dr. Disale M. S. | Best Teacher Award | Jai Malhar Samajik Pratisthan, Beed | 2020 |
| 5 | Prof. Gund B. T. | State Level Best Teacher Award | Maharashtra State Krida Shikshak Mahasangh | 2020 |
| 6 | Prof. Survase S. S. | Best Woman Award | Samarth Jivan Seva Foundation, Barshi | 2020 |
| 7 | Dr. M. V. Mate | State Level Best Teacher Award | Sahyadri Udyog Samuh,Ahmadnagar | 2020 |
| 8 | Mr. S. A. Sawale | State Level Best Teacher Award | Sahyadri Udyog Samuh,Ahmadnagar | 2020 |
| 9 | Dr. L. I. Rathod | Courageous Woman Award | Social Human Right Council | 2020 |



# माहिती तंत्रज्ञान स्त्रोत केंद्र अहवाल

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी हे विविध सोई सुविधांनी अद्ययावत व सुसज्ज असे प्रशिक्षण महाविद्यालय आहे. महाविद्यालयातील विविध स्त्रोत केंद्रांपैकी माहिती तंत्रज्ञान स्त्रोत केंद्र (ICT Resource Center) हे एक होय. या केंद्रामार्फत अहवाल वर्ष/शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विविध उपक्रम घेण्यात आले, त्यापैकी काही उपक्रम पुढील प्रमाणे -

दि. २३ ते २६ जुलै २०१९ रोजी माहिती संप्रेषण तंत्रज्ञान उद्‌बोधन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेत ४३ प्रशिक्षणार्थी व सहा प्राध्यापक सहभागी झाले होते. या कार्यशाळेत मायक्रोसॉफ्ट प्लॅटफॉर्म वरील विविध कृती प्रत्यक्ष दिग्दर्शनासह सादर करण्यात आल्या. तसेच प्रत्येक सहभागींकडून त्या करवून घेण्यात आल्या. या कार्यशाळेत तज्ञ मार्गदर्शक म्हणून तंत्रस्नेही शिक्षक मा. रणजितसिंह डिसले हे उपस्थित होते, तर कार्यशाळा समन्वयक डॉ. एम. एस. डिसले यांनी काम पाहिले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तीन दिवसीय ICT Workshop उत्तमपणे पार पडले.

माहिती तंत्रज्ञान स्त्रोत केंद्रामार्फ त दि. २० ऑगस्ट २०१९ रोजी दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांचा जन्मदिवस 'माहिती तंत्रज्ञान दिवस' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून मा. डॉ. पी. ए. पाटील यांनी प्रशिक्षणार्थींना 'अध्ययन, अध्यापन व मूल्यमापनातील माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे महत्त्व' खास शैलीत सांगितले. तसेच प्रशिक्षणार्थींनी तंत्रस्नेही बनणे भविष्यातील गरज आहे असेही त्यांनी स्पष्ट केले.

जि. प. शिक्षण विभाग, पंचायत समिती, बार्शी शिक्षण विभाग व शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी माहिती तंत्रज्ञान स्त्रोत केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने 'व्हर्च्युअल फिल्ड ट्रिप्स' या विषयावरती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेत बार्शी तालुक्यातील २३० प्राथमिक शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता. सर्व उपस्थित सहभागींना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तंत्रस्नेही शिक्षक मा. रणजितसिंह डिसले यांचे सखोल मार्गदर्शन लाभले.

साधना कन्या प्रशाला व माहिती तंत्रज्ञान स्त्रोत केंद्र, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी यांच्या संयुक्त विद्यामाने प्रशिक्षणार्थींनी शिक्षण तज्ज्ञांची ऑनलाईन मुलाखत घेतली. सदर मुलाखतीसाठी शिक्षणतज्ज्ञ डॉ. दत्तात्रय तापकीर (पुणे) व डॉ. महेश्वर कळलावे (औरंगाबाद) यांनी ऑनलाईन संवाद साधत प्रशिक्षणार्थी तसेच शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांच्या प्रश्नांना उत्तरे देत मुक्त संवाद साधला.

साधना कन्या प्रशाला बार्शी येथे शालेय आंतरवासिता कालावधीमध्ये प्रशिक्षणार्थींनी 'व्हर्च्युअल फिल्ड ट्रिप्स'च्या माध्यामातून देश-विदेशातील तज्ज्ञांशी संवाद साधत विद्यार्थ्यांना अध्ययन व पर्यटन दोहोंचा अनुभव देण्याचा प्रयत्न केला. या कालावधीत दहा पेक्षा जास्त ऑनलाईन सहली शालेय विद्यार्थ्यांनी अनुभवल्या.

अशाप्रकारे महाविद्यालयातील माहिती संप्रेषण तंत्रज्ञान स्त्रोत केंद्रामार्फत नाविन्यपूर्ण उपक्रम सतत राबविण्यात येतात.



**- प्रा. डॉ. एम. एस. डिसले**
कार्यशाळा समन्वयक

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९
# SVEEP मतदार जाणीव जागृती कार्यक्रम अहवाल

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ च्या अनुषंगाने भारत सरकार, निवडणूक आयोग, दिल्ली व राज्य निवडणूक आयोग, मुंबई व मा. भारत निवडणूक आयोगाकडील सर्वसाधारण निरीक्षक यांचेकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या सूचनांनुसार मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृती करणे आवश्यक आहे. मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे कार्यालयाचे जा.क्र.सा.प्र. ५८४३ दिनांक ९ ऑक्टोबर २०१९ रोजीच्या प्रपत्रानुसार शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे करण्यात आले आहे. सदर उपक्रमांत महाविद्यालयातील मा. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, नोडल अधिकरी प्रा. डॉ. एम. व्ही. मते, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद, प्रशिक्षणार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

**१. संकल्प :** मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृती करणे आवश्यक आहे. यास अनुसरुन महाविद्यालयात दि. १०.१०.२०१९ रोजी मतदार जनजागृती संदर्भात संकल्प उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी उपस्थित प्राध्यापक, प्रशिक्षणार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांना मतदार जनजागृती संदर्भात उद्बोधन केले. मतदानाचे महत्त्व सविस्तर विशद केले. राष्ट्रविकासासाठी मतदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. ''स्वतः मतदान करणार त्याचबरोबर इतरांनाही मतदान करण्यास प्रेरित करणार'' असा संकल्प उपस्थित सर्वांनी केला.

**२. निबंध लेखन स्पर्धा :** मतदार जनजागृती संदर्भात महाविद्यालयातील बी.एड. प्रशिक्षणार्थींनी दि. १०.१०.२०१९ रोजी आयोजित निबंधलेखन स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. 'मतदार जागरुकता', 'मतदार राजा जागा हो', 'सुदृढ लोकशाहीसाठी मतदान' असे तीन विषय देण्यात आले होते. यामध्ये एकूण ८ बी.एड. प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला. यामधून कु. कातुरे योगिता मोहन, कु. शेख परवीन वाहेद, कु. भोसले अश्विनी अरुणराव असे अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले. समन्वयक म्हणून प्रा. डॉ. एम. व्ही. मते यांनी कार्य केले. प्रा. डॉ. पी. ए. पाटील यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

**३. घोषवाक्ये स्पर्धा :** मतदार जनजागृती संदर्भात महाविद्यालयातील बी.एड. प्रशिक्षणार्थींनी दि. १०.१०.२०१९ रोजी आयोजित घोषवाक्ये स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. 'मतदार जागरुकता', 'सुदृढ लोकशाहीसाठी मतदान' असे दोन विषय देण्यात आले होते. यामध्ये एकूण १५ बी.एड. प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला. यातून कु. इटकर अश्विनी बसवंत, कु. गायकवाड प्रणिता बाबासाहेब, कु. भोसले अश्विनी अरुणराव असे अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले. समन्वयक व परीक्षक म्हणून प्रा. डॉ. एम. व्ही. मते यानी कार्य केले.

**४. वादविवाद स्पर्धा :** मतदार जनजागृती संदर्भात महाविद्यालयातील बी.एड. प्रशिक्षणार्थींनी दि. ११.१०.२०१९ रोजी आयोजित वादविवाद स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. 'सुदृढ लोकशाहीसाठी मतदान' हा विषय देण्यात आला होता. यामध्ये एकूण २ गटांनी सहभाग नोंदविला. बी.एड. प्रशिक्षणार्थींनी सदर विषयास अनुसरुन अनुकूल व प्रतिकूल विचार सादर केले. यातून कु. क्षीरसारगर पल्लवी लक्ष्मण, कु. भोसले अश्विनी अरुणराव, कु. कातुरे योगिता मोहन व कु. मुळे प्रियंका अप्पा (विभागून) असे अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले. समन्वयक व परीक्षक म्हणून प्रा. डॉ. एम. व्ही. मते यांनी कार्य केले.

**५. नकला सादरीकरण :** मतदार जनजागृती संदर्भात महाविद्यालयात दि. ११.१०.२०१९ रोजी नकला सादरीकरण या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील बी.एड. प्रशिक्षणार्थी श्री गणेश परशुराम वडेकर यांचा नकला सादरीकरण कार्यक्रम आयोजित केला. यात श्री गणेश वडेकर यांनी नामांकित कलाकार व राजकारणातील मान्यवरांच्या आवाजाची बहारदार नक्कल करुन मतदार जनजागृतीचा संदेश दिला. नकला सादरीकरणाचा उपस्थित बी.एड. प्रशिक्षणार्थींनी मनमुराद आस्वाद घेतला व मतदान करण्याचा

संकल्प केला. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. एम. व्ही. मते यांनी कार्य केले.

**६. पोस्टर स्पर्धा** : मतदार जनजागृती संदर्भात महाविद्यालयातील बी.एड. प्रशिक्षणार्थींनी दि. १२.१०.२०१९ रोजी आयोजित पोस्टर स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. 'मतदार जागरूकता', 'सुदृढ लोकशाहीसाठी मतदान' व 'मतदार राजा जागा हो' असे विषय देण्यात आले होते. यामध्ये एकूण ११ बी.एड. प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला. बी.एड. प्रशिक्षणार्थींनी सदर विषयास अनुसरुन आकर्षक पोस्टर सादर केले. तसेच पोस्टर प्रदर्शन आयोजित केले. यातून श्री जगदाळे पवन रमेश, कु. जगदाळे प्रियंका बाबासाहेब, कु. गुरव सोनाली सुभाष असे अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. ए. जी. कांबळे व प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी मार्गदर्शन केले. समन्वयक म्हणून प्रा. डॉ. एम. व्ही. मते यांनी कार्य केले. प्रा. डॉ. पी. ए. पाटील यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.


**७. पथनाट्य** : ''मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो'' या विषयावर आधारित महाविद्यालयातील बी.एड. प्रशिक्षणार्थींनी दि. १४.१०.२०१९ रोजी महाविद्यालय परिसरात मतदार जनजागृतीसंदर्भात पथनाट्य सादरीकरण केले. सदर पथनाट्यातून बी.एड. प्रशिक्षणार्थींनी मतदानाचे महत्त्व विविध प्रसंगातून सादर केले. मतदान यंत्राची माहिती विशद केली. मतदान करण्यासाठी उपस्थितांना प्रेरित केले. यामध्ये कु. खळदे प्रियंका धनंजय, कु. मांजरे राणी भिकाजी, कु. क्षीरसारगर पल्लवी लक्ष्मण, कु. गुंड मधुरा लक्ष्मण, कु. गायकवाड मोहिनी भारत, श्री वेदपाठक सोमनाथ प्रदीप, श्री मिलिंद कैलास मांजरे, श्री देवकर विजयसिंह शिवाजी, श्री जगदाळे पवन रमेश, श्री शुभम तकिक अशा एकूण १० बी.एड. प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला. समन्वयक म्हणून प्रा. डॉ. एम. व्ही. मते यांनी कार्य केले.

**८. मुक्त संवाद** : दि. १४.१०.२०१९ रोजी 'लोकशाही बळकटीकरणासाठी मतदान' तरुणाईशी खुली चर्चा यावर आधारित मुक्त संवाद हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा टक्का वाढविणे, त्यातील तरुणांचा महत्त्वाचा सहभाग, सोशल मिडीयाचा वापर कसा करता येईल, यावर तरुणांनी उत्फूर्तपणे मत व्यक्त केले. यामध्ये बी.एड. प्रशिक्षणार्थी कु. भोसले अश्विनी अरूणराव यांनी उपस्थित पत्रकार बंधू, प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, पालक आदींशी मुक्त संवाद साधला व मतदान जनजागृती केली. यावेळी दैनिक पुढारी या वृापत्राचे पत्रकार मा. श्री गणेश गोडसे, मा. श्री धनंजय जगदाळे, मा. श्री रणजित काकडे, मा. श्री मल्लिकार्जून धारूरकर या मान्यवरांनी सहभाग नोंदवला. प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. सदर कार्यक्रमात प्रा. डॉ. पी. शिखरे यांनी सहभाग घेत मार्गदर्शन केले. समन्वयक म्हणून प्रा. डॉ. पी. ए. पाटील यांनी कार्य केले.

मतदार जनजागृती संदर्भातील सदर उपक्रम यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, नोडल अधिकारी प्रा. डॉ. एम. व्ही. मते, प्रा. डॉ. पी. ए. पाटील, प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे, प्रा. डॉ. एस. एम. लांडगे, प्रा. डॉ. ए. जी. कांबळे, प्रा. डॉ. एम. एस. डिसले, प्रा. एस. एस. सुरवसे, प्रा. पी. पी. नरळे, सर्व विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक, प्रशिक्षणार्थी, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी कार्य केले.

**– प्रा. डॉ. एम. व्ही. मते**
समन्वयक तथा नोडल अधिकारी



# प्राध्यापक प्रबोधिनी अहवाल

**म**हाविद्यालयातील प्राध्यापकांनी शैक्षणिक, सामाजिक, संशोधन आदि क्षेत्रातील नाविन्यपूर्ण व उल्लेखनीय आधुनिक नवप्रवाहांचा परिचय व्हावा या उद्देशाने प्राध्यापक प्रबोधिनी तयार केली आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक प्रबोधिनी विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात आले.

१. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक प्रबोधिनी समिती मा. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांच्या उपस्थितीत तयार करण्यात आली.

२. प्राध्यापकांसाठी मार्गदर्शन व उद्‌बोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

३. दिनांक २४.०१.२०२० रोजी 'गुणवत्तापूर्ण शिक्षक' या विषयावर पंढरपूर येथील उमा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद परिचारक यांचे व्याख्यान आयोजित केले.

४. प्राध्यापकांना विविध परिषदा, कार्यशाळा व सेमिनारमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.

५. प्राध्यापकांना संशोधन पेपर, प्रकल्प व नवोपक्रम राबविण्यास प्रेरित केले.

६. प्राध्यापकांना Faculty Development Programme and Refresher Course प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.

७. दिनांक ०४.०१.२०२० रोजी 'उच्च शिक्षणात माहिती संप्रेषण तंत्रविज्ञानाचे एकात्मिकरण' या मुख्य विषयावर आधारीत संशोधन किंवा संकल्पनात्मक पेपर सादरीकरण व प्रकाशन संदर्भात एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले.

प्राध्यापक प्रबोधिनी २०१९-२० मध्ये सहभागी प्राचार्य, विभागप्रमुख व प्राध्यापक यांचे महाविद्यालयाच्या वतीने हार्दिक अभिनंदन व आभार !!!

**- प्रा. डॉ. एस. डी. भिलेगांवकर**
समन्वयक



पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी

बार्शी : शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. मिलिंद परिचारक.

## गुणवत्तापूर्ण शिक्षक होण्यासाठी संशोधनवृत्ती गरजेची : प्रा. परिचारक

बार्शी : पुढारी वृत्तसेवा

शिक्षण म्हणजे लहानांनी मोठे व मोठ्यांनी लहान होणे. शिक्षण ही शिकवण्यापलीकडील प्रक्रिया आहे. शिक्षकांनी सर्वोत्कृष्टता दिली पाहिजे. गुणवत्तापूर्ण शिक्षक होण्यासाठी संशोधन, नाविन्यता, व्यासंग, वाचन, संस्कार, शिस्त, मूल्ये आदी घटकांवर भर दिला पाहिजे, असे प्रतिपादन पंढरपूर येथील उमा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद परिचारक यांनी केले.

ते शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे 'गुणवत्तापूर्ण शिक्षक' या विषयावर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते. यावेळी सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ. एस.डी. भिलेगावकर, बी.पी.एड्. विभागप्रमुख डॉ. एस.एम. लांडगे, एम.पी. एड्. विभागप्रमुख प्रा. जी. एस. फरताडे उपस्थित होते.

सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. एम. एस. डिसले यांनी प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाचे अध्यक्ष यांचा परिचय करून दिला.

डॉ. परिचारक यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षकाचे विविध पैलू विशद केले. ते म्हणाले, अध्यापनाचा प्रयोग करण्याऐवजी अध्यापनात प्रयोग राबविले पाहिजेत. अभिनय कला विकसित करून प्रभावी अध्यापन करावे. शिक्षणात नवनिर्मितीला प्राधान्य द्यावे. ज्ञान व कौशल्ये विकसित केली पाहिजेत. म्हणूनच शिक्षक असल्याचा सर्वांनी अभिमान बाळगावा, असे आवाहन त्यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. पी.ए. पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुरा गुंड यांनी केले.



## सणाचे तत्वज्ञान जाणल्यास नाविन्यपूर्ण आनंद मिळतो : गोरे

बार्शी : तालुका प्रतिनिधी

बदलत्या काळानुसार सण व उत्सव साजरे करण्याचा झगमगाट वाढला आहे. परंतु सणाचे स्वरुप व दिला जाणारा संदेश कायम आहे. सण-उत्सवाचे खरे तत्वज्ञान जाणल्यास मानवी जीवनात नाविन्यपूर्ण आनंद घेता येतो. सामाजिक सौंदर्य व सामाजिक संदेश यात सण-उत्सवाची भूमिका उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन प्रा. एस.एस. गोरे यांनी केले. ते बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात दीपोत्सव कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर समन्वयक प्रा. डॉ. पी.ए. पाटील, प्रा. डॉ. एस. डी. भिलेगावकर, प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे, प्रा. डॉ. एम.एस. डिसले, प्रा. डॉ. आर. ए. फुरडे, प्रा. डॉ. एम. व्ही. मते आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीपावली सणाविषयी भक्तीगीते सादर केली. प्रास्ताविक समन्वयक प्रा. डॉ. पी.ए. पाटील यांनी केले. बी.एड. प्रशिक्षणार्थीनी उपस्थित प्राध्यापकांचे औक्षण केले. यानंतर वसुबारस, धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा अर्थात पाडवा, भाऊबीज विविध राज्यात सण साजरा करण्याचे स्वरुप व पर्यावरणपूरक दिवाळी या विषयावर अनेकांनी मनोगते व्यक्त केली. प्रा. डॉ. एम. व्ही. मते यांनी दीपावली सणाचे स्वरुप व संदेश याविषयी माहिती विशद केली. आभार मयुर माने, तर सूत्रसंचालन लक्ष्मी कांबळे व मोनिका देशपांडे यांनी मानले.

बार्शी : दीपोत्सव कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. एस.एस गोरे.

# बी.एड. सामायिक प्रवेश परीक्षा मार्गदर्शन अहवाल

**शै**क्षणिक वर्ष २०२०-२१ साठी बी.एड. द्विवार्षिक अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी इच्छुक प्रशिक्षणार्थीसाठी महाविद्यालयाच्या बी.एड. प्रवेश प्रक्रिया समितीच्या वतीने कोव्हीड १९ कालावधीत विशेष उपक्रम राबविण्यात आले.

१. बी.एड. सामायिक प्रवेश परीक्षा २०२०-२१ संदर्भात राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या अधिकृत प्रवेश परीक्षा वेळापत्रकासंदर्भात माहितीपत्रके तयार करुन ग्रमीण व शहरी भागातील पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयातील इच्छुक प्रशिक्षणार्थींना मोबाईल फोन व व्हाटस्‌ॲप द्वारे देण्यात आली.

२. पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयातील इच्छुक प्रशिक्षणार्थींना महाविद्यालयाच्या बी.एड. प्रवेश प्रक्रिया समितीने ऑनलाइन द्वारे व्हाटस्‌ॲप ग्रुप तयार करुन मार्गदर्शन व उद्‌बोधन दिनांक २० मार्च २०२० ते ०८ जून २०२० पर्यंत करण्यात आले.

३. बी.एड. सामायिक प्रवेश परीक्षा २०२०-२१ संदर्भात मोफत मार्गदर्शन ऑनलाइन द्वारे राबविण्यात आले.

४. इच्छुक प्रशिक्षणार्थीना बी. एड. सामायिक प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाइन संदर्भात फोन व व्हाटस्‌ॲप द्वारे माहिती दिली.

५. सदर मार्गदर्शन उपक्रमामुळे इच्छुक प्रशिक्षणार्थींना बी.एड. सामायिक प्रवेश परीक्षा २०२०-२१ संदर्भात मानसिक क्षमता, सामान्य ज्ञान व शिक्षक अभिक्षमता या बाबींची माहिती समजण्यास मदत झाली.

६. बी.एड. सामायिक प्रवेश परीक्षा २०२०-२१ संदर्भात बी.एड. विभागाच्या सर्व प्राध्यापकांनी कोव्हीड १९ कालावधीत व्हाटस्‌ॲप द्वारे आवश्यक ते मार्गदर्शन केले.

७. सदर मार्गदर्शन उपक्रमामध्ये २० प्रशिक्षणार्थींनी व्हाटस्‌ॲप द्वारे सहभाग नोंदविला.

बी.एड. सामायिक प्रवेश परीक्षा २०२०-२१ मार्गदर्शन उपक्रमामध्ये सहभागी प्राचार्य, विभागप्रमुख, मार्गदर्शक प्राध्यापक, सर्व प्रशिक्षणार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांचे महाविद्यालयाच्या वतीने हार्दिक अभिनंदन व आभार !!!


पुढारी

News By
गणेश गोडसे, बार्शी

'शिक्षणशास्त्र' चा वर्क फ्रॉम होम

प्राध्यापकांच्या वतीने ऑनलाईन लर्निंगचे विविध नाविन्यपूर्ण प्रयोग

बार्शी : पुढारी वृत्तसेवा

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशात लॉकडाऊन घोषित करण्यात आला आहे. याचा परिणाम शिक्षण क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात झाला आहे. महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांना 'वर्क फ्रॉम होम' करण्याचे आदेश संबंधित विभागाने दिलेले आहेत. याचाच भाग म्हणून श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचालित शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने प्रा. डॉ. एस. एस. गोरे यांच्या मार्गदर्शनातून ऑनलाईन अध्ययन-अध्यापन व प्रशासकीय कार्य यशस्वीरित्या सुरू आहे.

मानव संसाधन विकास मंत्रालय नवी दिल्ली, विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या परिपत्रकानुसार व आदेशान्वये महाविद्यालयांनी ऑनलाईन शिक्षण प्रणाली राबविण्याचे आदेश दिले होते. ऑनलाईनमुळे महाविद्यालयातील बी.एड., बी.पी.एड., एम.एड., एमपी.एड. प्रशिक्षणार्थी तसेच पीएच. डी. संशोधन विद्यार्थी यांना हीत असल्याचे दिसून येत आहे.

महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या वतीने ऑनलाईन लर्निंगचे विविध नाविन्यपूर्ण प्रयोग 'वर्क फ्रॉम होम'च्या माध्यमातून यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. यामध्ये अभ्यासक्रमनिहाय व विषयानुसार व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमानुसार पॉवर पॉइंट प्रेझेन्टेशन, ध्वनिफिती, चित्रफिती, संदर्भ पुस्तके व्हॉट्सअॅप ग्रुप व ई-मेलद्वारे प्रशिक्षणार्थींना उपलब्ध करून दिले आहे. झूम अॅप, ऑनलाईन चाचणी, प्रश्नपेढी, प्रश्नपत्रिकांचा सराव, आलय संबंधित रेडीमेड व्हिडीओद्वारे ऑनलाईन अध्ययन-अध्यापन मोठ्या प्रमाणात व यशस्वीरित्या केले जात आहे. विद्यापीठ परीक्षेची तयारी उत्साहाने करत असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी सांगितले.

बार्शी : शिक्षणशास्त्र महाविद्यालयाकडून आयोजित वर्क फ्रॉम होममध्ये सहभागी झालेले विद्यार्थी.

**- प्रा. डॉ. एम. व्ही. मते**
समन्वयक


शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी
बी एड द्वितीय वर्ष २०१९-२०


शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी
बी पी एड द्वितीय वर्ष २०१९-२०


शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी
एम पी एड द्वितीय वर्ष २०१९-२०


शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी


शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी
शिक्षकेतर कर्मचारी वृंद


श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी.


कर्मवीर
जलतरण तलाव

